सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ९७ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### दिवसभरातील विक्रीनंतर अखेरच्या तासात 'रिकव्हरी'

**मुंबई** : दिवसभरात विक्रीच्या दबावाखाली असणारा शेअर बाजार बंद होण्याच्या वेळी मात्र चांगल्या 'रिकव्हरी'च्या स्थितीत आला. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात १२२ अंकांची, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत २६ अंकांची घसरण नोंदविण्यात आली.



सकाळी बाजार सुरू झाल्यापासून शेअर बाजारात विक्रीचा तडाखा होता. बाजारात ५०० पेक्षा अधिक अंकांची घसरण झाली होती. मात्र, शेवटच्या तासात बाजार सावरला. निफ्टीतील व्यवहारात महिंद्रा, भारत इलेक्ट्रॉनिक्स, आयशर मोटर्स, आयटीसी, हिरो मोटोकॉर्प या शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण झाली. दुसरीकडे एसबीआय लाईफ इन्शुरन्स, बजाज फिनसर्व्ह, एचडीएफसी लाईफ, अल्ट्राटेक सिमेंट, टाटा कन्झ्युमरच्या शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ झाली. या घसरणीमुळे बाजार भांडवल १.०४ लाख कोटींनी कमी झाले.

### अनिल अंबानींच्या हातातून निसटली आणखी एक कंपनी

**मुंबई** : अनिल अंबानी यांची कर्जबाजारी झालेली कंपनी रिलायन्स कॅपिटल लिमिटेडला लवकरच नवीन मालक मिळणार आहे. हिंदुजा ग्रुपची कंपनी इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेडने (आयआयएचएल) रिलायन्स कॅपिटलची बोली यशस्वीरीत्या जिंकली आहे. हा करार फेब्रुवारीअखेर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. रिलायन्स कॅपिटलच्या कर्जदारांनी आयआयएचएलच्या योजनेला मान्यता दिली आहे. याशिवाय नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलनेही या कराराला मान्यता दिली आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत ही अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण होईल.

### किरकोळ महागाई दराचा पाच महिन्यातील नीचांक

**नवी दिल्ली** : अन्नपदार्थांच्या स्वस्त किमतींमुळे जानेवारीमध्ये किरकोळ महागाई दर ४.३१ टक्के या पाच महिन्यांच्या नीचांकी पातळीवर घसरला आहे. ऑगस्टमध्ये महागाई दर ३.६५ टक्के होता. डिसेंबरच्या सुरुवातीला महागाई दर ५.२२ टक्के होता. १२ फेब्रुवारी रोजी सरकारने किरकोळ महागाईचे आकडे जाहीर केले. महागाईच्या दरात अन्नपदार्थांचा वाटा जवळपास ५० टक्के आहे. महिना-दर-महिना आधारावर त्याची महागाई ८.३९ टक्क्यांवरून ६.०२ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. त्याच वेळी, ग्रामीण महागाई ५.७६ टक्क्यांवरून ४.६४ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे आणि शहरी महागाई ४.५८ टक्क्यांवरून ३.८७ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे.

### डिसेंबरमध्ये औद्योगिक उत्पादनात ३.२ टक्के घट

**नवी दिल्ली** : खाणकाम आणि उत्पादन क्षेत्रांच्या खराब कामगिरीमुळे डिसेंबर २०२४ मध्ये भारताचा उत्पादन विकास दर ३.२ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या (आयआयपी) संदर्भात मोजले जाणारे कारखाना उत्पादन डिसेंबर २०२३ मध्ये ४.४ टक्क्यांनी वाढले. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) जारी केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले की, डिसेंबर २०२४ मध्ये उत्पादन क्षेत्राचे उत्पादन तीन टक्क्यांनी वाढले आहे.

### कर्ज घेऊन फसवणुक करणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापूर** : बनावट कागदपत्रे देऊन ११ लाख ४१ हजार ३८५ रुपयांचे कर्ज घेऊन फसवणुक करणाऱ्या पाचजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अभिषेक सदानंद पोखरकर (वय २७, रा. सात रस्ता, विनेक्स मॉल, दुसरा मजला, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राहुल भैरवनाथ यादव, दिपाली हणुमंत बनसोडे, जिवन दगडू खांडेकर, नागनाथ कोंडीबा सलगर, समाधान शामराव सलगर (सर्व रा. पुळूजवाडी, ता. पंढरपूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल यादव, दिपाली बनसोडे, जिवन खांडेकर, नागनाथ सलगर, समाधान सलगर यांनी मिळून जिवन खांडेकर याच्या नावे असलेली मिळकत क्र. ७३५ ची खोटी बनावट कागदपत्रे तयार करून ती खरी असल्याचे भासवून मिळकत क्र. ७३५ चा खरेदीदस्त क्र. १६९९/२४ करून अभिषेक पोखरकर याच्या फायनान्सला गहाणखत १८१३/२४ प्रमाणे करून फायनान्सकडून ११ लाख ४१ हजार ३८५ रुपये गृहकर्ज घेतले. ही बाब निदर्शनास आल्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत.



माघी पौर्णिमेनिमित्त प्रयागराज येथील पवित्र संगमावर बुधवारी झालेली ही भाविकांची प्रचंड गर्दी. महाकुंभात माघी पौर्णिमेला दीड कोटी भाविकांनी स्नान केल्याचा अंदाज आहे. आतापर्यंत ४६.२५ कोटी भाविकांनी संगमात पवित्र स्नान केले

# आणखी एका प्रकरणात सज्जनकुमार दोषी

**१८ फेब्रुवारीला शिक्षेची सुनावणी**

**४१ वर्षांनंतर आला निकाल**

◆ **नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

दिल्लीतील न्यायालयाने बुधवारी आणखी एका शीख दंगल प्रकरणात काँग्रेसचे माजी खासदार सज्जनकुमारला दोषी ठरवले आहे. राऊस अव्हेन्यू न्यायालय १८ फेब्रुवारी रोजी शिक्षा सुनावणार आहे.

खटल्याचा निकाल ४१ वर्षांनंतर आला आहे. १९८४ च्या शीखविरोधी दंगलीदरम्यान सरस्वती विहारमध्ये दोन शिखांच्या हत्येचा हा खटला आहे. १ नोव्हेंबर १९८४ रोजी पश्चिम दिल्लीतील राजनगर पार्ट-१ मध्ये सरदार जसवंतसिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीपसिंग यांची हत्या करण्यात आली. दंगेखोर जमावाचे नेतृत्व सज्जकुमार करीत होता. या प्रकरणी दिल्लीतील सरस्वती विहार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याआधी डिसेंबर २०१८ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या दुहेरी खंडपीठाने सज्जनकुमारला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्याला हिंसाचार आणि दंगल भडकवल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले. तो आधीच तिहार तुरुंगात शिक्षा भोगत आहेत. सज्जन कुमारविरुद्ध दंगल, खून आणि दरोडा या आरोपाखाली भारतीय दंड संहितेच्या कलम १४७, १४९, १४८, ३०२, ३०८, ३२३, ३९५, ३९७, ४२७, ४३६, ४४० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यापूर्वीही एका प्रकरणात सज्जनकुमार शिक्षा भोगत आहे. (वृत्तसंस्था)

# मोफत धान्य-पैसे दिल्यास लोक काम करणार नाहीत

**सुप्रीम कोर्टाचा संताप**

◆ **नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

लोकांना धान्य आणि पैसे मोफत मिळत राहिले तर त्यांना काम करण्याची इच्छाच राहणार नाही. त्यांना मोफत रेशन मिळत आहे आणि कोणतेही काम न करता पैसे मिळत आहेत, हे सांगणे दुःखद आहे. पण, आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात आणता येऊ शकणार नाही का? ते देशाच्या विकासात योगदान देऊ शकणार नाहीत का? अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत आहोत का, अशा शब्दांमध्ये सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या मोफत योजनांवर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी संताप व्यक्त केला.

शहरी भागातील बेघर लोकांना आश्रय देण्यासाठी योजनांना निधी देणे बंद केल्या प्रकरणी दाखल याचिकेवर न्या. भूषण गवई आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली. न्यायासनाने स्पष्ट केले की, अशा मोफत योजनांमुळे लोक काम करणे सोडून देतात. त्यामुळे लोक परावलंबी होत आहेत. न्या. गवई म्हणाले की, हे सांगताना खूप दुःख होते की आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात सामील करता येऊ शकत नाही का? ते देशाच्या विकासात योगदान देऊ शकणार नाहीत का? अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करीत आहोत का, असा सवाल करीत सरकारच्या मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास टाळाटाळ करताहेत. त्यांना कोणतेच काम न करता मोफत योजनांमुळे रेशन व पैसे मिळतात, असे संतप्त उद्‌गार काढले.

याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी युक्तिवाद केला की, सरकारने शहरातील बेघर लोकांना आश्रय देण्यासाठी असलेल्या योजनांना निधी देणे बंद केले आहे. परिणामी, यावर्षी देशभरात ७५० बेघर लोक थंडीने गारठून मेले. न्यायालयात राजकीय घोषणाबाजी करण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे न्यायालयाने म्हटले. (वृत्तसंस्था)

# भारत-फ्रान्स उभारणार प्रगत अणुभट्ट्या

**मोदी-मॅक्राँ यांच्यात चर्चा**

**परराष्ट्र मंत्रालयाची माहिती**

◆ **नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

भारत-फ्रान्स संयुक्तपणे प्रगत अणुभट्ट्या उभारण्यासाठी एकत्र काम करणार आहे. ऊर्जा सुरक्षितता आणि कार्बनमुक्त ऊर्जा निर्मितीवर दोन्ही देश सहमत आहेत. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी अणुऊर्जा महत्त्वाचा घटक ठरू शकतो. या मुद्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्यात चर्चा झाल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात दिली.

पंतप्रधान मोदी यांच्या दोन दिवसीय फ्रान्स दौऱ्यात मॅक्राँ यांच्याशी विविध द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा झाली. यात संयुक्तपणे प्रगत अणुभट्ट्या उभारण्यावर एकत्र काम करण्याचा मुद्दा महत्त्वाचा ठरला. दोन्ही देशांनी छोट्या अणुभट्ट्या अर्थात् स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर आणि अत्याधुनिक अणुभट्ट्या अर्थात् ॲडव्हॉन्स मॉड्युलर रिॲक्टर संयुक्तपणे उभारण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. कार्बनमुक्त ऊर्जा आणि अर्थव्यवस्थेच्या विकासात अणुभट्ट्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे दोन्ही नेत्यांनी अधोरेखित केले. दोन्हा नेत्यांनी अणुऊर्जेचा वापर शांततापूर्ण वापरासाठी आणि विकासासाठी करण्यावर भर दिला.

२० हजार कोटींचा निधी जाहीर

अणुऊर्जा अभियानासाठी केंद्र सरकारने २० हजार कोटींचा निधी जाहीर केला आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून भारत २०३३ पर्यंत किमान पाच स्वदेशी अणुऊर्जा भट्ट्यांची निर्मिती करणार आहे. यासाठी खाजगी कंपन्यांची मदत घेणार आहे. यासाठी कायद्यात सुधारणा करण्याचा विचार आहे. सध्या देशात अणुऊर्जा प्रकल्पातून ४६२ गिगावॅट अर्थात् एकूण ऊर्जेच्या १.८ टक्के ऊर्जा निर्मिती केली जाते.

**सुरक्षा परिषदेच्या सुधारणांवर चर्चा**

दोन्ही नेत्यांनी जागतिक आव्हानांवर चर्चा केली. यात संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याची आवश्यकता व्यक्त केली. यावेळी फ्रान्सने परिषदेत भारताला स्थायी सदस्यता देण्यासाठी पाठिंबा दर्शविला. परिषदेत व्हिटोचा दुरुपयोग रोखण्यासाठी नियमांत बदल करण्याची आवश्यकता असल्याचे मत दोन्ही नेत्यांनी व्यक्त केले. याशिवाय अतिरेक्यांना करण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीवर चिंता व्यक्त केली. अतिरेक्यांच्या ठिकाणांवर कारवाई करण्यासाठी उपाययोजना करण्यावर यावेळी दोन्हा नेत्यात एकमत झाले. (वृत्तसंस्था)



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्या हस्ते बुधवारी मार्सिले येथे भारतीय वाणिज्य दूतावासाचे उद्‌घाटन करण्यात आले

### भारतात गुंतवणूक करण्याची हीच वेळ

भारत २०४७ पर्यंत विकसित देश बनण्याच्या दिशेने काम करीत आहे. त्यामुळे उद्योजकांना भारतात गुंतवणूक करण्याची हीच योग्य वेळ आहे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्समधील गुंतवणूकदारांना केले. १४ व्या भारत-फ्रान्स सीईओ फोरमला मंगळवारी संबोधित करताना मोदी म्हणाले, भारत आणि फ्रान्स हे दोन्ही देश सर्वोत्तम विचारांचा संगम आहे. तुम्ही सर्वजण नवोन्मेष, सहयोग आणि एकात्मिकतेचे लक्ष्य समोर ठेऊन काम करीत आहात. तुमच्यामुळेच भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारी मजबूत होत आहे.

### सावरकरांचे शौर्य प्रेरणा देत राहील

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांचे शौर्य भारतासह जगातील भावी पिढींना प्रेरणा देत राहील, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सच्या दौऱ्यात मार्सेल येथे भेट देऊन सावरकरांना आदरांजली वाहिली.

'एक्स'वरील पोस्टमध्ये मोदी यांनी म्हटले की, भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मार्सेलच्या नागरिकांचे विशेष स्थान आहे. या शहरात वीर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजांच्या तावडीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी मार्सेलच्या नागरिकांनी व फ्रेंच आंदोलकांनी सावरकर यांना ब्रिटिशांच्या ताब्यात देऊ नये, अशी भूमिका घेतली होती. यामुळे मी येथील जनतेचे आभार मानतो. वीर सावरकर यांचा लढा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.


# राममंदिराचे मुख्य पुजारी सत्येंद्र दास कालवश

**८५ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास**

◆ **लखनौ, १२ फेब्रुवारी**

राममंदिराचे मुख्य पुजारी सत्येंद्र दास यांचे बुधवारी निधन झाले. त्यांनी वयाच्या ८५ व्या वर्षी लखनौ पीजीआय येथे अखेरचा श्वास घेतला. ३ फेब्रुवारी रोजी मेंदूत रक्तस्राव झाल्यानंतर आचार्य सत्येंद्र दास यांना गंभीर अवस्थेत लखनौ पीजीआयच्या न्यूरॉलॉजी वार्डच्या एचडीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनावर तीव्र शोक व्यक्त केला आहे.

आचार्य सत्येंद्र दास यांचे आज सकाळी ८ वाजता निधन झाले. त्यांचे पार्थिव पीजीआयहून अयोध्येत नेण्यात आले.



गुरुवारी अयोध्येत शरयू नदीच्या काठावर त्यांच्या पार्थिवावर अन्त्यसंस्कार होणार आहेत.

फेब्रुवारी १९९२ मध्ये वादग्रस्त जमिनीमुळे रामजन्मभूमीची जबाबदारी जिल्हा प्रशासनाकडे सोपवण्यात आली.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आचार्य सत्येंद्र दास यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. महान रामभक्त, श्री रामजन्मभूमी मंदिर, अयोध्या धामचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र कुमार दास महाराज यांचे निधन अत्यंत दुःखद आहे. सामाजिक आणि आध्यात्मिक जगताचे कधीही भरून न निघणारे नुकसान आहे. त्यांना विनम्र श्रद्धांजली, असे त्यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये लिहिले आहे.

राममंदिर भवन निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र विश्वस्त आणि अयोध्या राजघराण्याचे नेते विमलेंद्र मोहन प्रताप मिश्रा, डॉ. अनिल मिश्रा, गोपालजी यांनीही शोक व्यक्त केला. (वृत्तसंस्था)

### मोदींच्या विमानावर हल्ल्याची धमकी

◆ **मुंबई, १२ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विमानावर हल्ला होण्याची धमकी देण्यात आली. ११ फेब्रुवारी रोजी मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला पंतप्रधान मोदींच्या विमानावर दहशतवादी हल्ला करू शकतात, असा इशारा देणारा फोन आला.

मुंबई पोलिसांनी याबाबत सर्व सुरक्षा यंत्रणांना सतर्क केले होते. तथापि, बुधवारी पोलिसांनी चेंबुर परिसरातून एका व्यक्तीला अटक केली. पोलिसांनी सांगितले की, पकडलेला व्यक्ती मानसिक रुग्ण आहे.

गेल्या चार महिन्यांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याची धमकी देण्याची ही दुसरी घटना आहे. यापूर्वी नोव्हेंबर २०२४ मध्ये मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला धमकीचा फोन आला होता. (वृत्तसंस्था)




अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताने इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात १४२ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. सलामीवीर शुभमन गिलने ११२ धावांची शानदार खेळी केली. त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला

# गॅरेज चालकाच्या दोन्ही मुलींचे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी**

आर्थिक परिस्थितीमुळे पाचवी पर्यंतच शिकलेल्या वडिलांच्या जिद्दीमुळे मुलींनी दृढनिश्चय करून अपूर्व यश संपादन करून दाखविलं आहे. सोलापूरच्या गवळी वस्तीमधील पत्र्याच्या घरात राहणाऱ्या गॅरेज चालकाच्या दोन्ही मुलींनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशाचा झेंडा रोवला आहे.

संजीवनी आणि सरोजिनी अशी त्या दोन सख्ख्या बहिणीची नावे. ज्योतीराम भोजने हे गॅरेज चालवितात. गृहिणी आई रेश्मा, भाऊ श्रीनिवास याने खंबीर साथ दिल्याने या यशाला गवसणी घातल्याचे संजीवनी आणि सरोजिनी भोजने यांनी सांगितले. दोन्ही मुलींनी बीकॉम पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. २०१८ पासून एमपीएससी अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देण्याला सुरुवात



केली आणि अखेर यशाचा झेंडा रोवलाच. मंगळवारी रात्री साडेआठ वाजता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि कामगार वस्तीतल्या भोजने यांच्या घरात एकच आनंदोत्सव साजरा झाला. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक होती. अनेकांनी मदतीचा हात दिला. आणि आज सोनेरी दिवस उजाडला, अशी प्रतिक्रिया संजीवनी आणि सरोजिनी यांचे वडील ज्योतीराम भोजने यांनी दिली.

# राजन साळवींनी सोडला उद्धव ठाकरे गट

**हाती घेणार धनुष्यबाण?**

◆ **मुंबई, १२ फेब्रुवारी**

उद्धव ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते राजन साळवी यांनी उपनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. गुरुवार, १३ फेब्रुवारी ते शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून राज्यात एकनाथ शिंदे गटातून मिशन टायगरची जोरदार चर्चा सुरू होती. या मिशन टायगरच्या अंतर्गत ठाकरे गटाचे राजन साळवी शिंदे गटात प्रवेश करणार आहेत.

विधानसभा निवडणुकीमध्ये दारुण पराभव झाल्यानंतर ठाकरे गटाला गळती लागली आहे. अनेक नेते नाराज असून इतर पक्षांमध्ये प्रवेश करत आहेत. ठाकरे गटातील नेते राजन साळवी हे देखील मागील अनेक दिवसांपासून नाराज होते. त्यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यानंतर त्यांनी भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी चर्चा होती. (वृत्तसंस्था)

# 'इंडियाज गॉट लॅटेंट'प्रकरणी पाच जणांना समन्स

**अलाहाबादीची क्षमायाचना**

**युट्युबवरून आक्षेपार्ह भाग वगळला**

◆ **मुंबई, १२ फेब्रुवारी**

'इंडियाज गॉट लॅटेंट'मधील युट्युबर रणवीर अलाहाबादियाच्या आक्षेपार्ह विधानानंतर वाद सतत वाढत आहे. दरम्यान, युट्युबने वादग्रस्त व्हिडीओ काढून टाकला आहे. सोबतच या शोचे एकूण १८ व्हिडीओ युट्युबवरून आदेशानुसार हटवण्यात आले आहेत. या प्रकरणी एकूण पाच जणांना सायबर सेलकडून समन्स जारी झाल्याचे वृत्त आहे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर, समय रैना आणि रणवीर अलाहाबादिया यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी घडलेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली. पोलिसांनी दोघांनाही तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यास सांगितले आहे. वास्तविक, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने युट्युबला पत्र लिहून हा भाग प्लॅटफॉर्मवरून काढून टाकण्याची मागणी केली होती. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### नोटरीद्वारे करार करुन ३५ लाखांची फसवणूक; चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

स्टॅम्पपेपरवर नोटरीद्वारे करार करून लुम मशिन विकण्याचे सांगून ३५ लाख रुपयांची फसवणुक करणाऱ्या चौघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत श्रीकांत गणेश शेरला (वय ३९, रा. जवाहर नगर, विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजू विनायक आडम, निकिता राजू आडम, शिवराज विनायक आडम आणि विनायक आडम (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.राजू आडम यांच्या मालकीची लुम मशिन होती. आडम यांच्या मालकीची रिकंडीशन टेरी टॉवेल रॅपियर लुम इलेक्ट्रॉनिक डॉबीसहीत असणारी लुम मशिन विक्रि करणार आहे असे सांगून १० एप्रिल २०२४ रोजी श्रीकांत शेरला यांच्याकडून ३५ लाख रुपये घेतले. याबाबत मे. सविता टेक्स्टाईलकडून राजू आडम याने २० एप्रिल २०२४ रोजी सोलापूर जिल्हा न्यायालय येथे ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर सरकारी नोटरीद्वारे करारनामा केला होता. परंतु, शेरला यांना अद्यापपर्यंत कोणतेही साहित्य न देता आडम यांनी शेरला यांची फसवणुक केली. शेरला यांनी दिलेल्या पैशाबाबत विचारणा केली असता आडम यांनी शेरला यांना शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

### अल्पवयीन मुलीशी विवाह करून जबरदस्तीने केला अत्याचार

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

अल्पवयीन मुली बरोबर विवाह करून जबरदस्ती तिच्याबरोबर शारीरिक संबंध ठेवणाऱ्या पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये टायगर ग्रुप मधील एका महिला सदस्याचा समावेश आहे. याबाबत अल्पवयीन पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील मुख्य आरोपी बरोबर पीडीतेच्या बहिणीचा विवाह गतवर्षी झाला होता. विवाहाच्या काही दिवसानंतरच सासर कडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून पीडीतेची बहीण ते घर सोडून निघून गेली. यानंतर पिडीता अल्पवयीन असल्याचे माहित असूनही यातील एका आरोपी बरोबर तिचा विवाह करण्यात आला. विवाह नंतर त्या आरोपीने पीडिता ही अल्पवयीन असतानाही तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. त्यादरम्यान आरोपीने पिडीता तसेच तिच्या आई-वडिलांना शिवीगाळ व मारहाण करून धमकावले. या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.

### बायकोबरोबर वाद; पतीने केले विष प्राशन

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

पत्नी बरोबर झालेले वादा नंतर पतीने विषारी द्रव्य प्राशन केले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप हा प्रकार परिसरात घडला. हिरालाल दशरथ पारते (वय २१ रा. लोही मध्यप्रदेश सध्या रा. मंद्रुप) या तरूणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार ११ फेब्रुवारी रोजी रात्री १०.३० वाजता घडला. हिरालाल याने राहत्या घरी पत्नी सोबत तक्रार झाल्याने रागाच्या भरात विषारी द्रव्य प्राशन केले . हिरालाल यास मंद्रुप येथील सरकारी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### घरगुती वादातून पती-पत्नीस बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

मोहोळ येथील रेल्वे स्टेशन जवळील राहत्या घरात घरगुती वादातून ८ जणांनी मारहाण करून पती पत्नीला जखमी केले. ही मारहाण ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमाराला झाली. साखराबाई दादा चव्हाण (वय ६०), दादा सावळा चव्हाण (वय ६५) असे जखमी झालेल्यांची नावे आहेत. दोघांना मोहाळ येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले होते. तेथून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

### ट्रॅक्टरला धडकून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील खंडाळी येथून आष्टीरोड कचरे येथे जात असताना दिड कि.मी. अंतरावर अचानक ट्रॅक्टर अडवा आल्याने धडक बसून एकजण जखमी झाला. लहू कालिदास जाधव (वय ३७ रा. उपळाई (बु) ता. माढा) अशी जखमीचे नाव आहे. हा अपघात ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता घडला. लहू याला पंढरपूर येथील खासगी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. ..

### दुचाकी घसरून अपघात; चालक जखमी

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

झरे ते पंढरपूर दुचाकीवरून येत असताना, खिलारवाडी (सांगोला) पाटी येथे दुचाकी घसरून अपघात झाला. यात सिद्धनाथ सर्जेराव ताड (वय ४६ रा. बोहाळी रोड पंढरपूर जि. सोलापूर) हा इसम जखमी झाला. हा अपघात ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता घडला. सिद्धनाथ यांना पंढरपूर येथील खासगी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी भाऊ महादेव ताड यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

# कुख्यात गुंड भागप्पा हरीजनचा निर्घृण खून

- विजयपूर शहरातील घटना
- पूर्ववैमनस्यातून काढला काटा

**तभा वृत्तसेवा । दीपक शिंत्रे**
**विजयपूर, दि. १२ फेब्रुवारी-**

विजयपूर जिल्ह्यासह सीमा भागातील भीमा नदीकाठ परिसरात अनेक गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या कुख्यात रौडीशुटर भागप्पा हरीजन (वय ५०) याची मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास निघृणपणे खून करण्यात आला.



ही घटना विजयपूर शहरातील आकाशवाणी केंद्रासमोर असलेल्या मदिनानगर येथे भागप्पा राहत असलेल्या भाड्याच्या घराजवळच घडली आहे. जेवण करून वाकिंग करण्यासाठी बाहेर पडलेल्या भीमप्पा याच्यावर काही अज्ञातांनी हल्ला करून प्रारंभी गोळ्या झाडल्या.नंतर धारधार हत्याराने त्याच्या शरीर, चेहऱ्यावर अनेक वार केले. घटनास्थळी जिल्हा पोलिस प्रमुख लक्ष्मण निंबरगी यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धाव घेऊन पाहणी केली. भीमाकाठ व विजयपूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात घडलेल्या खून, दरोडा, खंडणी, गोळीबार, धमकी देणे यासह खूनप्रकरणी सहभागी असलेल्या कुख्यात रौडीशुटर भागप्पा हरीजन मूळचा आलमेल तालुक्यातील ब्याडगीहाळ गावाचा. त्याचावर सहा खूनप्रकर व चार इतर प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. जिल्हा पोलिस प्रमुख लक्ष्मण निंबरगी यांनी दिलेल्या माहितीनुसार चार ते पाच जणांनी भागप्पा याच्यावर हा हल्ला केला असून अधिक तपास सुरू असल्याचे सांगितले.

### धोत्रीतील थरार... चंद्याचे एन्काउंटर; भागप्पाचा पोलिसांवर गोळीबार

मुख्यतः २००० साली दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथे पोलिसांनी कुख्यात रौडीशुटर चंदप्पा हरिजन याचा एन्काउंटर केले होते, त्यावेळी भागप्पा याने पोलिसांवर गोळीबार केला होता. त्यानंतर तो अनेक गुन्ह्यांमध्ये सहभागी होता.

### भागप्पा हरीजनची पार्श्वभूमी

भागप्पा हरिजन हे मूळचे अलमेल तालुक्यातील ब्याडगीहाळ येथील असून सुरुवातीपासूनच भीमाकाठच्या कुख्यात गुंड चंदप्पा हरीजन याचा सहकारी. पुढे भागप्पानेदेखील तोच मार्ग अवलंबला आणि त्याच्यावर चंदप्पासोबत अनेक खून प्रकरणांमध्ये सहभागी असल्याचा आरोप होता.

### भागप्पाविरुद्ध १० गुन्हे

भागप्पा हरिजन यांच्याविरुद्ध विविध पोलिस ठाण्यात एकूण दहा गुन्हे दाखल आहेत. ज्यात खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी, दरोडा, गोळीबार आणि धमकी देणे याचा समावेश आहे. चंदप्पावर हरिजनचा नातेवाईक मुथुराजाची हत्या केल्याचाही त्याच्यावर आरोप आहे.

### २०१७ मध्ये त्याच्यावर झाडल्या होत्या गोळ्या

८ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी १०.४० वाजता जिल्हा न्यायालयाच्या आवारात भागप्पा हरिजन यांची गोळ्या घालून हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आले होते. तीन गोळ्या शरीरात घुसूनही तो वाचला होता. २००० मध्ये भीमातीराचा चंदप्पा हरिजन पोलिस चकमकीत मारला गेल्यानंतर, १४ वर्षांनंतर चंदप्पाचा भाऊ बसवराज हरिजनची हत्या करण्यात आली होती. यामध्ये भागप्पा सहभागी असल्याचे सांगण्यात आले. जर परिस्थिती अशीच चालू राहिली तर भागप्पा आपल्यापैकी कोणालाही सोडणार नाही असा विचार करून, चंदप्पाच्या भावाचा मुलगा भीमा हरिजन याने त्याच्या ओळखीच्या लोकांना सुपारी देऊन त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला. यावेळी सुपारी घेतलेल्यानी न्यायालयाच्या आवारात भागप्पावर तीन गोळ्या झाडल्या, परंतु उपचारानंतर भागप्पा बचावला. काल मात्र त्याचा शेवट झाला. चंदप्पाच्या एकेकाळी सहकारी असलेल्या भागप्पा व चंदप्पा यांनी मोठ्या प्रमाणात मालमत्ता केली होती. चंदप्पाच्या हत्येनंतर मालमत्तेचे वाटपावरून चंदप्पाचा भाऊ बसवराज व भागप्पा हरीजन यांच्यात वैमनस्य निमर्ण झाले होते करोडो रुपयांची मालमत्तांचे वाटणी वरुन ही घटना घडली असल्याची चर्चा करण्यात येत आहे.

### कु-कर्म...

- १९ जुलै २०२० रोजी त्याने भारतीय सोने व्यापाऱ्याला तीन किलो सोने किंवा ५ कोटी रुपयांची मागणी करून धमकी दिल्याचा आरोप आहे.
- १९९७ मध्ये चडचण पोलिस स्टेशन परिसरात झालेल्या एका हत्येत भागप्पा सहभागी असल्याचा आरोप आहे
- १९९८ मध्ये आळंद पोलिस ठाण्यात हद्दीत झालेल्या दोन खून आणि एका अपहरण प्रकरणातही त्याचे नाव आले होते.
- १९९९ मध्ये अलमेल पोलिस स्टेशन परिसरात झालेल्या एका हत्येत त्याचे नाव गोवले गेले होते
- २००० मध्ये पोलिसांवर गोळीबार, ब्याडगीहाळ येथे खून, आळंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत खून
- २००१ मध्ये अलमेल पोलिस स्टेशन परिसरात साक्षीदारांवर गोळीबार आणि खून केल्याचा आरोप.
- २००३ मध्ये अफजलपूर तालुक्यातील शिरोळ येथे झालेल्या चार जणांच्या हत्येत सहभागी असल्याचा आरोप.




## बार्शीत क्रेडाई प्रदर्शनाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ फेब्रुवारी-**

बार्शी क्रेडाईच्यावतीने घेण्यात आलेल्या प्रॉपर्टी एक्स्पोच्या तीन दिवसांच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनाचा समारोप माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आला.

भगंवतं मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आलेल्या स्टॉलवर विविध प्रकारचे बांधकाम साहित्य ठेवण्यात आले होते. बार्शी, तुळजापूर, धाराशिव, भूम, परांडा, सोलापूर आदी भागांतून बांधकाम व्यावसायिक व नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट दिली. समारोपावेळी बोलताना माजी आमदार राजेंद्र राऊत म्हणाले, राजकारणा जय, पराजय चालत असतो. बार्शी तालुक्याच्या विकासासाठी आपण कटिबध्द आहोत. येणाऱ्या काळात बार्शीत अशा प्रकारचे प्रदर्शन दरवर्षी भरवले जावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रोजेक्ट चेअरमन अमर काळे तसेच समीर वायकुळे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना क्रेडाई बार्शीचे अध्यक्ष सतीश अंधारे म्हणाले, तीन दिवसांत या प्रदर्शला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आमच्यासाठी हा प्रतिसाद म्हणजे भविष्यातील असे उपक्रम राबविले जावेत यासाठी मिळालेले बळ आहे. कार्यक्रमासाठी उद्योजक सुनील भराडीया तसेच सचिन, समाधान पाटील, भारत परमार, अमित इंगोले, रुपेश कांकरिया, अतुल गुंडेवार, नितीन देशमुख आदी उपस्थित होते. तीन दिवस स्टॉलधारकांच्या मुलाखती घेण्याचे काम ॲड. विक्रम सावळे यांच्यावतीने करण्यात आले. सूत्रसंचालन नीता देव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बार्शी क्रेडाईच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री फडणवीस, पद्मजादेवी मोहिते-पाटील यांची बंद दाराआड चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १२ फेब्रुवारी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सोलापूर विद्यापीठ उच्च शिक्षण संस्था चालक संघटनेच्या अध्यक्षा, सिनेट सदस्या पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांची मंगळवारी सायंकाळी मुंबई येथे बैठक झाली असून या बैठकीसाठी माळशिरसचे माजी आ. राम सातपुते यांच्यासह उर्वशीराजे मोहिते-पाटील याही उपस्थित होत्या. जवळपास ४० मिनिटे बंद दाराआड चाललेल्या या बैठकीत सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यातील विविध विषयांवर सखोल चर्चा झाल्याची माहिती दिली.

माळशिरस तालुक्यात अडचणीत आलेल्या विविध सहकारी संस्था, त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना, जिल्ह्याच्या व माळशिरस तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अल्पावधीतच अनेक योजना जिल्हासह तालुक्यात कार्यान्वित होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच माळशिरस तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत, त्यांचा तालुक्याच्या वतीने अकलूज येथे नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार असून यावेळी माळशिरस तालुक्यातील विविध विकासकामांचे उद्घाटनही होणार असल्याची माहिती देण्यात आली.



**जुन्या आठवणींना उजाळा :** मुख्यमंत्र्यांनी लोकनेत स्व. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांचे तत्कालीन सोलापूर लोकसभा निवडणुकीतील प्रसंग, सन २०१३ साली अकलूज येथील शेतकरी मेळाव्यातील तत्कालीन भाजपाध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांचे भाषण, जनसेवा संघटनेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या रक्तदान शिबिरासह अकलूज येथील प्रतापगडावरील आठवणींना उजाळा देऊन जनसेवा संघटनेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. जुन्या आठवणींना उजाळा दिला.

## वैरागमध्ये पोलिस कर्मचाऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि १२ फेब्रुवारी-**

सोलापूर येथे कार्यरत असलेले व वैराग (ता. बार्शी) येथे राहणारे पोलीस कॉन्स्टेबल महेश पाडुळे यांनी बुधवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेतली. वैराग पोलिसात आकस्मित मयत म्हणून नोंद झाली आहे.



महेश जोतीराम पाडुळे (वय ४५, रा. अंजनगाव, ता. माढा) येथील रहिवाशी आहेत. सध्या ते सोलापूर मुख्यालय येथे ते सेवेत कार्यरत होते. यापूर्वी त्यांनी वैराग पोलीस ठाण्यात सेवा केली होती. सध्या ते वैराग येथेच राहत होते. वैराग येथे त्यांनी बुधवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेतला असता त्यांना मयत अवस्थेत वैराग मल्टिस्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता त्यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबतची खबर डॉ. सागर शिंदे यांनी वैराग पोलिसात दिली आहे. महेश पाडुळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव हे करीत आहेत.

## जिल्ह्यात ९४ लाख ६७ हजार मे.टन ऊस गाळप

### महिनाखेर साखर कारखान्यांचे पडणार पट्टे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

२०२४-२५ चा गळीत हंगामही १५ नोव्हेंबरपासून सुरु झाला असून, या हंगामात गतवर्षी दुष्काळाचा फटका उसाला बसल्याने सोलापूर जिल्ह्यात आजतागायत अवघे ९४ लाख ६६ हजार ८४७ मेट्रीक टन इतकाच ऊस गाळप होवून ७८ लाख ८८ हजार ३८१ क्विंटल साखर उत्पादन झाले आहे. सध्या १४ ते १५ साखर कारखाने बंद झाले आहेत. तर उर्वरित सर्व साखर कारखान्यांचे पट्टे या महिनाखेरे पडणार आहेत.

यावर्षी १५ नोव्हेंबरपासून जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्यांची धुराडी पेटली होती. गतवर्षी जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी ऊस मुबलक असल्याने १७० लाख मे. टन ऊस गाळप केला होता. यंदा मात्र ऊस कमी असल्याने गाळपही कमी होवून साखर उत्पन्नही कमीच होणार आहे. या महिनाखेर जिल्ह्यातील सर्वच साखर कारखाने बंद होणार असून, ११० ते ११५ लाख मे. टनापर्यंत यंदा ऊस गाळप जाण्याचे संकेत मिळत आहेत. २०२३-२४ साली दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने अनेकांनी ऊस मोडून इतर पिकांना मान्यता दिली, तर काही ठिकाणी ऊस पिके पाण्याअभावी जळून गेली. त्यातच सीमावर्ती भागात काही साखर कारखाने लवकर सुरु होत असल्याने त्या साखर कारखान्यातही आपला ऊस मोठ्या प्रमाणात गेला आहे. यामुळे शिवारात उभा होता तितकाच ऊस यंदा साखर कारखान्यांना मिळाल्याने यंदा लवकरच हंगाम आटोपता घ्यावा लागला.



दरवर्षी राज्यात सर्वाधिक ऊस सोलापूर जिल्ह्यात गाळप दोवून साखर उत्पन्नही मोठ्या प्रमाणात होते. यंदा सरासरी ऊस कमी असला तरीही पावसाच्या सरासरीच्या तुलनेत दीडपट पाऊस पडल्याने ऊस लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. यामुळे २०२५-२६ च्या गाळपात महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उसाचे उत्पन्न सोलापुरात होणार आहे. कारण यंदा जूनपासूनच प्रत्येक नक्षत्रात मोठा पाऊस झाला होता. उजनी धरणही ओव्हरफ्लो झाले आहे. यामुळे जिल्ह्यात पाण्याचा मोठा पाणीसाठा आहे. या कारणामुळे आगामी वर्षाच्या गळीत हंगामासाठी जिल्हयात मुबलक ऊस लागवड झाली आहे.

## अक्कलकोटमध्ये उद्यापासून पुराण, धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ फेब्रुवारी-**

येथील आझाद गल्लीत श्री अक्कमहादेवी प्रतिष्ठापनेच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त १४ ते २४ फेब्रुवारीपर्यंत श्री कलबुर्गी शरणबसप्पा चरित्रावरील पुराण व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून सांगता समारंभाच्या दिवशी सायंकाळी धर्मसभा, पुराण समाप्ती व हजारो भाविकांना खिरीचे महाप्रसाद वाटप होणार आहे.

विरक्त मठाचे मठाधिपती श्री.म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली हत्तीकणबस मठाचे मठाधिपती श्री. प्रभुप्रशांत महास्वामीजी यांच्या उपस्थितीत महादासोही कलबुर्गी शरणबसप्पा यांच्या जीवनचरित्रावर दहा दिवस उमराणी येथील श्री. मृगेंद्र शास्त्री यांच्या अमृतवाणीने आणि संगीत- विरपाक्षय्या गौडगाव, तबला- बसवराज आळंद यांच्या साथसंगतीने घाणदेवी मंदिर






मैदानावर दररोज सायंकाळी ५ वाजता प्रवचन होणार आहे.शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता पुराण व प्रवचनचे उद्घाटन श्रीक्षेत्र बु-हाणपूर सिध्दयप्पा देवस्थानचे अध्यक्ष नागलिंगय्या स्वामी, ज्येष्ठ समाजसेवक मल्लिनाथ स्वामी, सिध्दाराम येरगुंटे,श्री मल्लिकार्जुन देवस्थानचे अध्यक्ष शिवलिंगय्या स्वामी, प्रसिद्ध व्यापारी सुर्यकांत बिराजदार, समाजसेविका मल्लम्मा पसारे व वीरशैव महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनंदा तेली यांच्या उपस्थितीत होणार आहे. या पुराण व प्रवचनात रविवारी दि. १६ सायंकाळी सात वाजता पाळणा कार्यक्रम होईल. शुक्रवारी दि.२१ सायंकाळी सात वाजता भारती संजय समाने यांच्या वतीने सुहासिनींचा ओटी भरणे कार्यक्रम होणार आहे.या प्रवचन सोहळ्यात दररोज रात्री आठ वाजता महाप्रसाद वाटप होणार आहे.

सोमवारी दि. २४ पहाटे पाच वाजता श्रीची महाअभिषेक व पूजा, त्यानंतर सायंकाळी ५ वाजता श्रीक्षेत्र हिरेजेवरगी संस्थान श्री शांतलिंगेश्वर हिरेमठचे मठाधिपती श्री.ष.ब्र. जयगुरुशांतलिंगराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांची धर्मसभा होणार असून प्रमुख अतिथी म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी,माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे व माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी श्री अक्कमहादेवी मंदिर समाजसेवा संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल भरमशेट्टी, उपाध्यक्ष शिवशंकर चनशेट्टी व सचिव लक्ष्मण समाने यांचे सहकार्य लाभत आहे.

## क्रीडा महोत्सव शिबिरासाठी समृद्धी वायकुळेची निवड

**बार्शी, दि. १२ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाच्या सराव शिबिरासाठी बार्शीची बॅडमिंटनपटू समृध्दी वायकुळे हिची निवड झाली आहे.



विद्यापीठांतर्गत सोलापुरात डी. ए. व्ही. वेलणकर महाविद्यालयात १५ फेब्रुवारीपर्यंत हे शिबीर चालणार आहे. या शिबिरातून पुढील स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे. यापूर्वी अनेक जिल्हा व राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पधेत वायकुळे हिने चमकदार कामगिरी करत पारितोषिके पटकावली आहेत. तिचे प्राचार्य डॉ. संजय कारंडे यांनी अभिनंदन केले आहे.

## मोहोळमध्ये आजपासून श्री रामदास नवमी सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १२ फेब्रुवारी-**

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था मोहोळच्यावतीने श्री रामदास नवमी सप्ताह सोहळा गुरुवारी १३ फेब्रुवारीपासून ते शनिवारी २२ फेब्रुवारी या कालावधीत होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष माजी प्राचार्य बाजीराव जोशी व सचिव अनिल आराध्ये सर यांनी दिली.



या सप्ताहामध्ये उद्या दि१३ रोजी विनायक बुवा मोहोळकर यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व समर्थांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भक्ती मार्ग या विषयावर त्यांचे प्रवचन होईल. या सप्ताहातील सर्व प्रवचने व्यंकटेश मंदिर मोहोळ येथे सायंकाळी सहा ते सात या वेळेत होणार असून दररोज पहाटे साडेपाच वाजता शहरातून राम फेरी दुपारी एक ते चार दरम्यान दासबोध सामुदायिक पारायण व सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम, शुक्रवार दि.१४ रोजी नाम महिमा या विषयावर रणजीत शिंदे, शनिवार १५ फेब्रुवारी समर्थांची तपश्चर्या या विषयावर सोलापूरचे सुयोग केसकर यांचे, रविवार दि. १६ फेब्रुवारी दिनानाथ हा येणार आहे या विषयावर, अमित देशपांडे सोलापूर यांचे, सोमवार दि.१७ फेब्रुवारी रोजी जयवंत समुद्र यांचे मनोबोधाची भूमिका, मंगळवार दि. १८ फेब्रुवारी संजय दुनाखे यांचे उपासना व नामस्मरण बुधवार दि. १९ फेब्रुवारी प्रा.मीरा नगरकर (पुणे) समर्थाच्या सवाया, गुरुवार दि. २० फेब्रुवारी नारायण जोशी यांचे सत्संग महिमा, शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी जयेश आराध्य यांचे आता वंदू कवेश्वर या विविध विषयावर प्रवचने होणार आहेत. शनिवार दि. २२ रोजी दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी व महाप्रसाद होणार आहे. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष अलकनंदा कुलकर्णी, प्रा. नंदकुमार देशपांडे, ॲड. अमोल देशपांडे, नंदा देशपांडे, अलकनंदा कुलकर्णी, वासुदेव कुलकर्णी, दत्तात्रय कुलकर्णी, दिलीप देशपांडे परिश्रम घेत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## दिल्ली परिवहनच्या सहा अधिकाऱ्यांना अटक

**◆ नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

भ्रष्टाचार आणि लाचखोरी प्रकरणी सीबीआयने बुधवारी दिल्ली परिवहन विभागातील सहा अधिकाऱ्यांना अटक केली. आम आदमी पक्षाचा (आप) अलिकडच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर सीबीआयची ही पहिलीच मोठी कारवाई आहे.

दिल्लीतील परिवहन विभागातील भ्रष्टाचाराविरुद्ध सीबीआयकडे तक्रारी आल्या होत्या. अधिकाऱ्यांवरील कारवाईपूर्वी तक्रारींची पडताळणी करण्यात आली. तक्रारींची पडताळणी करताना विविध पातळ्यांवर भ्रष्टाचार झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली. यानंतर सीबीआयने परिवहन विभागाच्या सहा अधिकाऱ्यांना अटक केली. सीबीआयच्या कारवाईबाबत बोलताना काँग्रेसचे नेते उदित राज म्हणाले की, आम आदमी पार्टीचे सरकार भ्रष्ट होते. जल बोर्ड घोटाळा, कॅग अहवाल, दारू घोटाळा असे अनेक घोटाळे या सरकारच्या काळात झाले. आता भाजपाचे सरकार आले आहे. नवीन सरकार प्रत्यक्षात भ्रष्टाचाराविरोधात कोणती कारवाई करते ते पाहूया. (वृत्तसंस्था)

# आयात शुल्क लादल्याने जागतिक व्यापार संकटात

## ट्रम्प यांच्या निर्णयावर युरोपियन महासंघाची भूमिका



**◆ जिनेव्हा, १२ फेब्रुवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्टील आणि ॲल्युमिनियमसह विविध वस्तूंवर २५ टक्के आयात शुल्क लादण्याच्या निर्णयाला युरोपियन महासंघाने कडाडून विरोध केला. अतिरिक्त आयात शुल्क लादल्याने जागतिक व्यापार संकटात येणार असल्याचे युरोपियन महासंघाच्या प्रमुख हर्सुला वोन डेर लेयेन यांनी म्हटले आहे.

युरोपियन महासंघाच्या २७ सदस्य देशांनी आयात शुल्क लादण्याबाबत ट्रम्प यांनी घेतलेल्या निर्णयाविरोधात तक्रार केली. त्यानंतर महासंघाच्या प्रमुख लेयेन यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, अतिरिक्त आयात शुल्क लादण्याच्या ट्रम्प यांच्या अन्यायकारक निर्णयाला युरोपियन महासंघ लवकरच सडेतोड उत्तर देईल. अमेरिकेला या निर्णयाची किंमत चुकवावी लागेल. महासंघाचा या निर्णयाला तीव्र विरोध आहे. त्यांच्या निर्णयाला सदस्य देशांनी विरोध करावा, असे आवाहन त्यांनी केले. याच विषयावर जर्मनीचे चान्सलर ओलाफ स्कोल्झ म्हणाले, अमेरिकेचा निर्णय द्विपक्षीय व्यापारासाठी अन्यायकारक आहे. त्यांना अतिरिक्त आयात शुल्क लावण्याशिवाय पर्याय नसल्यास आम्हालाही कठोर निर्णय घ्यावा लागेल. युरोपियन महासंघाच्या सदस्य देशांनी एकत्र येऊन याविरोधात आक्षेप घ्यायला हवा. (वृत्तसंस्था)

### उत्पादनांच्या साखळीवर होणार परिणाम

अतिरिक्त आयात शुल्क लादल्याने उत्पादनांच्या साखळीवर तसेच व्यापार आणि गुंतवणुकीच्या करारावर विपरित परिणाम होऊ शकतो, असे युरोपियन युनियन महासंघाचे उपाध्यक्ष मारोस सेफकोव्हिक यांनी म्हटले आहे. दरम्यान २०१८ मध्ये ट्रम्प सत्तेवर असताना अशाच प्रकारे अतिरिक्त आयात शुल्क लादले होते. त्यावेळी युरोपियन महासंघाने प्रत्युत्तर देत अमेरिकेत तयार होणाऱ्या दुचाकी, बुरबॉनची उत्पादने, शेंगदाण्याचे तेल, जिन्स आदी उत्पादनांवर अतिरिक्त आयात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला होता.

# फडणवीसांनी केली 'मुंबई टेक वीक'ची घोषणा

## आशियातील सर्वांत मोठा एआय कार्यक्रम



**मुंबई, १२ फेब्रुवारी,**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबईच्या (टीम) बैठकीत मुंबईच्या टेक इकोसिस्टमला आणि आगामी मुंबई टेक वीक २०२५ : आशियातील सर्वांत मोठा एआय महोत्सवाला सरकारचा पाठिंबा जाहीर केला. मुख्यमंत्र्यांनी 'आशियातील एआय सँडबॉक्स' म्हणून मुंबईचे स्थान मजबूत करण्यात आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत व्हिजनचा प्रमुख भागीदार म्हणून या कार्यक्रमाच्या आयोजनाची शक्ती आणि महत्त्व यावर भर दिला.

मुख्यमंत्र्यांनी 'टीम'सोबतच्या भागीदारीबद्दल सरकारची वचनबद्धता अधोरेखित करून व्हिडीओ संदेशाद्वारे सर्वांना एमटीडब्ल्यू २०२५ मध्ये औपचारिकपणे आमंत्रित केले. मुंबईच्या टेक लॅण्डस्केपचा विकास करण्यासाठी 'टीम'च्या प्रभाव आणि प्रयत्नांबद्दल फडणवीस यांनी कौतुक केले. त्यांनी ६५ हून अधिक स्टार्टअप्स आणि युनिकॉर्नच्या संस्थापकांचा समावेश असलेल्या त्यांच्या लक्षणीय वाढीची नोंद केली. मुंबई ही दीर्घकाळापासून उद्योजकीय क्रियाकलापांचा पाया आहे आणि सरकार 'टीम'सोबत भागीदारीत, शहर बांधण्यासाठी नवीन युगातील उद्योजकांना पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी भागीदारीवर भर दिला आणि तंत्रज्ञानाच्या प्रतिभेचे संगोपन, महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि नवोपक्रमाला चालना देणे यावर लक्ष केंद्रित केले. मुंबई महिलांसाठी भारतातील सर्वांत सुरक्षित शहर असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी तंत्रज्ञानात महिलांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले आणि संबंधित उपक्रमांना पाठिंबा देण्याचे वचन दिले. टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबई (टीम) ही एक गैरलाभकारी, स्वतंत्र उद्योग संघटना आहे. ती मुंबईच्या टेक इकोसिस्टमला पुढे नेण्याच्या ध्येयाने स्थापन करण्यात आली आहे. शहरातील काही सर्वांत यशस्वी टेक संस्थापकांनी स्थापन केलेली 'टीम' ही मुंबईला तंत्रज्ञान उद्योजकतेचे केंद्र म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी कटिबद्ध आहे.

# अमेरिकेनंतर ब्रिटनचीही घुसखोरांवर कारवाई

### विविध भागांत छापे
### शेकडो जणांची तुरुंगात रवानगी

**◆ लंडन, १२ फेब्रुवारी**

अमेरिकेनंतर आता ब्रिटनमध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांना हद्दपार करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. बेकायदेशीर राहणाऱ्या नागरिकांची ओळख करण्यासाठी ब्रिटनच्या भागात छापे टाकण्यात येत आहे. आतापर्यंत शेकडो नागरिकांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले.

ब्रिटन सरकारने निवेदनात म्हटले की, देशात बेकायदेशीर राहणाऱ्या नागरिकांना पकडण्यासाठी



जानेवारीपासूनच मोहीम सुरू करण्यात आली. विविध भागांत केलेल्या छापेमारीत शेकडो नागरिक देशात बेकायदेशीरीत्या राहत असल्याचे आढळले. ब्रिटनमध्ये राहण्यासाठी त्यांच्याकडे कुठलेही वैध दस्तावेज आढळले नाही. अटक करून त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात आली. बेकायदेशीर स्थलांतरितांना पकडण्यासाठी मोहीम सुरूच राहणार आहे. देशात बेकायदेशीर राहणाऱ्या नागरिकांची ओळख करण्यासाठी एक विशेष पथक तयार करण्यात आले. त्यांना लवकरच हद्दपार करून त्यांच्या देशात पाठविण्यात येणार आहे.

ब्रिटनचे गृहमंत्री इव्हेट कुपर यांनी सांगितले की, देशात बेकायदेशीर राहणारे नागरिक पेट्रोल पंप, हॉटेल, रेस्टॉरंट, मॉल, स्पा सेंटरमध्ये काम करीत होते. इमिग्रेशन कायद्याचे कठोर पालन व्हावे यासाठी देशात बेकायदेशीर राहणाऱ्या नागरिकांना पकडण्याची मोहीम सुरू करण्यात आली. अनेक वर्षांपासून व्यवस्थेतील त्रुटींचा गैरवापर करण्यात येत होता. मानव तस्करीला प्रोत्साहन देण्याचा हा प्रकार आहे. (वृत्तसंस्था)

### अर्थव्यवस्थेचे नुकसान

बेकायदेशीर स्थलांतरित कुठलेही काम करण्यासाठी तयार असतात, त्यामुळे देशात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. बहुतांश नागरिक युद्ध प्रभावित देशांतील आहे. या नागरिकांमुळे अर्थव्यवस्थेचे नुकसान होत आहे. जीव धोक्यात टाकून आणि एजंटला पैसे देऊन देशात बेकायदेशीरपणे प्रवेश करण्याचा प्रकार सुरू आहे. तो रोखण्यासाठी कारवाई करण्यात येत आहे. ब्रिटनमधील नागरिकांचा रोजगार घुसखोर हिरावून घेत आहेत. या घुसखोरांना देशाबाहेर काढले जाणार असल्याचे इव्हेट कुपर यांनी सांगितले.

## इंद्राणी मुखर्जीची परदेशात जाण्याची याचिका फेटाळली

**◆ नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

माजी मीडिया एक्झिक्युटिव्ह इंद्राणी मुखर्जी यांची परदेशात जाण्याची परवानगी मागण्याची याचिका बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. स्वतःची मुलगी शीना बोराच्या हत्या प्रकरणात इंद्राणी मुखर्जी प्रमुख आरोपी आहे. या प्रकरणातील खटला जलदगतीने पूर्ण करण्याचा निर्देश न्यायालयाने सत्र न्यायालयाला दिला.

मुंबई उच्च न्यायालयाने इंद्राणी मुखर्जीला परदेशात जाण्याची परवानगी नाकारली होती. त्यानंतर तिने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. राजेश बिंदल यांच्या न्यायासनाने खटल्यातील कार्यवाही एका वर्षाच्या आत पूर्ण करण्याचा निर्देश सत्र न्यायालयाला दिला. (वृत्तसंस्था)

# रशियासमोर युक्रेनने घेतले नमते!

### अमेरिकेच्या दबावामुळे शांतता चर्चेची शक्यता

**◆ कीव्ह, १२ फेब्रुवारी**

२४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला केला आणि संपूर्ण जग चिंतेच्या खाईत लोटले गेले. प्राथमिक टप्प्यात या युद्धाची तीव्रता भीषण होती. चिमुकल्या युक्रेनने बलाढ्य रशियाला चिवट झुंजही दिली. तीन वर्षांपासून सुरू असलेला हा संघर्ष आता अमेरिकेतील सत्ता बदलानंतर संपुष्टात येण्याचे संकेत मिळत आहेत. युद्ध थांबवण्यासाठी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यासमोर नवा प्रस्ताव ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

एका मुलाखतीत झेलेन्स्की यांनी म्हटले की, आम्ही युद्ध टाळण्यासाठी रशियासोबत प्रदेशांची अदलाबदल करण्यास तयार आहेत.



रशियासोबतच्या संभाव्य शांतता चर्चेत, आम्ही व्लादिमिर पुतिन यांना सहा महिन्यांपूर्वी ताब्यात घेतलेला कुर्स्क प्रदेश परत करण्याचा प्रस्ताव देऊ.

काही लोक म्हणतात की, युरोप अमेरिकेशिवाय युक्रेनला सुरक्षेबाबतची हमी देऊ शकतो; पण मला असे वाटत नाही. अमेरिकेशिवाय खऱ्या अर्थाने सुरक्षा हमी असू शकत नाहीत. युरोप युक्रेनच्या युद्ध प्रयत्नांचा भार एकट्याने उचलू शकत नाही. अमेरिकेने युक्रेनला सुरक्षेची हमी देणे महत्त्वाचे आहे, असेही झेलेन्स्की यांनी स्पष्ट केले. कुर्स्क प्रदेश परत देण्याचा प्रस्ताव रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना आम्ही देऊ. आमच्यासाठी सर्व क्षेत्रे महत्त्वाची आहेत. आम्ही एका क्षेत्राच्या बदल्यात दुसरे क्षेत्र देऊ, असे झेलेन्स्की यांनी यावेळी सांगितले. रशियाने युक्रेनचे क्रिमिया, डोनेत्स्क, खेरसन, लुहान्स्क झापोरिझिया हे पाच प्रदेश ताब्यात घेतले आहेत.

**करारासाठी अमेरिकेकडून सुरक्षा हमी हवी**

रशियासोबतच्या कोणत्याही करारासाठी अमेरिकेकडून सुरक्षा हमी हवी, अशी मागणीही झेलेन्स्की यांनी केली आहे. कठोर लष्करी वचनबद्धतेशिवाय केलेला कोणताही करार रशियाला पुन्हा संघटित होण्यास आणि नवीन हल्ल्यासाठी पुन्हा सशस्त्र होण्यास वेळ देईल. अशा परिस्थितीत युक्रेनला अमेरिकेकडून हमी मिळायला हवी, अशी अटही त्यांनी या मुलाखतीच्या माध्यमातून घातली आहे. (वृत्तसंस्था)





## वृद्ध आईसाठी लेक झाला 'श्रावणबाळ'

महाकुंभासाठी कोट्यवधी भाविक उत्तरप्रदेशच्या प्रयागराजमध्ये दाखल झाले आहेत. कुंभमेळ्यात स्नान केल्याने सर्व पापांचा नाश होतो आणि व्यक्तीला मोक्ष मिळतो, असे म्हटले जाते. याच श्रद्धेमुळे लाखो भाविक येतात. पण, कुंभमेळ्यात असे एक दृश्य दिसले जे सर्वांच्या मनाला भिडले. त्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.

### महाकुंभमध्ये स्नानाची इच्छा केली पूर्ण



सोशल मीडियावर महाकुंभातील एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये एक मुलगा त्याच्या वृद्ध आईला कुंभमेळ्यात स्नान करण्यासाठी खांद्यावरून घेऊन जात आहे. त्याची आई खूप वृद्ध आहे. तिला गंगेत स्नान करण्याचे स्वप्न पडले होते. मुलाने आपल्या आईची इच्छा पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आणि त्याने तिला खांद्यावर बसवून आणले. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर सर्वांना श्रावणबाळाची आठवण झाली आहे. श्रावणबाळाने त्याच्या आई-वडिलांना कावडमध्ये बसवून तीर्थयात्रेला नेले होते आणि या मुलानेही असेच काहीसे केले आहे.

सुदेश पाल असे या आधुनिक श्रावणबाळाचे नाव आहे. त्यांचे स्वतःचे वय ६५ वर्षे आहे. नव्वदी पार केलेल्या आईची कुंभस्नानाची इच्छा पूर्ण करण्यासाठी ते मोठ्या हिमतीने प्रयागराजला आले आहेत. मुख्य म्हणजे हातानी ओढता येणारी बग्गी आणून त्यांनी आईला त्यात टाकून संगम स्थानी आणले.

व्हिडीओमध्ये स्पष्टपणे दिसत आहे की, मुलगा त्याच्या आईला भक्तीभावाने आणि प्रेमाने खांद्यावरून घेऊन चालला आहे. ही घटना सर्वांच्या हृदयाला भिडली. तिथे उपस्थित असलेले लोक या मुलाचे भरभरून कौतुक करत होते. अनेक लोक हे दृश्य पाहून भावुक झाले आहेत. आतापर्यंत हजारो लोकांनी हा व्हिडीओ पाहिला असून, तो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.

# महाकुंभासाठी भाविकांचा अडचणी सहन करून प्रवास

महाकाल सुपरफास्ट एक्सप्रेस भोपाळहून धावते, जी प्रयागराज मार्गे वाराणसीला जाते. यात ४ बोगी जनरल, ६ आरक्षित आणि ८ एसी डबे आहेत. ट्रेनमध्ये सुमारे १२०० लोक बसू शकतात. पण, स्टेशनवर १० हजारांहून अधिक लोक उभे होते. प्रत्येकाला ट्रेनमध्ये चढून प्रयागराजला पोहोचायचे होते. गर्दी इतकी जास्त होती की, लोक जागा मिळेल तिथे बसले. काहींनी तर बसण्यासाठी शौचालय गाठले.

ट्रेन आली आणि लोकांमध्ये चढण्यासाठी गर्दी झाली. लोक एकमेकांना ढकलत ट्रेनमध्ये चढू लागले. ज्यांच्याकडे कन्फर्म तिकिटे नव्हती तेही इतरांच्या जागांवर बसू लागले. कधीही काही अनुचित घटना घडू शकते असा गोंधळ होता. ही परिस्थिती फक्त एकाच ट्रेनची नाही, तर प्रयागराजला जाणाऱ्या सर्व ट्रेनची आहे.

ट्रेनमध्ये चढण्यासाठी शर्यत सुरू आहे. लोक खिडक्या, दरवाज्यांमधून, जिथे जागा मिळेल तिथे चढत आहेत. या शर्यतीत बरेच लोक वगळले गेले. मुले, महिला, वृद्ध कसे तरी ट्रेनमध्ये चढतात. ट्रेनमधील दृश्य आणखी भीषण होते. बसणे तर दूरच, उभे राहण्यासाठीही जागा नव्हती. लोक एकमेकांवर कोसळत होते आणि वस्तू इकडे तिकडे विखुरलेल्या होत्या.



## ८ फेब्रुवारीपर्यंत महाकुंभासाठी १६९ चार्टर विमाने आली

महाकुंभासाठी १८ जानेवारी ते ८ फेब्रुवारी दरम्यान १६९ विमाने प्रयागराजला आली. प्रयागराजमध्ये चार्टर विमानाच्या आगमनाचा हा एक विक्रम आहे.

| तारीख | विमानांची संख्या | प्रवाशांची संख्या |
|---|---|---|
| १८ जानेवारी | १५ | ११९ |
| ३१ जानेवारी | १९ | १०१ |
| १ फेब्रुवारी | २३ | १५३ |
| ४ फेब्रुवारी | १५ | १७९ |
| ७ फेब्रुवारी | ३७ | २२९ |
| ८ फेब्रुवारी | ६० | ३५६ |

## महाकुंभात फोन चार्जिंगचा व्यवसाय

प्रयागराजमध्ये आयोजित महाकुंभात दररोज करोडो भाविक पवित्र गंगेत स्नान करण्यासाठी येत आहेत. भाविकांच्या आस्थेसह हा महाकुंभ अनेकांच्या उदरनिर्वाहाचे साधनही बनले आहे. या ठिकाणी देशभरातून येऊन छोटे-छोटे व्यवसाय करीत आहेत. कुणी दात घासण्याचे ब्रश, कुणी माळा विकत आहे, कुणी खाण्या-पिण्याची गाडी लावत आहे, तर कुणी इतर काही कामे करत आहे. येथील लोक विविध मार्गांनी कमाई करीत आहेत. अशातच, सोशल मीडियावर एक असा व्हिडीओ व्हायरल होतोय्, जो पाहून कोणीही डोक्याला हात लावेल.

महाकुंभातील एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यामध्ये एका तरुणाने मोबाईल चार्जिंगचे दुकान सुरू केल्याचे दिसत आहे. दावा केला जातोय् की, हा तरुण एकाच वेळी २०-२० फोन चार्ज करून अवघ्या तासाभरात १००० रुपयांची कमाई करीत आहे.

### तरुण झाला मालामाल

इन्स्टाग्रामवर महाकुंभातील हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत एक तरुण महाकुंभात रस्त्यावर दिसतो आहे. त्याच्या आजूबाजूला काही लोक आपापला मोबाईल फोन घेऊन चार्ज करताना दिसताहेत. दावा केला जातोय् की, तो तासाला २०-२५ मोबाईल फोन चार्ज करतो आणि प्रत्येक फोनसाठी एका तासाचे ५० रुपये घेतो. म्हणजेच, याद्वारे तो दर तासाला सुमारे १००० रुपये कमवत आहे.

## माघ स्नानासाठी आलेल्या भाविकांवर २५ क्विंटल फुलांचा वर्षाव



माघ स्नानासाठी प्रयागराजमध्ये भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. हेलिकॉप्टरमधून भाविकांवर २५ क्विंटल फुलांचा वर्षाव करण्यात आला. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्यानंतर वाहतूक नियोजनात बदल करण्यात आला आहे. शहरात वाहनांचा प्रवेश बंद आहे. जत्रेच्या परिसरात कोणतेही वाहन चालणार नाही. अशा परिस्थितीत, भाविकांना संगमपर्यंत पोहोचण्यासाठी ८ ते १० किमी चालत जावे लागते. प्रशासन पार्किंगमधून शटल बसेस चालवत आहे. तथापि, हे अत्यंत मर्यादित आहेत. महाकुंभातील गर्दी लवकर पांगावी यासाठी लेटे हनुमान मंदिर, अक्षयवट आणि डिजिटल महाकुंभ केंद्र बंद करण्यात आले आहे. बुधवारी कल्पवासही महाकुंभात संपला. संगममध्ये स्नान केल्यानंतर, सुमारे १० लाख कल्पवासी घरी परततील.

संगम येथे सुरक्षा दलाचे जवान तैनात आहेत. गर्दी वाढू नये म्हणून लोकांना तिथे थांबण्याची परवानगी नाही. बहुतेक लोकांना आंघोळीसाठी इतर घाटांवर पाठवले जात आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पहिल्यांदाच १५ जिल्ह्यांचे जिल्हा न्यायदंडाधिकारी, २० आयएएस आणि ८५ पीसीएस अधिकारी महाकुंभात तैनात करण्यात आले आहेत.

लखनौमध्ये, मुख्यमंत्री योगी पहाटे ४ वाजल्यापासून मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बांधलेल्या वॉर रूममध्ये महाकुंभाचे निरीक्षण करत होते, हे विशेष.

## चित्रपट वार्ता


### मल्टिस्टारर 'देवमाणूस'चे नवे पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला






**मुंबई :** तेजस देऊस्कर दिग्दर्शित आणि लव रंजन आणि अंकुर गर्ग निर्मित मल्टिस्टारर मराठी चित्रपट 'देवमाणूस'ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत आणि नुकतेच या चित्रपटात असलेल्या कलाकारांचे पोस्टर्स लाँच करण्यात आले आहेत. महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके अशा या दिग्गज आणि पॉवरहाऊस कलाकारांचे वैशिष्ट्य असलेले पोस्टर्स चाहत्यांना सिनेमात असलेल्या त्यांच्या प्रभावशाली स्वरूपाची एक झलक देतात. अभिनेते महेश मांजरेकर यांची भेदक नजर त्यांच्या या भूमिकेची गंभीरता सांगते. अभिनेत्री रेणुका शहाणे यांचा मायाळू, सरळ देखावा आणि मनमोहक लूक लक्ष वेधून घेणारा आहे, सुबोध भावे यांना पोलिसांच्या हटके भूमिकेत पाहू शकतो. अभिनेता सिद्धार्थ बोडके त्याच्या हसण्याने सिनेमाचे आणि त्याच्या भूमिकेचे रहस्य वाढवतो.

### 'आयएमडीबी'च्या यादीत सई ताम्हणकर



**मुंबई :** सई ताम्हणकरचे अनेक चित्रपट, वेबसीरिज गाजल्या. सध्या ती एकापाठोपाठ एक अनेक बॉलिवूड प्रोजेक्टमध्ये काम करीत आहे. आपल्या कामाच्या जोरावर आता तिने 'आयएमडीबी'च्या आघाडीच्या दहा अभिनेत्रींच्या यादीत स्थान पटकावले आहे. मनोरंजन जगतात सगळ्यात महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या 'आयएमडीबी'ची या आठवड्याची आवडत्या कलाकारांची यादी नुकतीच समाज माध्यमांवर आली असून, त्यात सई अव्वल दहामधील मानकरी ठरली आहे. आगामी काळात सई क्राईम बीट, डब्बा कार्टेल, ग्राऊंड झिरो, मटका किंग यासारख्या महत्त्वाच्या प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे.

### जालियनवाला बाग हत्याकांडावरील 'द वेकिंग ऑफ अ नेशन'चा टीझर





**मुंबई :** 'द वेकिंग ऑफ अ नेशन' या आगामी वेबसीरिजचा टीझर नुकताच भेटीला आला आहे. भारतीय इतिहासातील जालियनवाला बाग हत्याकांड प्रकरणावर ही वेबसीरिज आधारित आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते तसेच एमी इंटरनॅशनलचे नामांकन मिळालेले राम माधवानी यांनी या सीरिजची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. वसाहतवादी फसवणुकीच्या विरोधात उभ्या राहणाऱ्या कांतिलाल साहनी या वकिलाची ही कथा आहे. तारक रैना हा अभिनेता मुख्य भूमिकेत आहे. कांतिलाल आणि त्याचे सहकारी भवितव्य बदलू शकणारे एक कारस्थान उघड करतात. याचीच थरारक कहाणी या सीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नियुक्ती पत्र देण्याच्या बहाण्याने मुंबईच्या सिंगल मदरवर लैंगिक अत्याचार

## सराफ व्यापारी प्रदीपकुमार शिंगवीवर दुष्कर्म व अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

काम देतो म्हणून मुंबईहून सोलापूरला बोलावून घेऊन नियुक्तीपत्र देण्याच्या बहाण्याने एका ४७ वर्षीय सिंगल मदरवर दुष्कर्म केल्याप्रकरणी व्यापारी प्रदीपकुमार शिंगवी यांच्यासह स्नेहालयातील दोन महिला कर्मचाऱ्यावर बलात्कार व अॅट्रॉसिटीचा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात १८ व २५ तारखेला कारंबा येथील स्नेहालयात (ता. उत्तर सोलापूर) येथे घडला. प्रदीपकुमार सोहालाल शिंगवी (रा. मंगळवार पेठ, सोलापूर), रेखा गुप्ता आणि शीलवंती बिराजदार (दोन्ही रा. स्नेहालय, कारंबा, उत्तर सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

फिर्यादी पीडित महिला ही मुंबई येथील रहिवासी असून त्या समाजसेवा तसेच समुपदेशनाचे काम करतात. १५ सप्टेंबर २०२४ रोजी जाहिरात पाहून त्यांनी फोन केला असता यातील आरोपी शिंगवी यांनी तो फोन उचलला. त्यानंतर सदर महिलेला शिंगवी यांनी मुलीसोबत कारंबा येथील स्नेहालयात बोलावून घेतले. तेव्हा सदर महिला ही १४सप्टेंबर रोजी मुलीला घेऊन स्नेहालयात आल्या असता त्यांना तेथेच राहण्यासाठी खोली देण्यात आली. त्यांनी कामाचे अपॉइंटमेंट लेटर शिंगवी यांच्याकडे मागितले होते. यादरम्यान फिर्यादी महिला ही बौद्ध धर्माची आहे हे समजल्यावर यातील वरील दोघा आरोपी महिलांनी फिर्यादीला हीन वागणूक देणे सुरू केली. याची तक्रार फिर्यादीने शिंगवी यांच्याकडे केली, तेव्हा सिंघवी यांनी तुम्ही मला आवडता असे म्हणून यादरम्यान १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी यांनी फिर्यादीला आपल्या ऑफिसमध्ये बोलावून घेऊन कामाचे नियुक्तीपत्र पाहिजे असेल तर माझ्यासोबत संबंध ठेवावे लागतील असे म्हणून त्यांनी सदर महिलेवर दुष्कर्म केले त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी दुष्कर्म करून नियुक्तीपत्र देण्याबाबत टाळाटाळ केली आणि महिला आरोपींनी किचनमध्ये यायचे नाही, जैन महाराजांना जेवायला द्यायचे नाही म्हणून फिर्यादीला हिन वागणूक दिली. शिंगवी यांनी ९ जानेवारी २०२५ रोजी मी स्नेहालय संस्था बंद करत आहे, तुमचे काम वरिष्ठांना आवडले नाही, तुम्ही काम सोडून जावा असे म्हणून कामावरून काढून टाकल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### पोलिसात परस्परविरोधी गुन्हे

या प्रकरणी परस्पर विरोधी गुन्हे दाखल आहेत. शिंगवी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पीडित महिला अवैध रित्या स्नेहालय येथे कामावरून काढून टाकले तरी राहत होती. कामावर ठेवा अन्यथा विनयभंग व अँट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करीन अशी धमकी देत एक कोटीची खंडणी मागितल्याने पीडीतसह दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. तर पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून सिंगवीसह तिघांवर अनुसूचित जाती जमाती व दुष्कर्मचा गुन्हा दाखल असल्याचे पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी सांगितले.

मनोरमा परिवार अंतर्गत

**सोलापूर जिल्हा मनोरमा सखी महिला नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

अंकुर रोपवाटीकेसमोर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

सौ. येरगुंटे स्वाती सिद्राम — चेअरमन (मो.७९७२६४९८७१)
सौ. जयश्री भोरे — व्यवस्थापिका (मो. ९९२१९११०१०)

# 'वर्ल्ड बुक फेअर' सारखे कार्यक्रम लोकोपयोगी आहेत: आचार्य बाळकृष्ण

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी-**

पतंजलीने योग-आयुर्वेदाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा दिली. आयुर्वेद स्वतंत्र आहे, त्याची कोणाशीही स्पर्धा नाही: आचार्य बाळकृष्ण वर्ल्ड हर्बल एनसायक्लोपीडिया आणि सौमित्रयनिदानम, आयुर्वेदाचा महान ग्रंथ: आचार्य बाळकृष्ण. पतंजलीची स्वदेशी उत्पादने गुणवत्ता आणि शुद्धतेच्या सर्व मापदंडांची पूर्तता करतात, आमच्यासाठी देश हा व्यवसाय नाही, तो कुटुंब आहे: आचार्य बाळकृष्ण पतंजलीने योग, आयुर्वेद, संशोधन, शिक्षण, वैद्यकीय आणि प्रेरणादायी आध्यात्मिक पुस्तके आणि ग्रंथ प्रकाशित केले.

नॅशनल बुक ट्रस्ट, भारत (भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत) भारत मंडपम, प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे आयोजित जागतिक पुस्तक मेळाव्यात पतंजली योगपीठाचे सरचिटणीस आचार्य बाळकृष्ण प्रमुख वक्ते म्हणून म्हणाले की, 'जागतिक पुस्तक मेळा' सारख्या घटना सार्वजनिक साहित्यात



प्रवेश करण्यायोग्य आहेत. ते म्हणाले की, पतंजलीने योग-आयुर्वेदाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. योगाबद्दल आचार्यजी म्हणाले की, आज जगभरात योगाचा स्वीकार झाला आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. जगभर वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांना एखाद्या शब्दाचा अर्थ सारखाच माहीत असेल तर तो योग आहे. जरी एखाद्याला योगाचा व्यापक आणि खोल अर्थ माहित नसला तरी, हे काही श्वासोच्छवासाचे व्यायाम, शारीरिक व्यायाम, काही आसने आणि प्राणायाम बद्दल आहे हे माहित आहे. आयुर्वेदाच्या संदर्भात ते म्हणाले की, आयुर्वेदाला आयुर्वेद म्हणून प्रस्थापित करण्यासाठी जागतिक स्तरावर जे काम व्हायला हवे होते, ते प्रत्यक्षात झाले नाही. ते म्हणाले की, आयुर्वेद हे एक पूर्ण शास्त्र आहे. आयुर्वेद स्वतंत्र असून त्याची कोणाशीही स्पर्धा नाही. ते म्हणाले की, लोपॅथी दैनंदिन जीवनात कृत्रिम औषधाच्या रूपात आहे. आयुर्वेद आपल्या जीवनात रुजलेला आहे तर लोपॅथी ही सक्ती आहे. आयुर्वेदाकडे वैद्यकशास्त्र किंवा वनौषधींचे शास्त्र म्हणून व्यापक दृष्टीकोनातून पाहिल्यास त्यासाठी अधिक कामाची गरज आहे. ते म्हणाले की, निसर्गाशी सुसंगत पदार्थांचा वापर करून निसर्गाशी सुसंगत जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे आयुर्वेद शिकवतो. आचार्यजींनी सांगितले की पतंजलीने जागतिक हर्बल एनसायक्लोपीडियाच्या रूपात एक महान पुस्तक प्रकाशित केले आहे ज्यामध्ये ३२ हजार औषधी वनस्पतींचे सचित्र वर्णन आहे. यापूर्वी केवळ १२ हजार औषधी वनस्पतींची माहिती उपलब्ध होती. याशिवाय सौमित्रयनिदानम् हा आयुर्वेदावर आधारित ग्रंथ आम्ही प्रकाशित केला, त्याद्वारे नवयुगाचाराच्या अनुषंगाने जगात उद्भवणारे नवीन रोग, नवीन व्याधी आणि नवीन रोगांचे स्वरूप, लक्षणे आणि निदान सादर करून एक आव्हानात्मक कार्य केले आहे. यामध्ये शरीराच्या रचनेच्या आधारे १४ विभागांमध्ये ६८२१ श्लोकांमध्ये ४७१ मुख्य रोगांसह सुमारे ५०० रोगांचे सचित्र वर्णन आहे. तसेच, आयुर्वेदाच्या परंपरेत प्रथमच २५०० हून अधिक क्लिनिकल परिस्थितींचे वर्णन पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. पतंजलीच्या स्वदेशी उत्पादनांबाबत ते म्हणाले की, पतंजलीच्या उत्पादनांची निर्मिती हीच दृष्टी समोर ठेवून करण्यात आली आहे. आम्हाला माहित आहे की आमचे कुटुंब त्यांचे सेवन करत आहे. म्हणूनच आमची उत्पादने गुणवत्ता आणि शुद्धतेच्या सर्व मानकांवर खरी राहतात. आपल्यासाठी देश हा व्यवसाय नसून कुटुंब आहे. त्यांनी सर्व उत्पादक कंपन्यांना आवाहन केले की ते जे काही उत्पादने बनवतात ते त्यांच्या कुटुंबाला लक्षात ठेवून बनवावे. तरुणांना संबोधित करताना आचार्यजी म्हणाले की, जे काही काम तुम्ही स्वत:साठी किंवा देशासाठी करत आहात, ते फक्त आजसाठीच नाही तर भविष्यात त्यांना त्या कामाचा कसा फायदा होईल याचा विचार करून करा. आचार्य जी म्हणाले की पतंजलीच्या माध्यमातून आम्ही योग, आयुर्वेद, शिक्षण, वैद्यक, संशोधन, प्राचीन हस्तलिखित पुस्तके आणि प्रेरणादायी आध्यात्मिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. याशिवाय, भारतीय शिक्षण मंडळाअंतर्गत इयत्ता १ ते इयत्ता दहावी पर्यंतचा अभ्यासक्रम देखील देशी शिक्षण पद्धतीचा पाया घालत प्रकाशित केला जात आहे.

## NOTICE

NOTICE IS HEREBY GIVEN THAT THE CERTIFICATE(S) FOR RELIANCE INDUSTRIES LTD BEARING EQUITY CERTIFICATE NOS. AS 62473288, 66730053, 11396650, 50889246, 58450578 AND DISTINCTIVE NOS. 2208670068 TO 2208670116, 6882205800 TO 6882205897, 205241830 TO 205241849, 1164738324 TO 1164738343, 1624540563 TO 1624540571 UNDER THE FOLIO NO 056401342 OF RELIANCE INDUSTRIES LTD. STANDINGIN THE NAME OF 1ST HOLDER SURYAKANTJIVRAJ GANDHI & 2ND HOLDER LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI HAS/ HAVE BEEN LOST OR MISLAID AND THE UNDERSIGNED HAS / HAVE APPUED TO THE COMPANY TO ISSUE DUPLICATE CERTIFICATE(S) FOR THE SAID SHARES. ANY PERSON WHO HAS ANY CLAIM IN RESPECT OF THE SAID SHARES SHOULD WRITE TO OUR REGISTRAR KFIN TECHNOLOGIES LIMITED SELENIUM TOWER 'B' PLOT 31-32, GACHIBOWLI, FINANCIAL DISTRICT, HYDRABAD-500032 WITHIN ONE MONTH FROM THIS DATE ELSE THE COMPANY WILL PROCEED TO ISSUE DUPUCATE CERTIFICATE(S).

NAME(S) OF SHAREHOLDER(S) :

**1) Mr. SURYAKANT JIVRAJ GANDHI**
**2) LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI**

## NOTICE

NOTICE IS HEREBY GIVEN THAT THE CERTIFICATE(S) FOR ULTRATECH CEMENT LTD BEARING EQUITY CERTIFICATE NOS. AS 34076 AND DISTINCTIVE NOS. 31248769 TO 31248788 UNDER THE FOLIO NO 04771591 OF ULTRATECH CEMENT LTD. STANDING IN THE NAME OF 1 HOLDER SURYAKANT JIVRAJ GANDHI & 2ND HOLDER LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI HAS/ HAVE BEEN LOST OR MISLAID AND THE UNDERSIGNED HAS / HAVE APPLIED TO THE COMPANY TO ISSUE DUPLICATE CERTIFICATE(S) FOR THE SAID SHARES. ANY PERSON WHO HAS ANY CLAIM IN RESPECT OF THE SAID SHARES SHOULD WRITE TO OUR REGISTRAR KFIN TECHNOLOGIES LIMITED, SELENIUM TOWER 'B' PLOT 31-32, GACHIBOWLI, FINANCIAL DISTRICT, HYDRABAD-500032 WITHIN ONE MONTH FROM THIS DATE ELSE THE COMPANY WILL PROCEED TO ISSUE DUPLICATE CERTIFICATE(S).

NAME(S) OF SHAREHOLDER(S) :

**1) Mr. SURYAKANT JIVRAJ GANDHI**
**2) LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI**

## NOTICE

NOTICE IS HEREBY GIVEN THAT THE CERTIFICATE(S) FOR LARSON & TOUBRO LTD BEARING EQUITY CERTIFICATE NOS. AS 34064, 209221, 334746, 436048, 13600137 AND DISTINCTIVE NOS. 1560964 TO 1560988, 1410066192 TO 141066216, 575555385 TO 575555434, 617812580 TO 617812629, 1396381685 TO 1396381759 UNDER THE FOLIO NO 04771591 OF LARSON & TOUBRO LTD. STANDING IN THE NAME OF 1ST HOLDER SURYAKANT JIVRAJ GANDHI & 2ND HOLDER LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI HAS/HAVE BEEN LOST OR MISLAID AND THE UNDERSIGNED HAS / HAVE APPLIED TO THE COMPANY TO ISSUE DUPLICATE CERTIFICATE(S) FOR THE SAID SHARES. ANY PERSON WHO HAS ANY CLAIM IN RESPECT OF THE SAID SHARES SHOULD WRITE TO OUR REGISTRAR, KFIN TECHNOLOGIES LIMITED, SELENIUM TOWER 'B', PLOT 31-32, GACHIBOWLI, FINANCIAL DISTRICT, HYDRABAD-500032 WITHIN ONE MONTH FROM THIS DATE ELSE THE COMPANY WILL PROCEED TO ISSUE DUPLICATE CERTIFICATE(S).

NAME(S) OF SHAREHOLDER(S) :

**1) Mr. SURYAKANT JIVRAJ GANDHI**
**2) LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI**



## पैशासाठी विवाहितेचा छळ; पतीविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी -**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सोनाली नरेंद्र बळे (वय ३२, रा. अमरनाथ नगर, शेळगी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन नरेंद्र अनिल बळे (रा. स्टाफ क्वाटर्स, विद्या प्रतिष्ठान, पिंपळी, बारामती, जि. पुणे) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ मार्च २०१७ ते ११ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सोनाली या पती नरेंद्र यांच्यासोबत सासरी बारामती येथे नांदण्यास होत्या. त्यावेळी पती नरेंद्र याने सोनाली यांचा शारीरीक व मानसिक छळ करून त्यांना वेळोवेळी हाताने मारहाण करून माहेरून प्लॉट खरेदी करण्यासाठी १५ लाख रुपये आण नाही तर तुला नांदविणार नाही अशी धमकी देत जाचहाट केला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

**मध्य रेल्वे**
**विद्युत विभाग**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने Rallways e-procurement वेबसाइट www.Ireps.gov.in वर खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2024/16 कामाचे नाव:- ट्रॅकच्या बाजूने सुरक्षा कुंपण (एसीबी आणि फिक्स्ड नॉट फेंसिंग) च्या तरतुदीच्या संबंधात इलेक्ट्रिकल टीआरडी भागाचे काम 1) सुर-अकोर कडून CPWI/DUD 2) CPWI/DUD कडून KOR-DUDCDH/3) CPWI/DUD भाग-3) 4) CPWI/KLBG भाग-2 (HHD-HQR) 5) CPWI/SDB (पुन्हा आमंत्रण). अंदाजे किंमत:-रु. 1,29,85,304.22/-, बोली सुरक्षा:- रु. 2,14,900/- पूर्ण होण्याचा कालावधी:-12 महिने, ऑफरची वैधता:- 60 दिवस, वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:-11/03/2025 15:00 वाजता.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)
SUN 59
अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**बालाजी अमाईन्स लिमिटेड**
(CIN: L24132MH1988PLC049387)
नोंदणीकृत कार्यालयः बालाजी टॉवर्स, क्र. 9/1A/1, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर- 413224
दूरध्वनी: +91 217 2451500, फॅक्स: +91 217 2451521,
ईमेल: cs@balajiamines.com,
वेबसाईट: https://www.balajiamines.com

**३१ डिसेंबर २०२४ रोजी समाप्त झालेल्या तिमाही आणि नऊमाही अखेरचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा स्वतंत्ररित्या आणि एकत्रितरित्या गोषवारा**

लेखा परीक्षण समितीच्या शिफारशींवर आधारित, बालाजी अमाईन्स लिमिटेड (कंपनी) च्या संचालक मंडळाने १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या सभेत ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाही अखेरचे स्वतंत्र आणि एकत्रित आर्थिक निष्कर्ष मंजूर केले आहेत.

वर नमूद केलेले आर्थिक निकाल कंपनीच्या वेबसाइटवर https://balajamines.com/QRC/Q3-DEC-2024 FIN RESULT MRTHI.pdf वर उपलब्ध आहेत आणि खाली दिलेला क्विक रिस्पॉन्स कोड स्कॅन करून देखील पाहू शकता.

स्थळ : सोलापूर
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२५

बालाजी अमाईन्स लिमिटेड करिता
स्वाक्षरीत/-
डी. राम रेड्डी
व्यवस्थापकीय संचालक

## जाहीर प्रसिध्दीकरण

रे.मु.नं. ४४४/२०२५
मि ०८

**सोलापूर येथील मे. दिवाणी ९वे न्यायाधिश कनिष्ठ स्तर (मे. व्हि.ए. कुलकर्णी साहेब) यांचे न्यायालयात**

**१) राजू सिद्राम कोरे**
वय : ४९ वर्षे, धंदा : लेबर
**२) निर्मला सिद्राम कोरे**
वय: ३८ वर्षे, धंदा : घरकाम
दोघे रा.घर नं.१७०,
कुर्बान हुसेन नगर, सोलापूर — **वादी**

विरुध्द

**१) सिद्राम लक्ष्मण कोरे**
वय : सज्ञान वर्षे, धंदा काही नाही
रा.घर नं.१७०, कुर्बान हुसेन नगर,
सोलापूर हल्ली-बेपत्ता (परागंधा)
**२) महाराष्ट्र शासन**
**(समन्स बजावणी मा. कलेक्टर सो., सोलापूर यांचेवर करावी.)** — **प्रतिवादी**

ज्याअर्थी वादी नं. १ व २ यांचे वडिल सिद्राम लक्ष्मण कोरे हे मागील १६ वर्षापुर्वी सन २००९ पासून परागंधा / बेपत्ता झालेबाबत दिवाणी मृत्यू (Civil Death) झाला, असे जाहीर होऊन मिळणेचा दावा या मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरच्या दाव्यास कोणाची हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसाचे आत किंवा मे. कोर्टानी नेमलेली दि. १७/०३/२०२५ या तारखेस स्वतः अगर त्यांच्या प्रतिनिधीमार्फत मे. कोर्टात समक्ष हजर राहून आपली हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास वादीचा सदरचा दावा मंजूर करण्याचा आदेश करतील, त्यानंतरची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केली ता. १२/०२/२०२५

**सही/- लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा. अधिक्षक सि.ज.सि.डी., सोलापूर**

## जाहीर नोटीस

बावी बृ. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बावी बृ. ता. बार्शी जि. सोलापूर या सहकारी संस्थेच्या सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये रिक्त झालेल्या एक जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी म्हणून अनिस सय्यद, सहाय्यक, निबंधक, सहकारी संस्था, बार्शी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक :- २०/०२/२०२५ रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

**दि. १२/०२/२०२५**

**सही/-**
**सचिव**
**बावी (बृहत) वि.का. सेवा सोसा लि., बावी, ता, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज क्र. ६/२०२५

**अक्कलकोट येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश सो., क स्तर यांचे न्यायालयात (श्रीमती एन.ए.एल. शेख सो)**

**१. आशाबी म. हनिफ चौधरी**
वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
**२. जाफर म. हनिफ चौधरी.**
वय - ४० वर्षे, धंदा - मजूरी
दोघे रा. मु.पो. मैंदर्गी,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदारांनी, महमद हनिफ रज्जाक चौधरी हे दि. २४/०५/२०२१ रोजी मु.पो. मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथे मयत झाले असुन, यातील अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदारांचे नांवे हेअरशिप सर्टिफिकेट मिळून त्याची योग्य व कायदेशीर अंमलबजावणी होणेसाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी या मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा पुढील नेमलेली तारीख १२/०३/२०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास, कोणाचीही काही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिनांक १०/०२/२०२५ रोजी आमचे सही शिक्क्याने प्रसिध्द केले.

**सही/- लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय, अक्कलकोट**

## लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर

१२८, मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर - ४१३००१
फोन नं. ०२१७-२७३५५०३/ फॅक्स नं.२७३५५६६ ई-मेल : lokmangalbankho@gmail.com

### नमुना झेड

(नियम १०७ पोटनियम ((११)(ड)-१)-२पहा)

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्याअर्थी खाली सही केलेल्या वसुली अधिकारी द्वारा लोकमंगल को. ऑप बँक लि., सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये खालील नमुद यादीतील ऋणको (थकबाकीदार) यांना थकबाकी मागणी नोटीस खालील नमुद दिनांकास ऋणको यांना देवुन सदरचे नोटीसीमध्ये नमुद रक्कम सदर नोटीस मिळल्याच्या दिनांकापासून ऋणको यांने रक्कम जमा करण्यास कसुर केले आहे. त्याअर्थि खाली सही करणऱ्याने खालील नमुद यादीतील ऋणको यांना खालील नमुद दिनांकास स्थावर मिळकत जप्तीची नोटीस देऊन पुढे निर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणको ने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला आणि सर्व नागरीकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण-याने त्याला महाराष्ट्र सहकरी संस्था निमय १०७ (११) (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा खालील नमुद दिनांकास घेतला आहे, विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना याद्वारे सावध करण्यात येते की, खाली नमुद केलेल्या यादीतील मालमत्ते संबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास लोकमंगल को-ऑप बँक लि. सोलापूर या संस्थेच्या खाली नमुद केलेल्या बोज्याची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यातील इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | वसुली दाखला क्र. दिनांक | मिळकत क्र./ क्षेत्र/आकार | थकबाकीदाराचे नाव | मागणी नोटीस आदेश दिनांत | प्रतिकात्मक ताबा घेतलेली तारीख | दिनांक ३१/०१/२०२५ अखेर एकूण येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१/१८३०/ २०२२/२३ दि. १९/०५/२०२३ | मौजे कोर्सेगाव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर गट नं. ७९/१ क्षेत्र. २.०२.०० हे. आर. आकार ३.९० | संगण्णा मोर्तेप्पा अरवत | ०५/०८/२०२३ | ०३/०२/२०२५ | रु. २६,८१,८६८/- अधिक व्याज |
| | | मौजे. कोर्सेगाव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर, गट नं. ८० क्षेत्र ०.३४.०० हे. आर. आकार ०.६६ | मोर्तेप्पा संगण्णा अरवत | | | |
| २ | १०१/१६२१/ २०२२/२३ दि. १९/०५/२०२३ | मौजे. कुरूल, ता. मोहोळ, जि. सोलापूर गट नं. ६७६/१/इ क्षेत्र २.१५.०० हे.आर आकार २.३० | अरुण संदिपान सलगर यांचा हिस्सा | १२/०८/२०२३ | ०५/०२/२०२५ | रु. ३०,७५,९७६/- अधिक व्याज |
| | | मौजे. कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर गट नं. ९१८ क्षेत्र ०.६३.०० हे.आर. आकार १.८० | गणेश कुंडलिक लांडे यांचा हिस्सा | | | |

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०७/०२/२०२५**

मोहर

सही/- वसुली अधिकारी
**लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर**
(म.सह.संस्था अधिनियम १९६० कलम १५६ अन्वये अधिकार प्रदानित)
द्वारा लोकमंगल को.ऑप. बँक लि., सोलापूर

**मध्य रेल्वे**
**विद्युत विभाग**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने Rallways e-procurement वेबसाइट www.Ireps.gov.in वर खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2024/14R कामाचे नाव: इलेक्ट्रिकल TRD भाग ट्रॅकच्या बाजूने सुरक्षा कुंपण (CB आणि फिक्स्ड नॉट फेन्सिंग) च्या तरतुदीशी संबंधित काम 1) DD-SUR विभागात किमी 270 ते किमी 293.125 पर्यंत, 2) DD-SUR विभागात किमी 293.125 ते किमी 316.25 पर्यंत, 3) CPW/JUDU4 अंतर्गत) JH-KWV वरून CPWI/KWV(N), 5) CPWI/KWV(S) KWV-WKPart-1 अंतर्गत, ६) CPWI/KWV(S) WK-MO भाग-2 अंतर्गत आणि 7) CPWI/SUR(N) अंतर्गत. (पुन्हा आमंत्रण). अंदाजे किंमत: रु.1,64,14,227.10/-, बोली सुरक्षा:- रु. 2,32,100/-पूर्णता 60 दिवस, वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ :-10/03/2025 15:00 वाजता. कालावधी :- 12 महिने, ऑफरची वैधता

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)
SUN 58
अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अ.नं. ०७ /२०२५
पुढील नेमली ता. १५/०३/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**१) सुभाषराव गुणवंतराव निंबाळकर,**
वय - ७२ वर्षे, धंदा - शेती,
रा. शेंद्री, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) रंजना सुभाषराव निंबाळकर,**
वय ६४ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. सदर — **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** — **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार नं. १, २ हे पती पत्नी असून त्यांना शुभांगी सुभाषराव निंबाळकर ही अविवाहीत मुलगी होती ती दि. १५/१२/२०२४ रोजी पुणे येथे मयत झाली. सदर शुभांगी सुभाषराव निंबाळकर ही महाराष्ट्र शासन, वस्तु व सेवा कर विभागात राज्य कर निरिक्षक या पदावर कार्यरत होती ती सेवेत असताना मयत झालेली आहे तिचे नावे बँकेत रक्कमा जमा आहेत यातील अर्जदार यांनी वारस या नात्याने सदर रक्कमेची मागणी केली असता तेथील अधिकारी यांनी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदार यांनी ते मयत शुभांगी सुभाषराव निंबाळकर यांचे नांवे जमा असलेले रक्कमा मिळणेकरीता अर्जदार हे मयत शुभांगी सुभाषराव निंबाळकर हिचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर करावयात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीख: १२/०२/२०२५

**सही/- लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय, व स्तर, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३६/२०२४

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

**सौ. कलावती पती भिमाशंकर हडपद** — **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात मयत श्रीमंत मलकप्पा हडपद यांचे पश्चात पोस्ट ऑफिसकडून देय असलेली आयुर्विमा मिळणेकरिता त्यांना मे. कोर्टाकडून वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी त्याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक १७/०३/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदारांच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक : ११/०२/२०२५

**सही/- लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क. स्तर अक्कलकोट**

## महत्त्वाचे

### महाराष्ट्राला हॉकीत दोन्ही गटांत कांस्यपदकाची संधी

**हरिद्वार :** महाराष्ट्राच्या पुरुष व महिला या दोन्ही हॉकी संघांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना शेवटपर्यंत जिद्दीने लढत दिली. मात्र, या दोन्ही संघांना येथे सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उपांत्य फेरीत पराभवास सामोरे जावे लागले. पुरुष गटात महाराष्ट्राला सडनडेथ द्वारा ७-६ (पूर्णवेळ २-२) असे पराभूत केले, तर महिलांमध्ये मध्य प्रदेश संघाने महाराष्ट्राला पेनॉल्टी शूट-आउटद्वारे ३-१ (पूर्णवेळ १-१) असे पराभूत केले. महाराष्ट्राला कांस्यपदक मिळवण्याची संधी असून, उद्या त्यासाठी खेळावे लागणार आहे. उपांत्य फेरीचे दोन्ही सामने अतिशय रंगतदार झाले. अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश असलेल्या कर्नाटक संघाला महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चिवट झुंज दिली. पूर्ण वेळेत महाराष्ट्राकडून आदित्य लाळगे व हरीश शिंदगीने प्रत्येकी एक गोल केला. कर्नाटकच्या खेळाडूंनी देखील दोन गोल केले व सामना बरोबरीत ठेवला. पेनॉल्टी शूटआउटमध्ये कर्नाटकने बाजी मारली. महिलांमधील महाराष्ट्र विरुद्ध मध्यप्रदेश हा सामना अतिशय रंगतदार झाला व सामना १-१ असा बरोबरीत सुटला. पेनॉल्टी शूटआऊटमध्ये मध्यप्रदेशने दोन गोल करीत बाजी मारली.

### जिम्नॅस्ट किमया, परिणाला सुवर्ण


किमया कार्ले व परिणा मदनपोत्रा

**डेहराडून :** येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सोळाव्या दिवशी सकाळच्या सत्रात जिम्नॅस्टिक्समध्ये किमया कार्ले व परिणा मदनपोत्रा या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी २ सुवर्ण व एक रौप्यपदक जिंकून धडाकेबाज सुरुवात केली. भागीरथी संकुलात सुरू असलेल्या रिद्मिक्स स्पर्धेतील बॉल प्रकारात किमया कार्ले हिने बाहुलीच्या भूमिकेचे अफलातून सादरीकरण केले. जिवंत बाहुलीच्या रूपात बॉलवर वैविध्यपूर्ण प्रात्यक्षिके सादर करून पंचासह उपस्थित क्रीडाप्रेमींची प्रशंसा मिळविली. किमयाने सर्वाधिक २५.९५ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर मोहर उमटवली. मुस्काना राणा (२५.७५ गुण) व मान्या शर्मा (२५.९५ गुण) या जम्मू - काश्मीरच्या खेळाडूंनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदकाची कमाई रिद्मिक्सच्या हुप प्रकारात ठाण्याच्या परिणा मदनपोत्रा हिने तोबा तोबा.. आणि लैला मैं लैला.. या बॉलिवूड गाण्यावर मंत्रमुग्ध करणाऱ्या अतिशय कलात्मक व अफलातून रचना सादर केल्या आणि २४.४५ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर महाराष्ट्राचे नाव कोरले. याच प्रकारात महाराष्ट्राच्या किमयाने क्रुवेला या कॅरेक्टरवर एटीट्यूड आणि खुन्नस या थीमवर सुरेख रचना सादर २४.१५ गुणांसह रुपेरी यश मिळविले. हरयाणाची लाइफ अदलखा २४.०५ गुणांसह कांस्यपदकाची मानकरी ठरली.

### संजीवनी जाधवला रौप्यपदक

**डेहराडून :** नाशिकची संजीवनी जाधव हिने महिलांच्या ५ हजार मिटर शर्यतीत रौप्य, तर पूनम सोनूने हिने कांस्यपदक जिंकून ॲथ्लेटिक्समध्ये आजचा दिवस गाजवला. याचबरोबर महिलांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत नेहा ढाबरेने कांस्यपदक, तर पुरुषांच्या ४०० मीटर शर्यतीत बिद्री (कोल्हापूर) येथील रोहन कांबळेनेही कांस्यपदक मिळविले. उत्तराखंडच्या अंकिताने १५ मिनिटे ५६.०३ सेकंद वेळेसह सुवर्णपदकावर नाव कोरले. संजीवनीला १५ मिनिटे ५९.१३ सेकंद वेळेसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राच्या पूनम सोनूने हिने १६ मिनिटे ५३.५२ सेकंद वेळ नोंदवित कांस्यपदक जिंकले. महिलांच्या ४०० मिटर अडथळा शर्यतीत महाराष्ट्राच्या नेहा ढाबळेने १ मिनिट ५२ सेकंद वेळेसह कांस्यपदक विथया रामराज व श्रीवर्धनी एस के या तमिळनाडूच्या धावपटूंनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदकाला गवसणी घातली.

### स्टीव्ह स्मिथ कर्णधार; कांगारू संघाने केले ५ बदल

मुंबई : पॅट कमिन्स, जोश हेझलवूड आणि मिशेल मार्श यांच्या दुखापती आणि मार्कस स्टोइनिसच्या निवृत्तीमुळे ऑस्ट्रेलियाला आधीच बदल करावे लागले आहेत. स्टार्कच्या बाहेर पडल्यानंतर, १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तान आणि यूएई येथे होणाऱ्या या स्पर्धेत कांगारूंना त्यांच्या संपूर्ण आघाडीच्या वेगवान गोलंदाजांशिवाय खेळावे लागेल. १३ जानेवारी रोजी जाहीर झालेल्या संघात ५ बदल आहेत. पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत स्टीव्ह स्मिथकडे संघाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मिशेल मार्शच्या अनुपस्थितीत फ्रेझर-मॅकगर्कला टॉप-ऑर्डर पर्याय म्हणून संघात समाविष्ट करण्यात आले आहे, तथापि, त्याने ५ एकदिवसीय सामन्यांमध्ये १७.४० च्या सरासरीने धावा केल्या आहेत. ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्स ट्रॉफी संघ : स्टीव्ह स्मिथ (कर्णधार), शॉन ॲबॉट, ॲलेक्स कॅरी, बेन द्वारशीस, नॅथन एलिस, जेक फ्रेझर-मॅकगर्क, आरोन हार्डी, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, स्पेन्सर जॉन्सन, मार्नस लाबुशेन, ग्लेन मॅक्सवेल, तन्वीर संघा, मॅथ्यू शॉर्ट, ॲडम झांपा

# भारताचा इंग्लंडवर १४२ धावांनी विजय

## मालिकेत ३-० ने वर्चस्व
## शुभमन गिल सामनावीर


विराट कोहली : धावा ५२ चेंडू ५५, चौकार ७, षट्कार १


श्रेयर अय्यर : धावा ७८, चेंडू ६४, चौकार ८, षट्कार २

◆ **अहमदाबाद, १२ फेब्रुवारी**

शुभमन गिल (११२), विराट कोहली (५२) व श्रेयस अय्यरची दमदार फलंदाजी आणि अर्शदीप सिंगसह हर्षित राणा, अक्षर पटेल व हार्दिक पांड्याच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारताने नरेंद्र मोदी स्टेडियमवर इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात १४२ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत सरळ ३-० ने वर्चस्व गाजविले.

भारताने उभारलेल्या ३५६ धावांना प्रत्युत्तर देताना इंग्लंडचा संपूर्ण संघ ३४.२ षटकांत २१४ धावांतच गारद झाला.

पहिल्या व दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात विजय मिळवून आधीच वन-डे मालिका जिंकणाऱ्या भारतीय संघाने नरेंद्र मोदी स्टेडियमवर इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या वन-डे सामन्यात ३५६ अशी सर्वोच्च धावसंख्या नोंदविली. भारताच्या या धावांच्या डोंगरात शुभमन गिलने शतकी, तर श्रेयस अय्यर (७८) व विराट कोहलीने (५२) अर्धशतकी योगदान दिले.

नागपूर व कटकमध्ये पहिल्या दोन सामन्यात अनुक्रमे ८७ व ६० धावांची खेळी करत शुभमन गिलने वन-डेमध्ये आपले सातवे शतक झळकावले. कोणत्याही भारतीय फलंदाजाने आपल्या पहिल्या ५० सामन्यांमध्ये इतके शतक झळकावले नाही. १४ डावांपूर्वी त्याने केलेले सहावे शतक पाहता हे आणखी उल्लेखनीय आहे.

गिलला त्याच्या शतकी खेळीदरम्यान महत्त्वाचे सहकारी मिळाले. गिलने विराट कोहलीसोबत दुसऱ्या गड्यासाठी ११६ धावांची भागीदारी केली, तर श्रेयस अय्यरसोबत तिसऱ्या गड्यासाठी १०४ धावांची भागीदारी केली. शुभमन गिलने १०२ चेंडूंत १४ चौकार व ३ षट्कारांसह ११२ धावांची आकर्षक शतकी खेळी केली. कोहलीने अवघ्या ५५ चेंडूंत ७ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ५२ धावांची खेळी, तर श्रेयसने केवळ ६४ चेंडूंत ८ चौकार व २ षट्कारांसह ७८ धावांची खेळी केली. केएल राहुलनेही तडाखेबंद फलंदाजी करत २९ चेंडूंत ४० धावांची भर घातली. त्याने ३ चौकार व १ षट्कार हाणला. भारताने मर्यादित ५० षटकांत सर्वबाद ३५६ धावा उभारल्या.

इंग्लंडकडून आदिल रशीदने ६४ धावांत ४ बळी घेतले. मार्क वूडने २ बळी, तर साकीब मेहम्मद, गस ॲटकिन्सन व जो रूटने प्रत्येकी एक बळी टिपला.

विजयासाठी ३५७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्याच्या तयारीत असलेल्या बेन डकेटला (मांडीच्या दुखापतीमुळे मैदान सोडावे लागले. हा इंग्लंडला सुरुवातीचा धक्का होता. फिल सॉल्ट व डकेटने ६० धावांची सलामी भागीदारी केली. डकेटने २२ चेंडूंत ८ चौकारांसह ३४ धावांचे योगदान दिले. नंतर डकेट पाठोपाठ फिल सॉल्टलासुद्धा अर्शदीप सिंगने तंबूचा रस्ता दाखवला. त्यावेळी इंग्लंडची स्थिती ८.४ षटकांत २ बाद ८० अशी झाली होती. त्यानंतर टॉम बॅंटन (३८), जो रूट (२४) व गस ॲटकिन्सनने (३८) संघाला विजयाचे लक्ष्य गाठून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले, परंतु इतर फलंदाज भारतीय गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्याचा सामना करण्यात असमर्थ ठरले, परिणामी इंग्लंडचा संपूर्ण संघ ३४.२ षटकांत २१४ धावांत बाद झाला.

भारताकडून अर्शदीप सिंग, हर्षित राणा, अक्षर पटेल व हार्दिक पांड्याने प्रत्येकी २ बळी, तर वॉशिंग्टन सुंदर व कुलदीप यादवने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# बुमराह चॅम्पियन्स चषकातून बाहेर; हर्षित राणाची निवड




◆ **नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

भारताचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पाठीच्या दुखापतीमुळे आयसीसी चॅम्पियन्स चषक-२०२५ क्रिकेट स्पर्धेतून अधिकृतपणे बाहेर झाला आहे.

बुमराहला तात्पुरत्या संघात स्थान मिळाले असूनही, तो संघात स्थान मिळवू शकला नाही. त्यामुळे बीसीसीआयने बुमराहच्या जागी हर्षित राणाला निवडण्याची घोषणा केली. आठ देशांच्या या स्पर्धेला १९ फेब्रुवारी रोजी कराची येथे सुरुवात होईल, ज्यामध्ये यजमान पाकिस्तानचा पहिला सामना न्यूझीलंडशी होईल.

यापूर्वी, बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेतील शेवटच्या कसोटी सामन्यादरम्यान झालेल्या दुखापतीतून बरे होण्याबाबत चिंता असूनही बुमराहला चॅम्पियन्स चषकासाठी भारताच्या १५ सदस्यीय संघात स्थान देण्यात आले होते.

बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये असलेल्या बुमराहने अनेक स्कॅन केले. भारताचा एकदिवसीय आणि कसोटी कर्णधार रोहित शर्माने सांगितले होते की, त्याच्या गुडघ्याच्या दुखापतीबाबत अधिक स्पष्टता येण्यासाठी संघ व्यवस्थापन स्कॅन निकालांची वाट पाहत आहे.

आम्ही त्याच्या स्कॅनवरील काही अपडेट्सची वाट पाहत असून त्याचा अहवाल येत्या काही दिवसांतच मिळण्याची आहे.

स्कॅन अहवाल मिळाल्यानंतर, तो सध्या कुठे आहे व तो शेवटच्या वन-डे सामन्यासाठी उपलब्ध असेल की नाही याबद्दल आम्हाला अधिक स्पष्टता येईल, असे रोहितने भारत विरुद्ध इंग्लंड एकदिवसीय मालिकेपूर्वी सांगितले होते.

बुमराहची अनुपस्थिती भारतासाठी एक मोठा धक्का असेल. उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज बॉर्डर-गावस्कर चषकात अपवादात्मक फॉर्ममध्ये होता, त्याने पाच सामन्यांमध्ये १३.०६ च्या सरासरीने ३२ बळींची नोंद केली. ऑस्ट्रेलियामध्ये बुमराहने प्रचंड कामाचा ताण घेतला, त्याने १५१.२ षटके टाकलीत. मालिकेतील कोणत्याही भारतीय गोलंदाजाने टाकलेल्या सर्वाधिक षटकांची नोंद झाली. मेलबर्नमधील चौथ्या कसोटीत त्याने ५० पेक्षा जास्त षटके टाकलीत.

२०२४ च्या टी-२० विश्वचषकात भारताच्या यशातही त्याने भूमिका बजावली होती. तिथे त्याला ८.२६ च्या उल्लेखनीय सरासरीने आणि ४.१७ च्या इकॉनॉमी रेटने १५ बळी घेत मालिकावीर म्हणून निवडण्यात आले होते.

भारताने वरुण चक्रवर्तीलाही संघात स्थान दिले आहे. सुरुवातीला तात्पुरत्या संघात स्थान मिळालेल्या यशस्वी जयस्वालची जागा हा फिरकी गोलंदाज घेईल.

भारत आपले सर्व सामने दुबईमध्ये खेळेल. पाकिस्तान या ५० षटकांच्या स्पर्धेचा गतविजेता आहे. २०१७ मध्ये पाकिस्तानने अंतिम सामन्यात भारताला हरवून जेतेपद जिंकले होते.

आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी अंतिम भारत संघ असा : रोहित शर्मा (कर्णधार), विराट कोहली, शुभमन गिल (उपकर्णधार), श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टिरक्षक), रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, ऋषभ पंत (यष्टिरक्षक), हार्दिक पांड्या, हर्षित राणा, मोहम्मद शमी, अर्शदीप वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव. (वृत्तसंस्था)

# विराटने मोडला सचिनचा विक्रम

## असा पराक्रम करणारा ठरला पहिला भारतीय फलंदाज

◆ **अहमदाबाद, १२ फेब्रुवारी**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगलेल्या इंग्लंड विरुद्धच्या तिसऱ्या व अखेरच्या वन-डे सामन्यात विराट कोहलीने ५५ चेंडूत ५२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या खेळीबरोबरच विराटने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा मोठा विक्रम मोडीत काढला आहे.

कोहलीने सचिन तेंडुलकरला मागे टाकत आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यात इंग्लंडविरुद्ध ४००० धावांचा टप्पा पार केला. हा गाठणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे.

याआधी इंग्लंड विरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम हा तेंडुलकरच्या नावावर होता. तेंडुलकरने आपल्या कारकिर्दीतील ६९ सामन्यातील ९० डावात ३९९० धावा केल्या होत्या. कोहलीने ८७ सामन्यातील १०९ डावात सचिनला मागे टाकत ४ हजार धावांचा पल्ला गाठला.

इंग्लंडविरुद्ध सर्वाधिक धावा करण्याचा विश्वविक्रम ऑस्ट्रेलियाचे दिग्गज डॉन ब्रॅडमन यांच्या नावे आहे. या दिग्गजाने इंग्लंड विरुद्ध ३७ सामन्यात ५०२८ धावा केल्या आहेत. इंग्लंडविरुद्ध ५००० धावा करणारा हा एकमेव फलंदाज आहे. या सर्व धावा कसोटीत आल्या आहेत. (वृत्तसंस्था)

**इंग्लंडविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारे फलंदाज**

| | | |
|---|---|---|
| सर डॉन ब्रॅडमन | : | ३७ सामन्यांमध्ये ५०२८ धावा |
| ॲलन बॉर्डर | : | ९० सामन्यांमध्ये ४८५० धावा |
| स्टीव्ह स्मिथ | : | ८५ सामन्यांमध्ये ४८१५ धावा |
| व्हिव्ह रिचर्ड्स | : | ७२ सामन्यांमध्ये ४४८८ धावा |
| रिकी पॉण्टिंग | : | ७७ सामन्यांमध्ये ४१४१ धावा |
| विराट कोहली | : | ८७ सामन्यांमध्ये ४०३६ धावा |
| सचिन तेंडुलकर | : | ६९ सामन्यांमध्ये ३९९० धावा |

# मालविका बनसोडची हाओ वाईवर मात

## भारत उपांत्यपूर्व फेरीत
## बॅडमिंटन आशिया मिश्र सांघिक
## मकाऊवर ५-० ने विजय



मालविका बनसोड

◆ **किंगदाओ (चीन), १२ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या बॅडमिंटन आशिया मिश्र संघ अजिंक्यपद स्पर्धेत बुधवारी भारताने पहिल्या गट ड साखळी सामन्यात मकाऊचा ५-० असा पराभव करून आपल्या मोहिमेची जोरदार सुरुवात केली.

दुबई येथे झालेल्या गत स्पर्धेत कांस्यपदक जिंकल्यानंतर भारताने आता उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. भारताचा दुसरा व शेवटचा गट सामना गुरुवारी कोरियाशी होईल.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक विजेते सतीश कुमार करुणाकरन व आद्य वरियथ या मिश्र दुहेरी जोडीने भारताला दमदार सुरुवात करून दिली. त्यांनी पहिल्या सामन्यात इओक चोंग लिओंग आणि वेंग ची एनजी २१-१०, २१-९ असा विजय मिळवला.

पुरुष एकेरीत, २०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या लक्ष्य सेनने पांग फोंग पुईचा २१-१६, २१-१२ असा पराभव करून २-० असा विजय मिळवला.

२०२४ च्या हायलो ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नागपूरच्या मालविका बनसोडने महिला एकेरीत हाओ वाई चानवर २१-१५, २१-९ असा विजय मिळविला.

चिराग शेट्टीने एमआर अर्जुनसोबत जोडी बनवली आणि पुरुष दुहेरीत चिन पोन पुई आणि कोक वेन वोंग यांचा २१-१५, २१-१९ असा पराभव केला.

जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकाच्या महिला दुहेरी जोडीने त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंदने अंतिम सामन्यात एनजी वेंग ची आणि पुई ची वा यांचा २१-१०, २१-५ असा केला. गुरुवारी कोरियाविरुद्धचा सामना गटातील अव्वल स्थान निश्चित करेल. (वृत्तसंस्था)

# मुंबई, गुजरात, केरळ उपांत्य फेरीत

## रणजी करंडक

◆ **कोलकाता, १२ फेब्रुवारी**

विदर्भापाठोपाठ गत विजेता मुंबई, गुजरात व केरळ संघांनी प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. आता १७ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारीदरम्यान पहिला उपांत्य सामना विदर्भ आणि गत विजेता मुंबई तसेच दुसरा उपांत्य सामना केरळ विरुद्ध गुजरात संघादरम्यान खेळला जाणार आहे.

कोलकाताच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या तिसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात गतविजेत्या मुंबईने हरयाणावर १५२ धावांनी विजय संपादन केला.

राजकोट येथे खेळल्या गेलेल्या चौथ्या उपांत्यपूर्व सामन्यात जम्मू-काश्मीरने गुजरातवर एक डाव व ९८ धावंनी विजय संपादन केला. १०३ धावंची शतकी खेळी व ३७ धावांत २ बळी टिपणारा गुजरातचा जयमीत पटेल सामनावीर ठरला.

सौराष्ट्राच्या पहिल्या डावातील २१५ धावांना प्रत्युत्तर देताना गुजरातने १५९.१ षटकांत सर्वबाद ५११ धावांचा डोंगर रचला व पहिल्या डावात २९६ धावांची भक्कम आघाडी घेतली. सौराष्ट्राला दुसऱ्या डावांत पिछाडीसुद्धा भरून काढता आली नाही आणि त्यांचा दुसरा डाव ६२.१ षटकांत १९७ धावांतच आटोपला.

पुण्यात जम्मू-काश्मीर व केरळ संघादरम्यान खेळला गेलेला पहिला उपांत्यपूर्व सामना अनिर्णीत राहिला. (वृत्तसंस्था)

# शिखर धवन चॅम्पियन्स चषकाचा सदिच्छादूत



◆ **दुबई, १२ फेब्रुवारी**

आगामी १९ फेब्रुवारी ते ९ मार्च दरम्यान पाकिस्तान आणि दुबई येथे होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेसाठी बुधवारी भारताचा माजी सलामीवीर शिखर धवन याची चार चॅम्पियन्स चषक सदिच्छादूतांपैकी एक म्हणून निवड करण्यात आली.

शिखर धवनशिवाय आयसीसीने २०१७ चॅम्पियन्स चषक विजेता पाकिस्तानचा कर्णधार सर्फराज अहमद, ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू शेन वॉटसन आणि न्यूझीलंडचा महान वेगवान गोलंदाज टिम साउथी यांनाही चॅम्पियन्स चषकाचा सदिच्छादूत म्हणून नियुक्त केले आहे.

हे चौघे अतिथी स्तंभ लिहितील व सामन्यांनाही उपस्थित राहतील. या स्पर्धेबद्दल आपले विचार मांडतील. आयसीसीच्या सर्वोच्च सन्मानासाठी जगातील सर्वोत्तम आठ संघ स्पर्धा करतील.

चॅम्पियन्स चषकाचा भाग असणे व आगामी आवृत्तीचा सदिच्छादूत म्हणून आनंद घेण्याची संधी मिळणे ही एक विशेष भावना आहे, असे धवन म्हटले आहे.

ही स्पर्धा उत्साह, अभिमान आणि दृढनिश्चयाने भरलेली आहे, यामुळेच ती सहभागी असलेल्या प्रत्येकांसाठी एक रोमांचक व सुंदर प्रवास घडवते, असेही तो म्हणाला.


चॅम्पियन्स चषकांत भारताचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू शिखर धवन याने दोन आवृत्त्यांमध्ये उत्कृष्ट ७०१ धावा केल्या असून तो या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात प्रतिष्ठित खेळाडूंपैकी एक आहे. स्पर्धेत सलग दोन गोल्डन बॅट्स (सर्वाधिक धावा करणारा) जिंकणारा एकमेव खेळाडू असण्याचा मानही त्याच्याकडे आहे.

२०१३ च्या आवृत्तीत उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याला प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून सन्मानित करण्यात आले होते तसेच चॅम्पियन्स चषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतके ठोकण्याचा विक्रम त्याच्या नावावर आहे. (वृत्तसंस्था)


प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यादरम्यान बुधवारी माघी पौर्णिमेला संगमात पवित्र स्नान केल्यानंतर प्रार्थना करताना माजी भारतीय क्रिकेट कर्णधार अनिल कुंबळे

# जान्हवीची सुवर्ण हॅट्ट्रिक, रूपालीला रौप्य

## महाराष्ट्र महिला मल्लखांब संघाला रौप्य


जान्हवी जाधव व रूपाली गंगावणे

◆ **खतिमा, १२ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जिम्नॅस्टिक्स पाठोपाठ मराठमोळ्या मल्लखांबमध्येही महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंनी आपले वर्चस्व दाखवले आहे. दोरीचा मल्लखांब प्रकारात जान्हवी जाधवने सुवर्ण, तर रूपाली गंगावणेने रूपेरी यशाला गवसणी घातली. मुलींच्या सांघिक प्रकारात महाराष्ट्र संघाने रौप्यपदकाची कमाई करीत आजचा दिवस गाजविला


विश्वकरंडक विजेती असलेल्या मुंबई उपनगरच्या जान्हवी जाधवने कलात्मक प्रदर्शन करीत अवघड रचना सादर करीत प्रेक्षकांची मने जिंकली. ८.६५ गुणांची करत सलग तिसऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जान्हवीने आपल्या यशाचा झेंडा फडकविला. जान्हवीने अहमदाबाद स्पर्धेत १ सुवर्ण ३ रौप्य, तर गत गोवा स्पर्धेत १ सुवर्ण, १ कांस्यपदकांची लयलूट केली होती.

स्पर्धेत वयाने सर्वात मोठी असणारी २७ वर्षीय रूपाली गंगावणेने रूपेरी यश संपादले. रूपालीने ८.४५ गुणांची कमाई करीत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा पदकाची हॅट्ट्रिक केली. अहमदाबादमधील स्पर्धेत ३ सुवर्ण १ कांस्य, तर गत स्पर्धेत रूपालीने सुवर्ण चौकार झळकविला होता.

महिलांच्या सांघिक प्रकारात जान्हवी जाधव, नेहा क्षीरसागर, निधी राणे, पल्लवी शिंदे, प्रणाली मोरे व रूपाली गंगावणे यांनी ८२.८५ गुणांची कमाई करीत रौप्यपदक पटकावले. ८३.२० गुण संपादून मध्य प्रदेश संघाने सुवर्णपदक जिंकले आहे. (वृत्तसंस्था)

# फुटबॉलमध्ये भारताची अफाट क्षमता

## फ्री स्टाईल फुटबॉलपटू जेमी नाईटचा विश्वास
## पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे कार्यशाळा



◆ **वर्धा, १२ फेब्रुवारी**

भारतातील हा आपला पाचवा दौरा आहे. येथे खेळांविषयी प्रचंड आकर्षण आणि जिद्द आहे. येथील खेळाडूंमध्ये फुटबॉलविषयी आत्मियता आणि प्रेम आहे. त्यामुळे फुटबॉल खेळामध्ये भारताची क्षमता अफाट आहे. समर्पणासह खेळत असल्याने भारत लवकरच जागतिक स्तरावर कदाचित फिफा वर्ल्ड कपमध्येही स्पर्धा करू शकेल, असा विश्वास प्रसिद्ध फुटबॉलपटू जेमी नाईट यने व्यक्त केला.

स्थानिक पोदार इंटरनॅशनल स्कूलतर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्री स्टाईलर पैकी एक जेमी नाईट याला आज, बुधवारी कार्यशाळेकरिता निमंत्रित करण्यात आले होते. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्री स्टाइलर्सपैकी एक आहे. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षम बनविण्यासाठी पोदारतर्फे पुढाकार घेण्यात आला.

जेमी नाईट आपल्या अविश्वसनीय नियंत्रण, अचूकता आणि सर्जनशीलतेसाठी जगभर प्रसिद्ध आहे. २०१७ व २०१८ च्या चॅम्पियन्स लीग फायनलमध्ये त्याने मैदानावर अप्रतिम सादरीकरण केले. त्याने सादर केलेला खेळ आणि अद्भूत कामगिरीने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना थक्क केले. फ्रीस्टाईल फुटबॉल शारीरिक आणि मानसिक आरोग्य विकसित करण्यात मदत करते आणि वाढीच्या मानसिकतेचे महत्त्व शिकवत असल्याचे तो म्हणाला. यावेळी पोदार एज्युकेशन नेटवर्कचे संचालक हर्ष पोदार यांनी आमच्या शाळेत जेमी नाईट यांची उपस्थिती विद्यार्थ्यांसाठी खरोखर प्रेरणादायी अनुभव ठरली असे म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# विडी कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास या पुस्तकाचे सोमवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
प्राचार्य डॉ. मीना गायकवाड यांच्या 'विडी कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ माजी आमदार कॉम्रेड नरसय्या आडम यांच्या अध्यक्षतेखाली आणि खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

जागृती पब्लिकेशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य सिटू संघटना जनरल सेक्रेटरी कॉम्रेड एम.एच. शेख, सिध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सहाय्यक धमदाय आयुक्त संजय पाईकराव, जेष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड, डॉ. श्रीकांत येळेगावकर व ॲड. अशोक वाघमारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या वेळी 'सन्मान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा' उद्घाटन समारंभही मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती या संस्थेचे सचिव प्रा.डॉ. डी. आर गायकवाड यांनी दिली आहे.

# टेक्सटाईल पार्क निर्माण करण्यासाठी प्रस्ताव पाठवा

- पालक सचिव संजय सेठी
- डाळिंब व केळींवर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न करा
- सातसुत्री कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
सोलापूर जिल्हा हा वस्त्रोद्योगांमध्ये संपूर्ण देशभरात प्रसिद्ध आहे. चादरी, टॉवेल व स्कूल युनिफॉर्मचे हब सोलापूर होत असून परदेशातही मोठ्या प्रमाणावर निर्यात होत आहे; त्यामुळे वस्त्रोद्योगाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळावी यासाठी सोलापूर येथे टेक्स्टाईल पार्क निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा. यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून टेक्स्टाईल पार्क मंजूर करून घेऊ, असे प्रतिपादन परिवहन व बंदरे, गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव तथा सोलापूर जिल्ह्याचे पालक सचिव संजय सेठी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित सर्व शासकीय विभागाचा आढावा पालक सचिव सेठी यांनी घेतला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह सर्व संबंधित शासकीय विभाग प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी मुख्यमंत्री महोदयांचा सात सुत्री कार्यक्रमा अंतर्गत शंभर दिवसात प्रत्येक शासकीय विभागाने करावयाच्या कामकाजाची माहिती देऊन आज रोजी पर्यंत करण्यात येत असलेल्या कामाविषयी सविस्तर माहिती पीपीटीद्वारे सादर केली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दिली तर महापालिका आयुक्त शितल उगले तेली यांनी स्मार्ट सिटी अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामांची तसेच वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी येत असलेल्या अडचणींची माहिती देऊन त्या सोडवण्याच्या दृष्टीने सहकार्य करण्याची मागणी केली.

## सातसुत्री कार्यक्रम सातत्यपूर्ण ठेवण्याचे आवाहन

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्यात सर्वत्र शंभर दिवसात सात सुत्री कार्यक्रम राबवण्यात येत आहे सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागाने या कार्यक्रमात आपला सक्रिय सहभाग घेऊन कार्यालयात नागरिकांना विविध सोयी सुविधा देण्याबरोबरच त्यांच्या तक्रारी व कामे वेळेत मार्गी लावून त्यांना विविध शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच कार्यालयाच्या स्वच्छतेबरोबरच अभिलेखांचे वर्गीकरण ही योग्य पद्धतीने करून ठेवावे व हा कार्यक्रम सातत्यपूर्ण सुरू ठेवावा, असे निर्देश पालक सचिव सेठी यांनी दिले.

## वाहनांना बसवा हाय सिक्युरिटी नंबर प्लेट

१ एप्रिल २०१९ पूर्वी जी शासकीय वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत त्या सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी बसवून घेणे बंधनकारक आहे. तसेच सर्व खाजगी वाहनांनाही बंधनकारक असल्याची माहिती सेठी यांनी यावेळी दिली.

# बीआयटीच्या ५१ विद्यार्थ्यांची बजाज कंपनीमध्ये निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ फेब्रुवारी-**
जेएसपीएम पुणे संचलित बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालय (बीआयटी कॉलेज) मधील अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा) तृतीय वर्षात शिकणाऱ्या ५१ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे बजाज ऑटोमध्ये निवड झाल्याची माहिती ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिष्ठाता प्रा. गजाजन बुरगुटे यांनी दिली.

संकुल संचालक ऋतुराज शिवाजीराव सावंत यांच्या मागर्शन व सूचनेनुसार महाविद्यालयामध्ये शिक्षण प्रशिक्षण, शैक्षणिक निकाल, इन्फ्रास्ट्रक्चरबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार केला जातो. प्लेसमेंटमध्ये देखील महाविद्यालयने आघाडी घेतली आहे, असे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. गजानन बुरगुटे म्हणाले. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. बुरगुटे, प्रा. चोपडे, प्रा. अमोल माळी, प्रा. ठोकळ, प्रा, मारडकर, प्रा. माने यांचे मार्गदर्शन लाभले. संकुल संचालक ऋतुराज शिवाजीराव सावंत, प्राचार्य डॉ. रणजित शिराळ, कार्यालयीन अधीक्षक प्रा. प्रशांत बुद्रुक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### प्रमोद गुर्रम



**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी -**
येथील अशोक चौक परिसरातील रहिवासी प्रमोद रामलू गुर्रम यांचे बुधवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार बहिणी, नात असा परिवार आहे. पुर्वभागातील प्रसिध्द फिटवेल टेलरचे ते मालक होते.

### बाबासाहेब शेतसंदी



**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी -**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील औराद येथील ज्येष्ठ बागायतदार शेतकरी, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य बाबासाहेब नबीसाहेब शेतसंदी (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवाचा दफनविधी औराद येथे पार पडला. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. डॉ. सुलतान शेतसंदी यांचे ते वडील होत.

# पालक सचिव सेठी यांनी केली सोलापूर विमानतळाची पाहणी

## विमानतळ लवकर सुरू होण्याची सोलापूरकरांना आशा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
सोलापूर विकास मंच आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गेल्या काही महिन्यापासून सोलापुरात विमानसेवा चालू होण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले होते. इतकेच नाहीतर केंद्रीय वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सोलापूर विमानसेवा चालू करण्यासाठी बैठका घेतल्या होत्या. या ठिकाणच्या विमानतळावरील उड्डाणाला वारंवार काही त्रुटीही निघत होत्या; आता त्या सर्व त्रुटी दूर झाल्या असून आणि आता जिल्ह्याचे पालक सचिव संजय शेट्टी यांनी शासकीय विभागांचा आढावा घेतल्यानंतर होटगी रोड येथील सोलापूर विमानतळाला भेट देऊन विमानतळाची पाहणी केली व कामकाजाची माहिती घेतल्याने विमानसेवा चालू होण्याची आशा सोलापूरकरांना लागली आहे.

यावेळी विमान सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने येत असलेल्या अडचणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद तसेच विमानतळ प्राधिकरणाचे व्यवस्थापकीय संचालक बंजारा व श्रीमती अंजनी यांच्याकडून जाणून घेतल्या. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार हेही उपस्थित होते. जिल्ह्यात उद्योजक यावेत आणि सोलापुरातील युवकांच्या हाताला रोजगार आपल्या शहरातच मिळावा यासाठी सोलापूर विचार मंच गेल्या काही वर्षांपासून विमानसेवा चालू करण्यासाठी खटपट करीत आहे. इतकेच नाहीतर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आ. सचिन कल्याणशेट्टी यांनीही विशेष प्रयत्न केले आहेत. आता पालक सचिवांच्या भेटीनंतर ही सेवा कार्यान्वित होण्याचे संकेत मिळत आहेत.

चिंचोळी व अक्कलकोट एमआयडीसी अंतर्गत उद्योगांना पूरक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एमआयडीसी व जिल्हा उद्योग केंद्राने आवश्यक पावले उचलावीत. जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाने जोडला गेलेला असून, लवकरच हवाई मार्गाने ही जोडला जाईल त्यामुळे येथील उद्योग व्यवसायाला अधिक चालना मिळेल.विमानतळ प्राधिकरणकडून विमान सेवा सुरू होण्याच्या अनुषंगाने येत असलेल्या अडचणीचा सविस्तर आढावा घेऊन त्यातून मार्ग काढण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले.

# ८०० जेष्ठ नागरिक श्री जगन्नाथ पुरीला मार्गस्थ

## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना; जिल्हाधिकाऱ्यांनी दाखविला हिरवा झेंडा






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील ८०० ज्येष्ठ नागरिकांना ओरिसा येथील श्री जगन्नाथ पुरी दर्शनासाठी घेऊन जाणाऱ्या रेल्वे गाडीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर रेल्वे स्टेशन येथे फित कापून तसेच रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून या योजनेचा शुभारंभ करण्यात आला व ही रेल्वेचे श्री जगन्नाथ पुरीकडे प्रयाण झाले. या तीर्थयात्रेचा कालावधी दि. ११ ते १६ फेब्रुवारी २०२५ असा असणार आहे.

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत ओरिसातील श्री जगन्नाथ मंदिर पुरी येथे दर्शनासाठी जाणाऱ्या नागरिकांना सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, रेल्वे विभागाचे मॅनेजर सोना, वैद्यकीय अधिकारी ऋतुजा व्हटकर आणि समाज कल्याण विभागाचे अधिकारी कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या योजनेअंतर्गत श्री जगन्नाथ पुरी कडे जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. यात्रा कालावधीत समाज कल्याणचे अधिकारी, कर्मचारी तसेच वैद्यकीय स्टाफ सोबत असून, या अनुषंगाने काही तक्रार असेल तर तात्काळ संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रारंभी समाज कल्याणच्या सहाय्यक सोनवणे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले तसेच या कालावधीत या नागरिकांसोबत असलेल्या वैद्यकीय स्टाफ व समाज कल्याणच्या स्टाफ ची ओळख संबंधितांना करून देण्यात आली.

### नागरिकांमध्ये आनंद, उत्साह

जगन्नाथपुरी येथे दर्शनासाठी जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह, आनंद व श्री जगन्नाथाच्या भेटीची ओढ दिसून येत होती. तर ही भेट, हे दर्शन राज्य शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेतून होत असल्याने त्यांचा आनंद द्विगुणित झालेला दिसून येत होता.

# क्रीडा



# श्री सिद्धेश्वर बालमंदिर स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**
श्री सिद्धेश्वर बालमंदिर इंग्लिश मीडियम मध्ये श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीचे चेअरमन धर्मराज काडादी व पालक सदस्य गुरुराज माळगे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून व आकाशात फुगे सोडून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

मुख्याध्यापिका स्मिता कोरवार, पर्यवेक्षिका सुनंदा कलशेट्टी, पालक शिक्षक संघाच्या सदस्या मोनल देशमुख, स्नेहा गालपल्ली, विनुता स्वामी, आरती कोल्हापुरे, प्रतिक्षा उस्तुरगे, गायत्री कमलापुरे, वर्षाराणी हक्के, पूजा ढवळे यांच्या हस्ते भूमि पूजन करून कार्यक्रमास सुरुवात सुरुवात केली. प्रारंभी शाळेतील बाल चिमुकले नर्सरी ते दुसरीतील विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या स्वागतासाठी स्वागत गीत सादर केले. तसेच इयत्ता पहिली ते चौथीतील विद्यार्थी झुम्बा डान्स व इयत्ता तिसरी ते पाचवीतील विद्यार्थीनीं विविध योगासनावर आधारित योगा डान्स सादर केले. क्रीडा स्पर्धेतील विजेते विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण श्री सिद्धेश्वर बाल मंदिर पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा हेब्बाळ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षिका वैष्णवी सुरवसे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रेया पांढरे यांनी केले व स्वाती गंभीरे यांनी आभार मानले.

# गवळी वस्ती तालीम संघातर्फे रविवारी स्वागत तोडकर यांचे व्याख्यान

## जलतरणपटू कीर्ती भराडियाचा शिवछत्रपती पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ फेब्रुवारी-**
गवळी वस्ती तालीम संघ सार्वजनिक शिवजन्मोत्सव व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने रविवारी १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता दमाणी नगर येथील हभप आप्पाराव सवाळकर उद्यानात राष्ट्रीय पारितोषिक विजेते निसर्गोपचार तज्ञ स्वागत तोडकर यांचे व्याख्यान होणार असल्याचे महादेव गवळी, उत्सव अध्यक्ष विष्णू जगताप यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

व्याख्यानमालेचे हे तिसरे वर्ष आहे. वागत तोडकर यांचे औषधाविना आरोग्य या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे. स्वागत तोडकर हे निसर्गोपचार तज्ञ असून मनुष्याच्या शारीरिक सर्व व्याधींवर ते घरगुती उपचार सांगतात. याच कार्यक्रमात व्याख्याते स्वागत तोडकर यांच्या हस्ते जलतरणपटू कीर्ती भराडिया यांचा शिवछत्रपती पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संघाच्या वतीने पावती बुक छापून वर्गणी गोळा केली जात नाही तर स्वनिधीतून सर्व कार्यक्रम राबविले जातात. ग्रंथालय आणि संगणक प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही यावेळी हेमंत पिंगळे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस शामराव गांगर्डे, शेखर कवठेकर, लहू गायकवाड, बालाजी चराटे, चंद्रकांत पवार,अरविंद गवळी,सुनील कदम, भैय्या जगताप, संदीप काशीद, बालाजी सराटे, सुनील गवळी, महादेव गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.



# मानसिक, शारीरिक स्वास्थ्यासाठी मैदानी खेळ महत्त्वाचे : डॉ. पृथ्वीराज माने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**
आजच्या बदलत्या जीवनशैलीत निरोगी आयुष्य जगण्यासाठी खेळ महत्त्वाची भूमिका बजावतात मैदानी खेळामुळे शारीरिक विकासाबरोबर मानसिक खेळांना महत्त्व प्राप्त झाले आहे, असे प्रतिपादन ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बेलाटी येथील संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने स्मॅश २०२४-२५च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. खेळामुळे विद्यार्थ्यांत संघभावना शिस्त चिकाटी यासारखे गुण विकसित होतात खेळाडू वृत्तीने खेळण्याचा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी संस्थेचे विवेकानंद गुंड, एम ए चोपडे, मंगल चव्हाण, सचिन सुरवसे, गोकुळ यादव व विविध खेळातील पंच क्रीडाशिक्षक मार्गदर्शक पालक खेळाडू इत्यादी उपस्थित होते. ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय स्मॅश स्पर्धेचं आयोजन रेल्वे मैदान येथे करण्यात आले आहे. त्यामध्ये बॅडमिंटन, स्विमिंग, टेबल , महिला क्रिकेट व बी एम आय टी कॅम्पस मध्ये बुद्धिबळ व व्हॉलीबॉल आदींचा समावेश आहे. या स्पर्धेमध्ये २००हून अधिक खेळाडूचा सहभाग झालेला आहे असे क्रीडा संचालक प्रा गोकुळ यादव यांनी सांगितले आहे. या स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने, सचिवा जयश्री माने, कॅम्पस डायरेक्टर राहुल माने, प्राचार्य एस.जी. कुलकर्णी यांनी स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



# श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकच्या खेळाडूंची राज्य स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
डिप्लोमा इंजिनिअरींगच्या विद्यार्थिनींकरिता अंतर्गत झोन शासकीय तंत्रनिकेतन सोलापुर येथे झालेल्या स्पर्धेतून श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकची खेळाडूंची राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली.

विद्यार्थीनींना क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा. स्वयंप्रकाश व्यास, प्रा. विवेकानंद दासरी, प्रा. शितल सावळगी, प्रा. संग्राम माने, प्रा. रविकिरण पतंगे, प्रा. स्नेहल कोर्टकर, ऐश्वर्या व्हनमाने यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांचे संस्थेचे अध्यक्ष धर्मराज काडादी, प्राचार्य गजानन धरणे, गव्हर्नंग बॉडीचे सदस्य सी.बी. नाडगौडा, मल्लिनाथ मसरे, काशिनाथ ढोले, गुरुराज माळगे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. **कामगिरी :** श्रेया चव्हाण (१०० व २०० मीटर धावणे, प्रथम) ४ बाय १०० मीटर सुवर्ण (श्रेया चव्हाण, तेजस्वी वसेकर, अभिलाषा बिराजदार, वैष्णवी भानुमते आणि दीक्षा गुंड) टेबल टेनिस द्वितीय (ऋतुजा पाटील, स्वाती वाघमारे, मृणालिनी भडंगे, संजना बमणगे व समीक्षा मुळे).

# सोलापूरच्या सिद्धार्थ साखरे, लातूरच्या वैष्णवी पवारला ब्राँझ

**सोलापूर, दि. १२ फेब्रवारी-**
भोलपूर (पश्चिम बंगाल) येथे सुरू असणाऱ्या ज्युनिअर नॅशनल धनुर्विद्या स्पर्धेत महाराष्ट्र संघातील रिकर्व्ह प्रकारात सिद्धार्थ साखरे (सोलापूर) व वैष्णवी पवार (लातूर)यांनी मिक्स प्रकारात ब्राँझ पदक केले. या खेळाडूंना दिपक चिकणे व सुधीर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



खेळाडू व प्रशिक्षक यांचे संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे उपाध्यक्ष प्रा .हरिदास रणदिवे सचिव प्रमोद चांदूरकर यांनी अभिनंदन केले.

# तालुका क्रीडाधिकारीपदी पदोन्नतीबद्दल तिघांचा सत्कार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
सोलापूर शहर शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक महासंघाच्या वतीने जिल्हा क्रीडा कार्यालयातील गणेश पवार (तुळजापूर, धाराशिव), सुनील धारूरकर (दापोली, रत्नागिरी) व तानाजी मोरे (इंदापूर, पुणे) यांची तालुका क्रीडाधिकारी म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी दिल्ली येथे झालेल्या पहिल्या जागतिक खो-खो स्पर्धेसाठी मीडिया सेलचे प्रमुख निवड झाल्याबद्दल तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी क्रीडाधिकारी नदीम शेख, शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्रा. संतोष खेंडे, सचिव सुहास छंचुरे, उपाध्यक्ष वसीम शेख, सहसचिव श्रीधर गायकवाड, गंगाराम घोडके, प्रबुद्ध चिंचोळीकर, बाबूलाल इंगळगी, धनंजय धेंडे,संतोष पाटील, श्रीधर ताटीपामुल, वरिष्ठ लिपिक शैलेंद्र माने, विश्वास गायकवाड आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### ए. डी. जोशी कॉलेजचे जेईई मेनमध्ये यश

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जेईई मेन -१ परीक्षेत येथील ए. डी. जोशी कनिष्ठ महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले असून, क्षीरसागर योगेश याने ९९.५२ पर्सेंटाइल मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्षए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी, प्राचार्य प्रविण देशपांडे सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन केले. यश संपादित केलेले विद्यार्थी कंसात टक्केवारी : क्षीरसागर योगेश (९९.५२), यादव आदित्य (९०.८८), उजलुम्वले चान्द्साहाब ९८.२६), पाटील पुष्कराज (८९.९२), बागलकोट हर्षवर्धन (९६.०८), मेंगजी रितेश (८९.२०), कुलकर्णी नयन (९६), व्हटकर संस्कृती (८९.२०), चव्हाण सार्थकराजे (९५.२५), फुलारी श्रेया (८८.५४), देशपांडे नुपूर (९४.५६), बाविकर सार्थक (८८.०९), स्वामी केदार (९३.६४), गोलेकर प्रथमेश (८५), इंगळे हर्षाली (९२.२८), चव्हाण महेश (९१.१०).



### काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांच्यातर्फे डीडीसी बँकेच्या अधिकाऱ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सीनियर बँक इन्स्पेक्टर बाबूराव बोरुटे हे प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्याबद्दल तसेच गोकुळ वाघमारे यांच्या सीनियर बँक इन्स्पेक्टरपदी निवड झाल्याबद्दल आणि शिवानंद नडगिरे यांची वसुली अधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेस उपाध्यक्ष मोतीलाल राठोड, माळकवठेचे माजी सरपंच शिवलिंग बगले, गुंजेगावचे माजी सरपंच संतोष पवार, होटगी स्टेशनचे सरपंच सुभाष पाटोळे, युवा उद्योजक सुदर्शन हसापुरे, संजवाड सोसायटीचे चेअरमन उदय पाटील, बँक इन्स्पेक्टर रावसाहेब देशमुख, बनसिध्द बन्ने, सोमनाथ करजोळे, विठ्ठल जोडमोटे, श्रीकांत बनशेट्टी, सुधाकर जोकारे, गंगाराम गवसने आदी उपस्थित होते.



### यमाईदेवी आश्रमशाळेत संत रोहिदास महाराज जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर या आश्रम शाळेत संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज यांची साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा लांबतुरे यांच्या हस्ते संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे- गवळी, संगीता व्हनकोळे-जाधव, विद्या हराळे - लांबतुरे, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, अशोक देशमुख, अमोल गुरव, बसवराज तुळजापुरे, संदीप चव्हाण उपस्थित होते. याप्रसंगी इ. सहावी मधील विदयार्थी रत्नदीप कांबळे याने संत रोहीदास महाराज यांची वेशभूषा करुन सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. शाळेच्या परिसरातून लेझीम आणि ढोल ताशाच्या गजरामध्ये संत रोहिदास महाराज यांची मिरवणूक काढण्यात आली. सूत्रसंचालन नानासाहेब लोखंडे यांनी केले तर आभार तानाजी तानगावडे यांनी मानले.

### ग्रंथालयाच्या प्रलंबित मागणी संदर्भात मंत्रालयात बैठक

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी राज्यातील ग्रंथालयांच्या प्रलंबित मागणी संदर्भात बैठक आयोजित करावी यासाठी आ. सुधीर गाडगीळ, आ. सत्यजित तांबे व आ.अभिमन्यू पवार यांना महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले होते.त्यानुसार उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांनी मंत्रालयात बैठक



आयोजित केली होती. या बैठकीस आ. अभिमन्यू पवार महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, माजी सहाय्यक ग्रंथालय संचालक श्याम दाइंगडे, बालाजी कांगणे, सिद्राम मुद्देबिहाळ, निलेश क्षिरसागर, प्र.गंथालय संचालक अशोक गाडेकर,महेश सोनजे, प्रताप सुर्यवंशी,संजय ढेरे,राम मोतीपिवळे आदी उपस्थित होते. या बैठकीत राज्यातील ११,१५० ग्रंथालयाच्या अनुदान ४० टक्के वाढ, दर्जा बदल व नवीन २००० ग्रंथालय मान्यता देणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बैठकीत सांगितले. तसेच या चळवळीत फुकटचे श्रेय लाटणारे भरपूर जण असल्याची माहिती सदाशिव बेडगे यांनी दिली.

# बाजारपेठेत नवान्न पौर्णिमेचा उत्साह

## ज्वारीच्या धाटांची झाली खरेदी-विक्री

## अनेकांनी घरात केली यथासांग पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

सनातन वैदिक हिंदू धर्मातील महत्त्वाची पौर्णिमा म्हणून नवान्न पौर्णिमेकडे पाहिले जाते. या पौर्णिमे दिवशी शेतकरी आपल्या शेतातून पिकलेल्या ज्वारीच्या पिकांची पूजा करतो. त्यानिमित्त शहरातील मुख्य बाजारपेठ असणाऱ्या मधला मारुती येथे ज्वारीचे धाटे आणि गव्हाचे लोंब्या विकण्यासाठी उपलब्ध झाल्या होत्या. अनेकांनी या पौर्णिमेनिमित्त ज्वारीच्या धाट्यांची व गव्हाच्या लोंब्यांची खरेदी केल्याचे चित्र दिसून आले.

दरम्यान, नवान्न पौर्णिमा पिकाच्या येण्यापूर्वी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. शेतकरी जेव्हा आपल्या पिकाची रास करतो. त्या अगोदर या पौर्णिमे दिवशी ज्वारी व गव्हाच्या पिकांचे पूजन केले जाते. शेतकरी आपल्या शेतातील उगवून आलेले ज्वारीचे धाटे आणि गव्हाच्या लोंब्या घरी घेऊन येतात. घरी आणल्यानंतर सदरचे ज्वारीचे धाटे व गव्हाच्या लोंब्या या आपल्या घरातील मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या उंबऱ्यावर ठेऊन पिकाचे व उंबराचे एकत्रित यथा सांग पूजन केले जाते. त्याच अनुषंगाने आज बाजारपेठेत असंख्य ग्राहकांनी ज्वारीचे धाटे व गव्हाचे लोंबे खरेदी केल्याचे दिसून आले.



### घरात पिकांचे पूजन

पन्नास रुपयांना चार नगांची पेंडी याप्रमाणे ज्वारीचे धाटे व गव्हाच्या लोंब्यांची ग्राहकांनी खरेदी केली. ज्याप्रमाणे नवीन लग्न झालेल्या नंतर गोंधळ घालण्यासाठी ज्वारीचे धाटे पूजनासाठी वापरले जातात, त्याचप्रमाणे या नवान्न पौर्णिमेदिवशी घरात पिकांचे पूजन करण्यासाठी देखील ज्वारीच्या घाटांची खरेदी केली.

**- अविनाश पाटील, ग्राहक**

### पूजेनंतर पिकांची रास

नवान्न पोर्णिमा ही खेडेगावात एखाद्या सणासारखी केली साजरी केली जाते. या दिवशी आपल्या शेतात आलेले नवीन ज्वारी व गव्हाचे पीक यांची पूजा केली जाते. त्यासाठी गोडाधोडाचा नैवेद्य, अर्थात पुरणपोळी केली जाते. आपल्या घराच्या मुख्य उंबऱ्यावर ज्वारीचे धाटे व गव्हाचे लोंब्या ठेवल्या जातात. त्यावर हळदी-कुंकू वाहून नैवेद्य दाखवला जातो. अशी परंपरा आजतागायत सुरू आहे. ही पूजा केल्याशिवाय पिकांची रास करता येत नाही.

**- महेश वेदपाठक, शेतकरी कासेगाव द.सोलापूर.**

### पौर्णिमेला महत्त्व

तळे हिप्परगा येथून ज्वारीचे धाटे व गव्हाचे लोंबे विकण्यासाठी बाजारपेठेत दाखल झालो आहोत. दरवर्षी नवान्न पौर्णिमेला याची खरेदी विक्री केली जाते. हिंदू धर्मामध्ये या पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. जेव्हा नवे पीक आपल्या शेतात येते तेव्हा त्यांचे पूजन करून रास केली जाते. पन्नास रुपये पेंडी याप्रमाणे विक्री केली जात आहे.

**- आशाबाई भोसले, विक्रेते**



# एमआयडीसी, जलशुद्धीकरण केंद्राचे प्रश्न सोडविणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आ. देवेंद्र कोठे यांना ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

अक्कलकोट रोड व होटगी रोड औद्योगिक वसाहतीमधील विविध सोयीसुविधांचा प्रश्न तसेच पाकणी येथील महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागेचा प्रश्न सोडवण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार देवेंद्र कोठे यांना मंगळवारी दिली. आमदार देवेंद्र कोठे यांनी मंगळवारी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी आमदार देवेंद्र दादा कोठे यांनी सोलापूर शहर विकासाच्या दृष्टीने विविध मुद्द्यांवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने अक्कलकोट रोड व होटगी रोड औद्योगिक वसाहतीमधील दर्जेदार अशा पायाभूत मूलभूत सुविधा पुरवणे, त्याचबरोबर पाकणी येथील जलशुद्धीकरण केंद्रासाठी वनविभागाची जागा मिळण्याचा विषय यांचा प्रामुख्याने समावेश होता. या सर्व विषयांबाबत लक्ष घालून लवकर तोडगा काढावा अशी विनंती आमदार देवेंद्र कोठे यांनी केली. यावर नेहमीप्रमाणेच देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व प्रश्न सोडवण्याची ग्वाही देतानाच सोलापूरच्या विकासासाठी खंबीरपणे पाठीशी उभे राहण्याचे अभिवचन दिले.



# श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात आज गुलाल

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आज गुरुवारी १३ फेब्रुवारी रोजी रात्री १०.४५ वाजता सम्राट चौक येथील श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत गुलालाचा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू यांनी दिली. श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे गुरुगीता पारायण करण्यात येते. शुक्रवार, ७ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारीपर्यंत दररोज झालेल्या गुरुगीता पारायणाची समाप्ती सकाळी ९ वाजता होणार आहे. यानंतर श्री प्रभाकर स्वामी महाराजांच्या पिंडीस रुद्राभिषेक व तर्पण विधी होईल. तसेच रात्री १०.४५ वाजता सम्राट चौक येथील श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत गुलालाचा कार्यक्रम होणार आहे, भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ट्रस्टी उदय वैद्य यांनी केले आहे.



# श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवास प्रारंभ

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

शहरात बालपखवाजवादक वारकऱ्यांनी पखवाज वादनावर भाविकांना ठेका धरायला लावत रसिकांची मने जिंकली.

निमीत्त होते श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांच्या ६८व्या पुण्यतिथीनिमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज मृदंग वादन शिक्षण संस्थेतर्फे श्री सदगुरू प्रभाकर महाराज मंदिरात मंगळवारी झालेल्या सामूहिक पखवाज वादनाचे.जुनी लक्ष्मी चाळ येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मृदंग वादन शिक्षण संस्थेतर्फे पखवाज वादनाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यालयातील ५०पेक्षा जास्त बाल वारकरी विद्यार्थी विद्यार्थिनींनी ह. भ. प. श्री ज्योतीराम महाराज चांगभले यांच्या मार्गदर्शनाखाली पखवाज वादन केले. श्री दत्तात्रय महाराज सरवदे यांनी श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांची भक्ती गीते सादर केली. प्रणिती चांगभले हिने बोलावा विठ्ठल, काया ही पंढरी, मन लागो रे लागो हे अभंग सादर केले व त्यावर विद्यार्थ्यांनी मृदंग वादन केले. याप्रसंगी हभप श्री संजय महाराज पाटील यांनी आपली सेवा दिली. रवी वलपा, उद्धव उपाळकर, चंद्रशेखर ढोले, शरद डोके, नंदा डोके, सुभद्रा थोरात, सीता जाधव, शोभा चांगभले यांनी फुगडी सेवा व वारकरी खेळामध्ये सहभाग घेतला. याप्रसंगी मंदिराचे चीफ ट्रस्ट मोहन बोड्डू, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी वसंतराव बंडगर, वामनराव वाघचौरे, उदय वैद्य, सुभाष बद्दुरकर, रवी गुंड सम्राट राऊत, रमेश देशमुख, रामचंद्र कटकधोंड, मंदिराचे व्यवस्थापक निरंजन दंतकाळे आदी उपस्थित होते.

# सर्वच क्षेत्रात विश्वासार्हता महत्त्वाची : माने



## नरोटेवाडी उपसरपंचपदी महेंद्र खटके यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

२०२३ मध्ये स्मार्ट ग्राम ठरलेल्या नरोटेवाडी गावची विकासात्मक वाटचाल कौतुकास्पद असून दिलेला शब्द पाळून एकत्रित विश्वासाने काम केल्यास गावचा लौकिक वाढतो हे नरोटेवाडी ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी दाखवून एक आदर्श निर्माण केल्याचे माजी आमदार दिलीप माने यांनी सांगितले.

नरोटेवाडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी महेंद्र खटके यांची अविरोध निवड झाली. यावेळी संपर्क कार्यालयात सत्कार करताना ते बोलत होते. यावेळी सरपंच उमेश भगत,रामेश्वर उंबरे,भीमाशंकर उंबरे, बबन पाटील,सुशांत खटके,प्रदीप पाटील,शाहू खटके, बबन पाटील, योगेश नरोटे, राजू उंबरे, वामन खटके, चंद्रकांत कोळेकर उपस्थित होते.

आज प्रत्येक क्षेत्रात विश्वासाहर्ता महत्त्वाची आहे राजकारणात विश्वास जपणे अवघड असते. तरीही नरोटेवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत ठरल्याप्रमाणे शब्द पाळून उपसरपंच पदावर संधी देत आहेत. सरपंच उमेश भगत यांनी दोन-अडीच वर्षात गावात केलेले काम प्रशंसनीय असून एकीचे बळ हे विकासाला बळ देते. शासनाच्या गावासाठी अमाप योजना आहेत. त्यासाठी प्रयत्न करून गावचा लौकिक वाढवा, असे श्री. माने यांनी यावेळी सांगितले.

### एकरुख मच्छ संस्थेच्या चेअरमनपदी जहागीरदार

एकरुख येथील मच्छ व्यवसायिक सह. संस्थेच्या चेअरमनपदी मुजफ्फर जहागीरदार यांची अविरोध निवड झाली. या संस्थेच्या अत्यंत प्रतिष्ठित निवडणुकीत माने गटाचे सर्व १२ संचालक मोठ्या मताने विजयी झाले होते.

# सोलापूरकरांनी ऑनलाईन खरेदीपेक्षा प्रत्यक्ष खरेदीला महत्त्व द्यावे

## महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांचे प्रतिपादन

## इलेक्ट्रोचे थाटात उद्घाटन, यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

सध्या ऑनलाईन खरेदीचा टक्का वाढत आहे सोलापूरच्या ग्राहकांनी ऑनलाईन खरेदी कडे लक्ष न देता सध्या होम मैदानावर सुरू असलेल्या इलेक्ट्रो प्रदर्शनामधून आपल्या गरजेच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी करून सोलापूर मधला पैसा सोलापुरातच फिरता ठेवावा असे महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली उगले यांनी व्यक्त केले.

सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशनद्वारा इलेक्ट्रोनिक्स, कॉम्प्युटर्स, टेलिकम्युनिकेशन, होम ॲप्लायन्सेस, सोलार व फिटनेस इक्विपमेंटस वस्तूंचे भव्यप्रदर्शन ''इलेक्ट्रो २०२५'' प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी शार्प बिझनेस सिस्टमस् इंडिया लिचे बिझनेस हेड वसंत जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलित करून आणि फीत कापून उद्घाटन करण्यात आले. दि.१२ ते १८ फेब्रुवारी या कालावधी दरम्यान होम मैदानावर हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यंदा इलेक्ट्रो प्रदर्शनाचे शार्प हे मुख्य प्रायोजक असून हायफा इलेक्ट्रीकल्स व एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी हे सह प्रायोजक आहेत.




तद्नंतर इलेक्ट्रो चेअरमन दिपक मुनोत यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की यंदा प्रथमच ५ वेगळे जर्मन हँगर प्रकारच्या डोम मध्ये हे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. क्युआर कोडद्वारे सर्व सहभागी स्टॉलची माहिती ग्राहकांना आपल्या मोबाईलवर पाहण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली असल्याची माहिती दिली. काही स्टॉल्स् सामाजिक संघटनांना विनामुल्य देण्यात आलेली आहेत.या प्रदर्शनात खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे आकर्षक बक्षिसे व शेवटच्या दिवशी ७ दिवसांत खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी बंपर ड्रॉमध्ये आकर्षक बक्षिस असल्याची घोषणा करण्यात आली. तत्पूर्वी इलेक्ट्रो २०२५ या नव्या मार्गदर्शन पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतलेले आयोजक प्रदर्शक आणि प्रायोजकांचे कृतज्ञता व्यक्त करून सर्वांना शुभेच्छा दिल्या. शार्प कंपनीचे बिझनेस हेड वंसत जोशी यांनी आपल्या भाषणात अश्या प्रकारचे एखाद्या व्यवसाईक संघटनेच्या अधिपत्याखाली होणारे हे प्रदर्शन संयोजकांचे प्रशंसा करावी तेवढी कमी आहे असे गौरवोद्गार काढले.तत्पूर्वी, इलेक्ट्रोचे अध्यक्ष आनंद येमुल यांनी आपले प्रास्ताविकेत म्हणाले की, इलेक्ट्रो २०२५ चे हे २५ वे वर्ष असून २४ वर्षापूर्वी २० स्टॉल्सने सुरु झालेले हे प्रदर्शन आज जवळपास ३०० स्टॉलचे प्रदर्शन झाले असल्याचे सांगितले. आतापर्यंत इलेक्ट्रोने केलेल्या कामाची व ग्राहकांची दिलेल्या प्रतिसादाची ही पावतीच आहे असे येमुल यांनी सांगितले. त्याच प्रमाणे संघटनेच्या पदाधिकारी यांच्या अथक परिश्रमाने हे भव्यदिव्य प्रदर्शन यशस्वी होत असल्याचे सांगितले. या वर्षी जवळपास एक लाख पेक्षा जास्त ग्राहक प्रदर्शनास भेट देतील असा अंदाज व्यक्त केला. या प्रदर्शनामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग असून इलेक्ट्रॉनिक्स, होम अप्लायन्सेस, कॉम्पुटर्स, टेली कम्युनिकशेन्स ,हेल्थ इक्वीपमेंट, सोलर प्रॉडक्ट्स इत्यादी या प्रदर्शनामध्ये उपलब्ध करण्यात आली आहेत. अशा या प्रदर्शनामध्ये ठिकठिकाणी शुध्द पिण्याचे पाणीची सोय केलेली आहे. सर्व स्टॉल मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कंपनी कडून ट्रेनिंग देवून ग्राहकांना माहिती देण्यात येते. रक्तदान प्रसार करण्याकरीता दररोज रक्तदान शिबीराचेही आयोजन करण्यात आले असून अवयव दान विषयी जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती सचिव भुषण भुतडा यांनी दिली. या कार्यक्रमास सह सचिव हरीष कुकरेजा, खजिनदार सुयोग कालाणी, संस्थेचे माजी अध्यक्ष सतिश मालू, केतन शाह, आनंदराज दोशी, दिलीप राऊत, समिर गांधी, विपीन कुलकर्णी ,जितेंद्र राठी, कौशिक शाह , खुशाल देढीया, ईश्वर मालू सह संचालक सर्वश्री संदेश कोठारी, राजेश जाजु, चंद्रकांत शाहपुरे, रवि पाचलग, बसवराज नवले, श्री यल्लपा भोसले, गणेश सुत्रावे सह सदस्य विजय टेके , पवन मुंदडा, सचिन करवा, दत्तात्र्य अंबुरे, जॉय छाबरिया ग्राहक आदी उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अरण्यऋषी श्री मारुती चित्तमपल्ली यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

अरण्यऋषी श्री मारुती चितमपल्ली यांना भारत सरकारच्या वतीने पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा सोलापूर यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच श्री चितमपल्ली हे नवीन ग्रंथालय निर्माण करीत आहेत त्या ग्रंथालयासाठी मसाप मधील सर्व लेखकांनी स्वतःची पुस्तके त्यांना भेट दिली. यावेळी उपाध्यक्ष दत्ता सुरवसे, कार्याध्यक्ष किशोर चंडक, कार्यवाह वंदना कुलकर्णी, ज्येष्ठ सदस्य जे. जे. कुलकर्णी, गोविंद काळे, डॉ. अर्जुन व्हटकर, डॉ. शिवाजी शिंदे आणि प्रा.भीमगोडा पाटील उपस्थित होते.





## क्राईम वृत्त...




### अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून त्रास देणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापर, दि. १२ फेब्रुवारी -**

शाळकरी अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून त्रास देणाऱ्या तरूणाविरुध्द पोक्सोअंतर्गत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पिडीत अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीवरुन महेश परमेश्वर अवताडे (रा. कुमठेगाव, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता ही ११ फेब्रुवारी रोजी सकाळी शाळेत जात होती. त्यावेळी महेश अवताडे हा दुचाकीवरून तिच्यासमोर आला व त्याने गाडी आडवी लावून तिला बोलण्याचा प्रयत्न करून त्रास देऊ लागला. त्यामुळे याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात बालकांचे अपराधापासून संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक तरंगे पुढील तपास करीत आहेत.

### निष्काळजीपणे बल्कर चालवून अपघात केल्याप्रकरणी गुन्हा

**सोलापर, दि. १२ फेब्रुवारी -**

निष्काळजीपणे बल्कर चालवून अपघात केल्याप्रकरणी चालकाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस शिपाई राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन के ए ३२ एए ४६४४ क्रमांकाच्या बल्करच्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ फेब्रुवारी रोजी अक्कलकोट रोडवरील चव्हाण शोरूमसमोर के ए ३२ एए ४६४४ क्रमांकाच्या बल्करच्या चालकाने बल्कर निष्काळजीपणे चालवून अपघात केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.

### गड्डा यात्रेत महिलेचे लाखाचे मंगळसूत्र लंपास

**सोलापर, दि. १२ फेब्रुवारी -**

होम मैदान येथे भरलेल्या गड्डा यात्रेत २६ जानेवारी रोजी गर्दीचा फायदा घेत चोरट्याने महिलेच्या गळ्यातील ९३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले. याबाबत सरीता प्रविण पवार (वय ४०, रा. रोहिणी नगर भाग १, सैफुल, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ जानेवारी रोजी रात्री सरीता पवा या गड्ड्यावर मोठ्या गोल पाळण्यात बसण्यासाठी तिकीट काऊंटरवर गेल्या असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीमध्ये गर्दीचा फायदा घेऊन पवार यांच्या गळ्यातील ९३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

### कोयता घेऊन दहशत माजविणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापर, दि. १२ फेब्रुवारी -**

शहरातील होटगी रोडवरील सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पीटलमध्ये कोयता घेऊन जाऊन कर्मचाऱ्यांच्या गळ्याला कोयता लावून दहशत पसरवून संगणकाचे नुकसान करणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत सुषमा धिरज मोरे (वय ३२, रा. गिता नगर, गेंट्याल चौक, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन धनराज सिद्राम संदोळकर (रा. उपलप वस्ती, रामवाडी रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनराज संदोळकर याची पत्नी श्रुती संदोळकर यांचे सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पीटलमधील ब्रदर जीवन साळुंखे याच्यासोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय धनराज संदोळकर यास आहे. या संशयातूनच ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी धनराज संदोळकर हा कोयता हातात घेऊन सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पीटलमध्ये घुसला. ब्रदर जीवन कोठे आहे असे विचारून शिवीगाळ करून हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून येऊन कोयता उगारून शिवीगाळ करू लागला. तसेच हॉस्पीटलमधील कॅशीयर हणमंत पाटील व फार्मासिस्ट ब्याकोंडा यांच्या गळ्याला कोयता लावून जीवन ब्रदर कोठे आहे असे विचारून दहशत पसरविली, तसेच काऊंटरवर असलेल्या कॉप्युटर कोयत्याने मारून तोडला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक तरंगे पुढील तपास करीत आहेत.

# सिध्देश्वर यात्रा संपली तरी कचरा तसाच





## पंचकट्टा येथे साचले प्लास्टिकच्या कचऱ्याचे ढीग

## महापालिका प्रशासन मात्र ढीम्म

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांची यात्रा संपल्यानंतर शहरातील स्मार्ट रस्त्यांवर जागोजागी कचऱ्याचे ढीग तसेच पडलेले दिसत आहेत. ''गड्डा संपला मात्र कचरा तसाच पडला''! एरवी स्वच्छतेचे महत्व पटवून सांगणाऱ्या महापालिका प्रशासनाला मात्र याकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत असल्याचे यावरून दिसते.

ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा जानेवारी महिन्यात भरते. संपूर्ण महिनाभर होम मैदान व पंचकट्टा परिसरात विविध प्रकारचे स्टॉल्स उभारले जातात. एक महिन्याच्या मुदतीनंतर होम मैदान येथील विविध पाळणे काढण्यात आले. त्यानंतर मात्र पंचकट्टा परिसरात थाटण्यात आलेले स्टॉल्स काही कालावधीनंतर काढण्यात आले. मात्र स्टॉल्स काढल्यानंतर स्टॉल्स खाली साचलेला प्लास्टिकचा कचरा आहे तसाच पडलेला दिसत आहे. सिद्धेश्वर मंदिरा लगत असणाऱ्या या रस्त्यांवर कचऱ्यांचे ढीगच ढीग दिसत आहेत. एरवी स्वच्छतेचे महत्व सांगणाऱ्या महापालिका प्रशासनाला सदरचा प्लास्टिकचा कचरा काढण्यास पुरेसा वेळ मिळत नसल्याचे दिसत आहे.

एकीकडे प्लास्टिक बंदी विरोधात महापालिका प्रशासन विविध विक्रेत्यांवर दुकानदारांवर कारवाई करत आहे. मात्र येथे मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा ढिगाराचं पडलेला पहावयास मिळत असल्याने ''लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण '' ही म्हण येथे तंतोतंत लागू होत आहे. गड्डा संपला तरी कचरा तसाच पडलेला आहे. असे नागरिकांच्या तोंडून ऐकण्यास मिळत आहे. दरवर्षी हेच चित्र होम मैदान परिसर व पंचकट्टा परिसरात दिसून येते. यावर महापालिका प्रशासनाने तात्काळ काम करून सदरचा रस्ता स्वच्छ केला पाहिजे अशी मागणी आता जोर धरू लागलेली आहे.

### शाळकरी मुलांचे आरोग्य धोक्यात

पंचकट्टा परिसरात थाटण्यात आलेले स्टॉल्स अखेर काढण्यात आले आहे. परंतु येथे प्लास्टिक तसेच ईतर कचरा साचलेला आहे. या कचऱ्यात काहीतरी मिळेल, या आशेने शेजारीच असलेल्या महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी कचरा धुंडाळत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र यामुळे शाळकरी मुलांचे आरोग्य धोक्यात येत आहे. याकडे महापालिका व संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होताना दिसत आहे.

### गड्डा यात्रेतील विक्रेत्यांवर कारवाई करण्याची होती गरज

एकीकडे प्लास्टिक बंदी करायची दुसरीकडे गड्डा यात्रेत वापरण्यात आलेल्या प्लास्टिक बाबत कोणतीच कारवाई करायची नाही. हा दुजाभाव आहे. गड्डायात्रेत प्लास्टिक वापरणाऱ्या विक्रेत्यांवर व व्यापाऱ्यांवर देखील कारवाई होणे गरजेचे होते. परंतु तसे होताना दिसले नाही. आता स्मार्ट रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग दिसत आहेत. याकडे महापालिका प्रशासन डोळे झाक करत आहे.

**- योगेश कुंदूर, सामाजिक कार्यकर्ता शहीद अशोक कामटे विचार मंच.**

### महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे

महापालिका प्रशासनाने केवळ उत्पन्न लक्षात न घेता, सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य यांकडे देखील लक्ष द्यावे. गड्डा यात्रेत नेहमीच अस्वच्छता आणि धुळीमुळे विविध आजार उद्भवतात. गड्डा संपला तरीही सर्वत्र कचरा पसरलेला दिसत आहे. प्लास्टिक बंदी असताना देखील प्लास्टिक वापरले जातात. यावर कडक कारवाईची अंमलबजावणी व्हावी.

**- सुनील पवार, जेष्ठ नागरिक**

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांबाबत आक्षेपार्ह पोस्ट

## सोलापूर जिल्ह्यातील दोन आरोपींना अटक





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रूपाली चाकणकर यांच्याविरोधात समाज माध्यमातून आक्षेपार्ह, अश्लील आणि अपमानास्पद पोस्ट केल्याप्रकरणी सोलापूर जिल्ह्यातील दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

अटक आरोपी आकाश दिगंबर डाळवे (वय ३०, रा. यावळे, ता. मोहोळ, जि. सोलापूर) याला मोहोळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेण्यात आले आहे तर अविनाश बापू पुकळे (वय ३०, रा. पारे कोकरेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर) याला उरळी कांचन, जि. पुणे येथून अटक करण्यात आली. आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती चाकणकर यांच्या विरोधात फेसबुकवरील ''राजकारण महाराष्ट्राचे'' या पेजवरून जाणीवपूर्वक आक्षेपार्ह पोस्ट वारंवार करण्यात येत होत्या. या प्रकरणी आयोगाकडून पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती.

पोलिसांकडून भारतीय दंड संहिता कलम ७८, ७९, ३५१(३), ३५१(४), ६१(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या ६७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोघांना गिरगाव येथील १८ व्या मेट्रोपॉलिटन कोर्टात हजर करण्यात येणार आहे. या पूर्वी या प्रकरणात एकूण ९ आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून, अधिक तपास सुरू आहे.

### भारत पेट्रोलियमतर्फे उद्यापासून जनजागृती पंधरवडा

**सोलापर :** भारत पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालय यांच्या अंतर्गत भारत पेट्रोलियमसह विविध तेल वितरण कंपन्यांच्या वतीने दि. १४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान हरित आणि स्वच्छ ऊर्जाच्या माध्यमातून जनजागृती पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सौरभ शर्मा यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि. १४ फेब्रुवारी रोजी या पंधरवड्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या निमित्ताने शाळा-महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा, महाविद्यालयात भीतीचित्र, चित्रकला स्पर्धा, लेखाच्याद्वारे जनजागृती, टॉक शो आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. संरक्षण सक्षम महोत्सव अंतर्गत हे उपक्रम घेण्यात येत आहेत. यावेळी शाश्वत शर्मा, मनीष कुमार उपस्थित होते.

# श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे विविध कार्यक्रम

## सोलापुरात मंगळवारी श्री शिवजन्मोत्सवाचा पाळणा सोहळा

## कुस्तीसह विविध स्पर्धांचे उद्यापासून आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त दिनांक १४ ते १९ फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री जन्मोत्सव पाळणा सोहळा होणार असल्याची माहिती ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे आणि उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता शिंदे चौक येथील डाळिंबी आड मैदान येथे श्रींची प्रतिष्ठापना मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. याच दिवशी येथे आरोग्य शिबिर होणार आहे. शनिवार दि. १५ फेब्रुवारी रोजी महिला बांधकाम कामगारांसाठी नोंदणी नूतनीकरण शिबिर आयोजित केले आहे. दरम्यान, रिल्स व छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १० ते १९ फेब्रुवारी या कालावधीत हे रील्स आणि छायाचित्र काढलेले असावेत. या स्पर्धेत नाव नोंदणी दि. १२ ते १७ फेब्रुवारी दरम्यान राहुल मुद्दे ७२ ६१ ९२ ८२ ८१ आणि सिद्धाराम भैरोपाटील ९५ ७९ ०१७५१७ या क्रमांकावर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत कुस्ती स्पर्धा होणार आहे. या पत्रकार परिषदेस पुरुषोत्तम बरडे , राजन जाधव, श्रीकांत डांगे, अरुण रोडगे, पंकज काटकर, बसवराज कोळी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



**असा होणार श्री शिवजन्मोत्सवाचा पाळणा सोहळा**

सालाबाद प्रमाणे मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने श्री शिवजन्मोत्सव पाळणा कार्यक्रम होणार आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील शहीद माता, शहीद पत्नी, शहिदांच्या कन्या यांना खास आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या हस्ते हा पाळणा सोहळा होणार आहे. यावेळी हजारो महिला सामूहिकरीत्या पाळणा गायन करणार आहेत. वाहनांसाठी विविध ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

**बुधवारी डाळिंबी आड येथून मिरवणुकीस होणार प्रारंभ**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठीत मूर्तीची पूजा करून डाळिंबी आड मैदान येथून मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. पारंपारिक मार्गाने म्हणजेच सरस्वती बुक डेपो, नवी पेठ, मेकॅनिक चौक, भागवत थिएटर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा गांधी रोड, बाळीवेस, मधला मारुती, माणिक चौक, दत्त चौक, राजवाडे चौक, चौपाड विठ्ठल मंदिर मार्गे निघून डाळिंबी आड मैदान येथे ही मिरवणूक विसर्जित होणार आहे. मध्यवर्ती महामंडळाची शिवमुर्ती मेकॅनिक चौकात येऊन थांबल्यानंतर विविध सार्वजनिक मंडळे या मिरवणुकीत सहभागी होतील. या मिरवणुकीमध्ये शहरातील वारकरी संघटनेचे भजनी मंडळ, लेझीम झांज ,ढोल पथक, छत्रपतींच्या जीवनावरील देखावे , लेझर शो सादर करण्यात येणार आहेत, असेही यावेळी ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे यांनी सांगितले.




# मार्कंडेय रुग्णालयासमोरील रस्त्यावरील अतिक्रमण काढले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने कारवाई सुरू आहे. आज पथकाकडून मार्कंडेय रुग्णालयासमोरील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. अनधिकृत असलेली चहा कॅन्टीन व पान टपरी हटविण्यात आली. यावेळी दोन लोखंडी खोके व इतर साहित्य जप्त करण्यात आले. महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

# गगनाला भिडलेले लसणाचे दर आवाक्यात !

## तब्बल चारशे रुपये प्रति किलो असणारे दर आले शंभरावर

## वाढत्या महागाईने होरपळणारे ग्राहक सुखावले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

गृहिणींच्या डोळ्यात पाणी आणणाऱ्या व गगनाला भिडलेले लसणाचे दर सद्या जमिनीवर आलेले दिसत आहेत. प्रति चारशे रुपये किलो याप्रमाणे विक्री केला जाणारा लसूण आता शंभर रुपये प्रति किलो दराने विक्री होत असल्याने गृहिणींमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

रोजच्या स्वयंपाकात कांदा लसूण यांची नितांत आवश्यकता असते. कांद्याचे दर कमी जास्त होतात परंतु लसणाचे दर हे सदैव गगनाला भिडलेलेच असतात. देशी आणि हायब्रीड अशा दोन प्रकारात असलेले लसूण नेहमीच भाव खात असतात. परंतु गेल्या काही दिवसांपासून लसणाचे भाव गडगडले आहेत. तब्बल चारशे रुपये प्रति किलो प्रमाणे विक्री केल्या जाणारा लसूण सध्या शंभरावर आला आहे. सोलापूर बाजार समिती तसेच किरकोळ बाजारपेठेमध्ये लसणाचे आवक मोठ्या प्रमाणात आहे. आवक वाढल्याने लसणाचे दर घटले आहेत. देशी प्रकारातील लसूण सध्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात विक्री केला जात आहे. शहराच्या प्रमुख रस्त्यांवर हातगाडी तसेच पिक-अप वाहनामध्ये लसणांचे ढिगारे विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे दिसत आहे. शंभर रुपये प्रति किलो याप्रमाणे लसूण विकला जात असल्याने गृहिणींसह इतर ग्राहकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसत आहे. आवक वाढल्याने दर घटलेले आहेत. सध्या बाजारपेठेत महाराष्ट्रसह इतर राज्यातून लसणाची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे दरामध्ये कमालीची घट झालेली दिसत आहे.



### लसूण खरेदीसाठी ग्राहकांची रेलचेल

लसणाचे दर यापूर्वी मोठ्या प्रमाणात वाढलेले होते. आता सध्या दर आवाक्यात आले आहेत. त्यामुळे ग्राहकांची लसूण खरेदीसाठी रेलचेल वाढल्याचे दिसून येत आहे. सद्या १०० रुपये प्रति किलो याप्रमाणे लसूण विक्री केला जात आहे.

**- मेहबूब बागवान, लसूण विक्रेते**

### महाराष्ट्रसह कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरातमधून आवक

कर्नाटक आंध्र गुजरात आणि महाराष्ट्र राज्यातून लसणाची मोठ्या प्रमाणात आवक आहे. आवक वाढल्याने दरावर परिणाम झालेला आहे. सध्या लसणाचे दर हे शंभर रुपये प्रति किलो याप्रमाणे विकले जात आहेत. यामुळे ग्राहकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. पूर्वीपेक्षा ग्राहक लसणाची मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत.

**- मोहसीन नदाफ, लसूण व्यापारी.**

### दर कमी झाल्याने आनंद

लसणाचे दर यापूर्वी जास्त होते. आता हे दर कमी झाले आहेत. यामुळे महागाईने त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी एक अर्धा किलो नसून घेणारा ग्राहक आता दोन किलो लसूण खरेदी करत आहे.

**- आनंद भोसले, ग्राहक**

ट्रस्ट रजि. नं. : ए ३८० दि. २४/०९/१९७०
श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर, सार्वजनिक ट्रस्ट
बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर
६८ वी पुण्यतिथी महोत्सव



गुलाल सोहळा
मित्ती माघ वद्य प्रतिपदा
गुरूवार दि. १३/०२/२०२५ रोजी
रात्रौ १०.४५ वा.

लाडू प्रसाद वाटप
शुक्रवार दि. १४/०२/२०२५ रोजी
दु. १२ ते ३ पर्यंत
लाडू प्रसाद वाटप हस्ते
मा. श्री. विजय कबाडे
पोलीस उपायुक्त परिमंडळ, सोलापूर

पालखी पूजा व रथ मिरवणूक
शनिवार दि. १५/०२/२०२५
स. ११ ते रात्रौ ९ पर्यंत
पालखी पुजा व रथ मिरवणुक हस्ते
मा. श्री. एम. राज कुमार
पोलीस आयुक्त, सोलापूर

सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.
श्री मोहन रा. बोड्डू
चिफ ट्रस्टी
श्री. बाळकृष्ण लि. शिंगाडे
मॅनेजिंग ट्रस्टी
श्री. उदय अ. वैद्य
ट्रस्टी
श्री. वसंत शे. बंडगर
ट्रस्टी
श्री. वामन रा. वाघचौरे
ट्रस्टी

टिप : श्री गुरूमहाराज परिवार YouTube चॅनलवर गुलालाचे व सर्व धार्मिक विधींचे थेटप्रक्षेपण होणार आहे. Google लेन्स वर जाऊन वरील QR कोड स्कॅन करा आणि लिंक ओपन करा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०२८

**मऱ्हाटियेचिया नगरीं । ब्रम्ह विद्येचा सुकाळु करीं ।**
**घेणें देणें सुखचिवरी । हो देईं या जगा ।।**

श्रीमद्भगवदगीतेचे मराठीत समाजाभिमुख भाषांतर करण्याचे अतिकठिण काम आपण केवळ सद्गुरु कृपेमुळे करीत असल्याचे माऊली अनेकवेळा सांगतात. आपल्या सद्गुरुंची अपार कृपा असल्यामुळे, आपल्या सद्गुरुंबद्दल कितीही वर्णन केले तरी ते पुरेसे होणार नाही असेही माऊली म्हणतात. आपले सद्गुरु म्हणजे थोरले बंधू श्री निवृत्तीनाथ हे शुध्द असून, स्वत: सिध्द, विख्यात, उदार म्हणून प्रसिध्द आहेत. त्याच प्रमाणे ते अखंडपणे आनंदात वास्तव्य करणारे आहेत. म्हणून आपण आपल्या सद्गुरु, कृपादृष्टी माऊलींचा सतत जयजयकार करतो असे माऊली म्हणतात. आपले सद्गुरु म्हणजे, विषयरुपी सर्पाने पछाडलेले किंवा विषयरुपी सर्पाने विळखा घातला किंवा दंश केला असता मूर्छा न येऊ देता त्यातून आपणाला सावरणारे आहेत. अष्टांगयोगाचे सुख सोहळे भोगण्याचे सामर्थ्य आपली सद्गुरु कृपा देते. आपल्या भक्ताला जीवन कलेचे, अमृतकलेचे स्तनपान देण्याचे तसेच अनाहतध्वनीचे अंगाई गीत गाऊन समाधी स्थितीचा उपदेश करुन भक्ताची योग्य ती समजूत काढून भक्ताला



स्वरुपी निजविण्याचे सामर्थ्य आपली सद्गुरु माऊली ठेवते. साधकाला बोधाने ब्रम्हसाक्षात्कार व योगाने समाधी प्राप्त करुन देणारी ही आईच आहे. सद्गुरुंच्या चरण वसुधेवर सर्व विद्या रसपूर्ण वक्तृत्व आणि रसात्मक काव्य पिकते, ते सर्व भक्तांच्या उपयोगाला येते. माझ्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या या सद्गुरु माऊलींनी आपणाला प्रचंड सामर्थ्य, आशिर्वाद दिले आहेत. तरीपण आपणाला या पुढचा गीतेचा भाग निरुपण करण्यात सद्गुरुंनी अनुमती द्यावी असे माऊली म्हणत आहेत. आपण आपल्या मायबोलीत गीताग्रंथाचे निरुपण करीत असल्याने सद्गुरुंनी आपणाला काय अशिर्वाद द्यावा याची सद्गुरुकडे मागणी करतांना माऊली म्हणतात,

**मऱ्हाटियेचिया नगरीं । ब्रम्ह विद्येचा सुकाळु करीं ।**
**घेणें देणें सुखचिवरी । हो देईं या जगा ।।**

अर्थात, या मराठीच्या नगरीमध्ये अध्यात्मविद्येची, आत्मज्ञानाची समृध्दी आपल्या सद्गुरुंनी निर्माण करावी आणि या जगात केवळ आत्मज्ञानाच्या सुखाविषयीच देवघेव होईल असे पहावे. त्याचबरोबर हे गुरुमाऊली तुझ्या कृपा दृष्टीने किंवा तू आपल्या प्रेमरुपी पदराने जर मला निरंतर पांघरुन घालशील, तर हे सर्व, मी आताच निर्माण करेन असेही माऊली म्हणतात. माऊलींनी सद्गुरु निवृत्तीनाथाकडे स्वत:बद्दल काही मागितले नाही. तुम्हा-आम्हासर्वांसाठी त्यांनी ही मागणी सद्गुरु चरणी नोंदविली आहे. सांसारिक जीव सतत त्यासाठी किंवा त्याच्या मर्यादित कुटूंबासाठी मागत असतो; पण माऊली तुम्हा-आम्हासाठी मागणी करतात. आपल्या सर्वांच्या सुखासाठी ते मागणी करतात. आपल्या बंधूला कसा व किती मान, सन्मान द्यावा हे माऊलींकडून शिकावे. आज अनेक सख्ख्या भावंडातील नको तसे संबंध, वाद पाहिले तर खूप वाईट वाटते. भाऊ असावेत तर माऊलींसारखे. माऊलींच्या आजच्या ओवीतून आपण इतरांसाठी मागणी करायला व भावाबरोबर माऊलींप्रमाणे वागायला शिकू या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# गारमेंट पार्कसाठी खा. शिंदेकडून पाठपुरावा

### चादरींच्या बनावट उत्पादनावर कारवाईची केली मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

सोलापुरात गारमेंट पार्क स्थापन करण्याचा मुद्दा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या संदर्भात खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्ली येथे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंग यांची भेट घेऊन पाठपुरावा केला आहे. सोलापुरात स्वतंत्र गारमेंट पार्क आणि सोलापूर चादरीच्या बनावटी करणाविरोधात कारवाई करण्याबाबतचे पत्र खासदार प्रणिती शिंदे यांनी सिंग यांना दिले आहे.

सोलापूरच्या प्रश्नावर खासदार प्रणिती शिंदे नेहमीच सकारात्मक भूमिका घेताना दिसून येत आहेत. नुकतेच त्यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांची भेट घेऊन सोलापूर टेक्सटाईल पार्कच्या अनुषंगाने चर्चा केली. यावेळी दिलेल्या पत्रात त्यांनी सोलापूर हे एक देशातील महत्त्वाचे वस्त्र उत्पादन केंद्र आहे, विशेषतः टॉवेल, बेडशीट आणि गणवेश निर्मितीत सोलापूर




अग्रेसर आहे. परंतु सोलापूरमधील या वस्त्र उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जागतिक स्तरावर स्पर्धेत टिकण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सुविधांनी सुसज्ज अशा स्वतंत्र गारमेंट पार्कची आवश्यकता असल्याच्या गोष्टीकडे लक्ष वेधले. सोलापुरातील या गारमेंट पार्कमुळे येथील वस्त्रोद्योग व्यावसायिकांना सर्व आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी मिळू शकतील. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास चालना मिळाल्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता वाढवता येईल. परिणामी निर्यात वाढवून सोलापूरच्या वस्त्र उद्योगाला जागतिक बाजारपेठेत अधिक चांगल्या पद्धतीने स्पर्धा करता येईल. या उपक्रमामुळे हजारो स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. त्यामुळे वस्त्रोद्योगाच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकारने या गारमेंट पार्कच्या निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंती खासदार शिंदे यांनी केली आहे.

### सोलापूर चादरीच्या बनावटी विरोधात कारवाई करा

खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर चादर उत्पादनास मारक ठरणाऱ्या बनावट चादरीचा मुद्दा देखील मंत्री गिरिराज सिंग यांच्या पुढे मांडला. सोलापूर चादरीच्या अनधिकृत बनावटीकरणामुळे मूळ विणकरांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. सोलापूर चादर ही भौगोलिक निर्देशांक प्रमाणपत्र प्राप्त असलेली उत्पादने असून, ती स्थानिक विणकरांच्या कौशल्याचे प्रतीक आहे. परंतु सद्या बाजारात बनावट चादरींच्या विक्रीमुळे अस्सल चादर उत्पादक विणकरांना आर्थिक फटका बसत असल्याच्या गोष्टीकडे खासदार शिंदे यांनी लक्ष वेधले. यावर केंद्रीय मंत्री सिंग यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती खासदार शिंदे यांनी दिली.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोरसंघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (५०)

### ध्वजप्रणाम

स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा आहे. ध्वजाच्या मध्ये असलेले चक्र सतत कार्यरत रहा; अशा अर्थाने २४ आरींचे बनलेले आहे. हा तिरंगा ध्वज भारत मातेचे हृदयच आहे. आपण सर्वजण या राष्ट्रध्वजाला सन्मानपूर्वक प्रणाम करतो.

रंग केशरी त्यागाचा हा।
शुभ्र धवल हा शांतीचा।
हिरवा रंग मैत्रीचा हा।
तिरंगी ध्वज या देशाचा ।।
।। भारत माता की जय ।।
।। वंदे मातरम ।।

भगवा ध्वज भारत मातेच्या हृदयाचे संरक्षण करणारा आहे. तो राष्ट्रगुरु आहे. ज्याची गाथा आलोकित करते आपुला इतिहास । ज्याच्या उज्वलतेहून उज्वल फक्त उंच आकाश । जो शिकवि त्याग समर्पण बलिदान आम्हास । करू नमस्कार या स्फूर्तीदायी भगव्या ध्वजास ।। ।। राष्ट्रगुरु भगव्या ध्वजाचा विजय असो।। ।। भारत माता की जय ।। ।। वंदे मातरम ।।

# शहरातील वंचितांना तातडीने रमाई घरकुल मंजूर करा : चंदनशिवे

### बुधवार पेठ परिसरात ५४० पैकी केवळ ९८ अर्जांना मंजुरी

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर व बुधवार पेठ परिसरातील रमाई आवास योजने अंतर्गत वंचित राहणाऱ्या लोकांना तातडीने घरकुल मंजूर करण्यात यावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केली आहे.

अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकातील लाभर्थ्यांना रमाई आवास योजना अस्तित्वात असून सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकांच्या ७० टक्के पेक्षा जास्त वसाहती आहेत. जुने व नवीन पात्र यादी लाभार्थी संख्या ३८०० ते ४ हजार इतकी आहे.

मागील ३ ते ४ वर्षापासून बऱ्याच लाभर्थ्यांची घरे ही अर्धवट अवस्थेत आहेत. त्यांची घरे उघड्यावर वसलेली आहेत. त्याचप्रमाणे वाढत्या बांधकाम साहित्याच्या दरामुळे लाभर्थ्यांना आर्थिक समस्येचा सामना करावा लागत आहे.

अशा अनेक अडचणी आहेत. सोलापूर शहर व बुधवार पेठ परिसरातील रमाई आवास योजने अंतर्गत लाभार्थी घरकुलच्या लाभापासून वंचित राहत आहेत. बुधवार पेठ परिसरातील एकूण ५४० अर्जांपैकी केवळ ९८ अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे.

# इंटरनेट सुरक्षेच्यादृष्टीने प्रत्येकाने जागृत असावे

### निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार यांची माहिती

### सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

प्रत्येक वर्षी संपूर्ण जगभरात फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी सुरक्षित इंटरनेट दिन साजरा केला जातो. त्या अनुषंगाने माहिती सुरक्षा शिक्षण आणि जागरूकता याबाबत केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण स्तरापर्यंत इंटरनेट सुरक्षेच्या अनुषंगाने नागरिकांचे



प्रबोधन करण्यात येते. आज सर्वत्र इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे तसेच त्यातून आपली फसवणूक होण्याची शक्यताही असते तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी इंटरनेटच्या माध्यमातून आपली फसवणूक होऊ नये यासाठी अत्यंत जागृत असले पाहिजे व इंटरनेटचा सुरक्षित पद्धतीने वापर करून एक सजग इंटरनेट वापरकर्ता नागरिक बनले पाहिजे, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी केले.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पेपर इंटरनेट कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार मार्गदर्शन करत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, निवडणूक उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी व्ही. रवी, तहसीलदार समीर यादव यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख तसेच त्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार पुढे म्हणाल्या की, जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख तसेच त्यांच्या अधिनस्त अधिकारी, कर्मचारी यांनी शासकीय काम काजासाठी इंटरनेटचा वापर करत असताना इंटरनेट सुरक्षेच्या दृष्टीने जागरूक राहावे. तसेच आपल्या कार्यालयातील माहिती गोपनीय राहील व शासकीय संकेतस्थळ मेल आयडी हॅक होणार नाही या दृष्टीने इंटरनेट सुरक्षा बाबत दक्ष रहावे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : गुरुवार** | **दिनविशेष - चांगला दिवस, गुरुप्रतिपदा, गाणगापूर यात्रा, संत निवृत्तीनाथ जयंती** |
| **दि. १३ फेब्रुवारी २०२५** | **....राहू काल....** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **शके - १९४६** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **मास - फाल्गुन** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **कृ. प्रतिपदा (२०.२१)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **ऋतु - वसंत** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **नक्षत्र - मघा (२१.०६)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **योग - शोभन (०७.३०)** | |
| **करण - बालव (०७.४८)** | |

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# मध्य रेल्वेतील सोलापूरच्या तीन कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांचा संरक्षा पुरस्कार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धरम वीर मीणा यांनी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित एका कार्यक्रमात सोलापूर विभागातील तीन मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार देऊन गौरविले.

मागील महिन्यांत कर्तव्य दरम्यान सतर्कता, अनुचित घटना टाळण्यात आणि रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल हे पुरस्कार देण्यात आले. या पुरस्कारात पदक, प्रशंसापत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्र आणि २०००/- रोख रक्कम समाविष्ट आहे. महाव्यवस्थापकांनी आपल्या भाषणात पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कर्तव्यांप्रती असलेल्या सतर्कतेबद्दल आणि समर्पणाबद्दल त्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की अशा सतर्कता आणि धाडसाच्या कृतींमुळे इतरांना प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रामाणिकपणे काम करण्यास आणि मालवाहतूक आणि रेल्वे मालमत्तेचे नुकसान टाळण्यास प्रेरित केले जाईल. सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी पुरस्कार विजेत्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी श्री चंद्र किशोर प्रसाद, इतर विभाग प्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

**लेखाराम मीणा (सोलापूर) :** टीटीई, कमर्शियल. १३.०१.२०२५ रोजी सिद्धेश्वर एक्सप्रेस मध्ये कर्तव्यावर स्थित असताना, त्यांना ठाणे स्थानकातून निघाल्यानंतर एस-४ कोचमध्ये असामान्य आवाज आणि कंपन जाणवले. त्यांनी कोचची काळजीपूर्वक तपासणी केली आणि त्यांना आढळले की -४ आणि -३ कोचमधील जोडणीमध्ये मोठा तडा गेला आहे आणि अंतर वाढले आहे. त्यांनी ताबडतोब मुंबई येथील कमर्शियल कंट्रोलला ही समस्या कळवली. परिणामी, रेल्वे कल्याण स्टेशनवर थांबवण्यात आली. ऑपरेशन्स, कोचिंग आणि वॅगन विभागांनी कोचची सखोल तपासणी केली आणि त्यांना समस्या दिसून आली. वेळेवर समस्या शोधून काढल्याने आणि कमर्शियल कंट्रोलला त्वरित कळवल्याने या विभागात रात्रीच्या वेळी मोठी अनुचित घटना टळली.

**पंकज कांबळे (दुधनी) व विष्णू बौरी (गौडगाव) :** पंकज कांबळे हे कनिष्ठ अभियंता आणि विष्णू बौरी, इलेक्ट्रिकल सिग्नल मेंटेनर, सिग्नल आणि टेलिकम्युनिकेशन. ११.०१.२०२५ रोजी, गौडगाव डाउन होम सिग्नल -२ मध्ये बिघाड झाला. डाउन होम सिग्नल मुख्य लाईन तसेच लूप लाईनसाठी क्लिअर होत नव्हता. तसेच, दोन्ही लाईनसाठी कॉलिंग ऑन सिग्नल क्लियर होत नव्हता. तपासणीत असे आढळून आले की, रिले पिक अप स्थितीत होता परंतु सोडण्यात आला. सर्किट ट्रेस केल्यावर असे आढळून आले की, -00 रिलेचा जंपर वायर फ्यूज क्रमांक १, २.११ आणि ४ संपर्क तुटला होता. जंपर वायर बदलण्यात आला आणि दोष दुरुस्त करण्यात आला. एलचा हा इनडोअर वायर दोष गंभीर स्वरूपाचा होता. अशा गंभीर दोष दुरुस्त करण्यात विलंब झाल्यास असुरक्षित परिस्थिती निर्माण झाली असती. परंतु अनुचित घटना टळली.

# कायदेशीर बाबींचे उल्लंघन न करता उत्सव साजरा करा

### पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांचे बैठकीत आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी--**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवामध्ये सार्वजनिक मंडळांनी कायदेशीर बाबींचे उल्लंघन न करता उत्सव साजरा करा. मिरवणुकीमध्ये केवळ एक बेस व एक टॉप अशा पध्दतीनेचे साऊंट सिस्टिम लावण्याचे आवाहन पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी केले.

शहरात १५ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे अनुषंगाने मंगळवारी सायंकाळी शांतता समिती बैठक पार पडली. सदर बैठकीस पोलीस आयुक्त





एम राजकुमार, उपायुक्त अजित बोऱ्हाडे, श्रीमती डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रताप पोमण, यशवंत गवारी, सुधिर खिरडकर, राजन माने तसेच सोलापूर महानगर पालिकेकडील अतिरीक्त आयुक्त संदीप कारंजे, आर टी ओ, महावितरण चे अधिकारी तसेच, सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार, व शांतता कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

सदर बैठकीची प्रस्तावना उपायुक्त श्रीमती डॉ. दिपाली काळे करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या. त्यानंतर सदर सुचनेचे संबंधित महानगर पालिका, महावितरण, आर टी ओ, धर्मादाय आयुक्त कार्यालय अशा खात्याचे अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

यावेळी बोलताना पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांनी मांडलेल्या अडी-अडचणीचे निरसण केले. उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते. सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनीप्रदुषण कायद्याचे पालन करावे. कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. मिरवणुकीमध्ये अफवा पसरवू नये, नियमांचे पालन करावे, नियमांचे पालन नाही झाले तर कायदेशीर कारवाई होईल.

### पोलिस विभागाच्या सार्वजनिक मंडळांना सूचना

✲ सर्व मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरांची व्यवस्था करा. ✲ मंडपासाठी सार्वजनिक रस्त्याचा २/३ भाग मोकळा सोडा. ✲ मोकाट जनावरांपासुन मूर्ती/फोटोस धोका होणार नाही याची खबरदारी घ्यावी. ✲ देखावे चित्र आक्षेपार्ह नसावेत. ✲ आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंदी द्यावी. तसेच स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण, साक्षरता, सायबर जनजागृती करावी. ✲ मंडाळांनी महावितरण विभागाकडुन अधिकृत विद्युत जोडणी करुन घ्यावी ✲ मिरवणुकीत सामिल होणाऱ्या वाहनांची आरटीओकडून तपासणी करावी. ✲ मिरवणुकीमध्ये मोठे व लांब कंटेनर वापरु नये, ✲ वाहनांवरील देखाव्यांची उंची अडथळा होणारी नसावी. ✲ मिरवणुक संवेदनशिल ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये. ✲ इतर धर्माच्या भावना दुखावणार नाही व तसेच मंडळाने स्थापन केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे मुर्ती समोर स्वयंसेवक सतत हजर राहतील व मुर्तीची देखभाल करतील याची पुरेपुर काळजी घ्यावी. ✲ सोशल मिडीयावरुन काही अक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे. ✲ छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळानी ऑनलाईन तसेच ऑफलाईन पध्दतीने परवानगी घेणे बंधनकारक आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### महेश आवताडे यांच्या प्रामाणिकपणाबद्दल पंढरपूर अर्बन बँकेच्या वतीने सत्कार

**पंढरपूर, दि. १२ फेब्रुवारी-**

तालुक्यातील भटुंबरे येथील सुनिता लक्ष्मण खांडेकर या लॉकर्स कामानिमित्त मंगळवारी पंढरपूर अर्बन बँकेचे खवाबाजार येथे आल्या होत्या. बँकेतील काम आटोपून जाताना त्यांची बँकेची लॉकर्स किल्ली, रोख रक्कम व मौल्यवान वस्तू असणारी पर्स त्यांच्याकडून हरविले गेलेचे त्यांना घरी गेल्यावर लक्षात आले. दरम्यान, बँकेनजीक भादुले चौक येथे सिंहगड कॉलेज येथील कर्मचारी महेश ज्ञानेश्वर आवताडे रा.गोविंदपुरा यांना पर्स सायंकाळी सहा वाजताचे दरम्यान रस्त्यावर पडलेली सापडली. त्यांनी पर्समधील लॉकर्स की बँकेची असल्याचे कळल्यावर तत्काळ बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांचेशी संपर्क साधला. सदर लॉकर्स की वरून बँकेचे कर्मचारी व्यंकटेश मुळे यांनी सौ.खांडेकर यांचे पत्यावर त्यांचेशी संपर्क करून बँकेची किल्ली व पर्स सुरक्षित असल्याची माहिती दिली. दरम्यान महेश आवताडे यांनी दाखविलेला प्रामाणिकपणा बद्दल पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी कौतुक करीत त्यांचा सत्कार केला. यावेळी सुनिता खांडेकर, बँकेचे संचालक प्रभुलिंग भिंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, व्यवस्थापक गणेश हरिदास, व्यंकटेश मुळे आदी कर्मचारी वर्ग उपस्थित होता. सदर पर्स व त्यावरील सर्व मौल्यवान वस्तू पाहताच खांडेकर आज्जींनी समाधान व्यक्त करीत महेश आवताडे यांचे आभार मानले.



### टेंभुर्णी येथे खोडवा ऊस, पाचट व्यवस्थापनासंबंधी मार्गदर्शन शिबीर

**टेंभुर्णी, दि. १२ फेब्रुवारी-**

टेंभुर्णी (ता. माढा) येथे खोडवा ऊस व पाचट व्यवस्थापना संदर्भात कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात शुक्राचार्य भोसले व तालुका कृषी अधिकारी अविनाश चंदन, मंडळ कृषी अधिकारी टेंभुर्णी कार्यालयाचे सर्व अधिकारी, परिसरातील जवळपास ४०० ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. यावेळी भोसले यांनी पाचट व्यवस्थापनाचे महत्त्व शेतकऱ्यांना सांगितले. शेतीनिष्ठ व प्रगतशील शेतकरी सोमनाथराव हुलगे यांनीही शेतकऱ्यांना पाचट व्यवस्थापन करण्याची काळाची गरज आहे. त्यामुळे सर्वांनी पाचट न जाळता शेतात कुजवावे शेतात त्याचे व्यवस्थापन करावे, असे आवाहन केले. कृषी अधिकारी संजय पाटील यांनी उपस्थित शेतकऱ्यांनी भोसले व शेतीनिष्ठ प्रगतशील बागायतदार हुलगे यांनी केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देऊन प्रत्येकाने आपल्या शेतातील उसाचे पाचट न जाळता ते पाचट कुट्टी यंत्राद्वारे कुट्टी करून युरिया सुपर फॉस्फेट व डी कंपोझिंग कल्चरचा वापर करून पाचट जमिनीचा पोत सुधारण्यासाठी त्याचा वापर करावा, असे आवाहन केले.

### जेऊरवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी श्रीदेवी राठोड

**अक्कलकोट, दि. १२ फेब्रुवारी-**

तालुक्यातील जेऊरवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी श्रीदेवी राठोड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच पदासाठी श्रीदेवी राठोड यांचा एकमेव अर्ज आल्याने उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय मध्ये सरपंच कमळाबाई राठोड यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पार पडली. विद्यमान उपसरपंच वृषाली भालेराव राजीनामा दिल्याने पद



रिक्त झाले होते. निवडणूक निरीक्षक म्हणून विस्तार अधिकारी पी. एल. कोळी यांनी काम पाहिले. यावेळी वृषाली भालेराव, रोहित भालेराव, सिताबाई चव्हाण, विजय भालेराव, तंटामुक्त अध्यक्ष श्रीमंत राठोड, गोपीचंद राठोड, चंदू राठोड, पोलीस पाटील विजय चव्हाण, संजय राठोड, दत्तू भालेराव, विलास भालेराव, शिवाजी भालेराव, प्रताप चव्हाण, नामदेव राठोड, विजय आडे, हिराबाई राठोड, ग्रामपंचायत अधिकारी दिनकर बोंडे आदी उपस्थित होते.

### सुलाखे हायस्कूलमध्ये हर घर संविधान उपक्रम उत्साहात

**बार्शी, दि. १२ फेब्रुवारी-**

सुलाखे हायस्कूलमध्ये संविधान दिनाच्या ७५ व्या वर्षी संविधानाचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. सुलाखे हायस्कूलमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे आयोजन केलेले होते. यावेळी भारतीय संविधान सभेचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांनी कथाकथन, चर्चा व प्रश्नोत्तराच्या माध्यमातून वादविवाद करण्यात आले. ))यावेळी विद्यार्थ्यांमधून उस्फूर्तपणे सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी संविधानावर आपले मत व्यक्त केले व संविधानाचे भारतीय शासन व्यवस्थेतील महत्त्व विशद करण्याचा प्रयत्न केला. संविधानातील तत्त्व यावर विद्यार्थ्यांनी चर्चा केली. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे पाच गट पाडण्यात आले होते १) स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता असे गट पाडण्यात आले होते. शाळेतील नववीतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी कथाकथन, चर्चा व परिसंवाद याद्वारे संविधानाचे महत्त्व व्यक्त केले. यामध्ये प्रीती टोणगे, श्रावणी बगले, साक्षी काळे, अक्षदा चव्हाण, श्रेयश गव्हाणे, अभिनंदन नवले, पुष्कर केसकर, मांगडे, आदित्य लोंढे या विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य रामकृष्ण इंगळे हे होते. व्यासपीठावर पर्यवेक्षिका जावळे उर्मिला, सानप धोंडीबा, नागेश कानडे, सुहास देशमुख, सुहास शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक नागेश कानडे यांनी केले. प्रश्नोत्तराचा तास धोंडिबा सानप यांनी घेतला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुहास देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून करण्यात आला.

# बिबट्यासदृश्य प्राण्याची गाडीला धडक

**● कोंढेज परिसरातील घटना; परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण**



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१२ फेब्रुवारी-**

कोंढेज (ता.करमाळा) येथील रहिवासी सुशांत सामसे हे रात्री कोंढेज-जेऊर रस्त्याने चारचाकी वाहनाने जात असताना त्यांना बिबट्यासदृश प्राणी गाडी समोर दिसला. तो गाडीला धडकणार तोच त्यांनी ब्रेक दाबला. त्या प्राण्याने धूम ठोकली.

बिबट्यासदृश्य प्राणी प्रत्यक्ष पाहिल्याच्या घटनेमुळे परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर प्रकार इंगोले वस्ती नजिक राहुल लोंढे यांच्या शेताजवळ घडली. बिबट्या समोर बघितल्याने सामसे व त्यांच्या दोन छोट्या मुलांना भिती वाटली. जवळ असलेल्या इंगोले वस्तीवर त्यांनी गाडी उभी करून तेथील लोकांना ही हकीगत सांगितली त्यानंतर लोकांनी एकत्रित येऊन बॅटरी व उजेडाच्या सहाय्याने आजूबाजूला शोधण्याचा प्रयत्न केला मात्र तिथून तो निघून गेला होता. या परिसरातील बिबट्याच्या प्रत्यक्ष दर्शनामुळे येथील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ही माहिती मिळताच दुसऱ्या दिवशी वनविभागाचे कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट दिली या ठिकाणच्या ठशांचे नमुने घेतले असून हा प्राणी बिबट्या नसून दुसराच कुठला तरी प्राणी असावा असा कयास मांडला आहे, लोकांनी सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



आमच्या परिसरात बिबट्या असल्याचे काही नागरिक सांगत होते मात्र रात्री तो प्रत्यक्ष पाहायला मिळाल्याने लोकांची खात्रीच पटली आहे. सध्या परिसरामध्ये बिबट्याविषयी भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाच्या वतीने याचा बंदोबस्त करावा. नागरिकांनी घाबरून न जाता योग्य ती खबरदारी घ्यावी. वन विभागाने ठसे निरीक्षण करून तो बिबट्या आहे. याला दुजोरा दिलेला नाही.

**- गणेश सव्वासे,**
माजी सरपंच, कोंढेज



सोमवारी संध्याकाळी नऊच्या सुमारास मी कोंढेज गावातून जेऊर रस्त्याने माझ्या घराकडे येत असताना माझ्या गाडीच्या समोर अचानक बिबट्या रस्ता ओलांडताना आडवा आला माझ्या गाडीचा किंचित धक्का त्याला लागला मी व माझ्या सातवी मधील मुलीने दोघांनी तो पाहिला होता त्या ठिकाणचे ठसे पाहिल्यानंतर वनविभागाच्यावतीने तो तरस किंवा अन्य प्राणी असावा असे सांगितले जात आहे. मला तर तो प्राणी नक्कीच बिबट्यासारखाच वाटला होता.

**-सुशांत सामसे,**
प्रत्यक्षदर्शी, कोंढेज, (ता. करमाळा)

# विकासकामांसाठी गणेश कराडांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

**रिटेवाडी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासंदर्भात दिले निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १२ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पक्षाचे ओबीसी सेलचे प्रदेश सचिव गणेश कराड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंगवार दि.११रोजी मुंबई मंत्रालय येथे भेट घेत करमाळा तालुक्यातील विविध महत्वपूर्ण प्रश्न व रिटेवाड़ी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्या संदर्भात भेटीदरम्यान चर्चा करून निवेदन सादर केले.



या भेटीदरम्यान रिटेवाडी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी आपल्या स्तरावरुन मंत्रालयात शासकीय बैठक लावून योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावेत तसेच करमाळा तालुक्यातील पांडे, पोंधवडी, वंजारवाडी, रायगावसह इतर गावातील विविध प्रश्नांसंदर्भात निवेदन सादर करण्यात आले.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्याते आश्वासन दिल्याचे कराड यांनी बोलताना सांगितले.

## सुळेवाडी येथील साळुबाई सुळे यांची महसूल सहाय्यकपदी निवड

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १२ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील साळुबाई लाला सुळे-गोरड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतुन महसूल सहाय्यक पदी निवड झाली.



सुळेवाडी सारख्या दुष्काळी गावातुन शिक्षण घेऊन तसेच अत्यंत प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत सुळे यांनी यश संपादन केले.तिचे पहीले ते सातवीपर्यतचे शिक्षण सुळेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत,आठवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिलीव, तर पदवीचे शिक्षण पुणे येथील आबासाहेब गरवारे कॉलेज याठिकाणी तर एम. ए. चे शिक्षण पुणे विद्यापीठातून झाले. यानंतर स्पर्धा परीक्षा देत तिने हे यश संपादन केले. सुळे हिच्या यशाबद्दल पिलीव, सुळेवाडी परीसरातील शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

## मित्र विद्यालयात रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**▸ ३६ वर्षांनंतर विद्यार्थी अन् शिक्षकांनी दिल्या जुन्या आठवणींना उजाळा..!**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ फेब्रुवारी-**

कर्मवीर ना. मा. गडसिंग गुरुजी,मित्र विद्यालय येथे सन १९८९ बॅच मधील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साही वातावरणात संपन्न झाला. कर्मवीर गडसिंग गुरुजी यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सेवानिवृत्त शिक्षक एन.एल. गडसिंग यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक एल. वाय. पाटील होते.



प्रमुख पाहुणे म्हणून सहसचिव हेमंत गडसिंग, सपोनि हेमंतकुमार काटकर, प्राचार्य विकास बोराडे यांची उपस्थिती लाभली.

एन. एल. गडसिंग, एम. जे. गडसिंग, एल. वाय. पाटील यांनी कर्मवीर गडसिंग गुरुजी,मित्र विद्यालय व शिक्षकांविषयी असलेले प्रेम, आदर, आत्मीयता आयुष्यभर स्मरणात ठेवास असे विचार व्यक्त केले. विद्यार्थी मनोगतातून गटविकास अधिकारी राजू कांबळे, प्रकाश शिंदे, राजेंद्र सातपुते, शांतीलाल घोलप यांनी मित्र विद्यालयात मिळालेली ज्ञानाची शिदोरी, आदर्श संस्कार, शिस्त सर्वांसाठी मार्गदर्शक व दिशादर्शक असतील, असे मत यावेळी व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयास प्रोजेक्टर व सरस्वती देवीची आकर्षक मूर्ती भेट दिली. याप्रसंगी एम. जे. गडसिंग, राजेंद्र कांबळे, संचालक विलास मिरगणे, आर.के.कांबळे, नवनाथ भालेराव, गंगूताई माळी, महारुद्र म्हमाणे, अजिनाथ जमदाडे, दत्तात्रय गिरी, कालिदास चापले, सुभाष आवारे, एन.डी. मोरे, विलास गडसिंग, गौस शेख, दशरथ ननवरे, दत्तात्रय गवळी, भगवान काळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेंद्र यादव, ज्योत्स्ना गडसिंग, गणेश गाभणे, पांडुरंग कुंभार, कलीम मुलानी, शशिकला टोमपे, विद्या चव्हाण यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन राजेंद्र सातपुते यांनी तर आभार प्रकाश शिंदे यांनी मानले.



## ग्रामविकासाचे ध्येय साध्य करु या : पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी समाजोपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून ग्राम विकास करण्याचे ध्येय साध्य करुया, असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे सचिव प्रकाश पाटील यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे देवगांव (मां) येथे विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख होते. याप्रसंगी नॅक समन्वयक डॉ. समाधान पवार, डॉ. वशिष्ठ मुरमे, प्रा. दत्तात्रय मांजरे, उपसरपंच प्रकाश मांजरे, माजी सरपंच हनुमंत पाटील, मुख्याध्यापक बाळासाहेब मोरे, मुख्याध्यापक नागनाथ चोबे, पोलीस पाटील विशाल मांजरे, अंजन मस्तुद, ग्रामसेवक प्रमोद बाबर, कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, प्रा. समाधान लोंढे, प्रा. मनोज चिकराम यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना पाटील म्हणाले, प्रत्येक व्यक्तीने आपल्यातील अहंकार बाजूला करावा. तसेच परिसर स्वच्छतेबरोबरच मनाची ही स्वच्छता करावी. स्वयंसेवकांनी ग्रामीण जीवनाचे विविध पैलू समजून घ्यावेत, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. शेख म्हणाले की, ग्रामीण जीवनात अमुलाग्र बदल घडविण्यासाठी विविध स्तरातील लोकांनी पुढे आले पाहिजे. गावाचा कायापालट करायचा झाला तर ग्रामस्थांनी समाजोपयोगी उपक्रमात सहभाग घ्यावा, असे मत त्यांनी मांडले. यावेळी देवगांव ग्रामस्थांच्यावतीने श्री शिवाजी महाविद्यालयास नॅक पूर्नमुल्यांकनमध्ये ए ग्रेड मिळाल्याबद्दल सचिव प्रकाश पाटील, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. दामाजी भिसे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. फरताडे यांनी केले, तर आभार किशोर मांजरे यांनी मानले.

## सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी कार्याध्यक्षासह अन्य एकाविरुध्द गुन्हा दाखल

**▸ जमीन खुश खरेदी देऊनही त्याचा आर्थिक मोबदला दिला नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१२ फेब्रुवारी-**

गोणेवाडी येथील गट क्र.५५३/२ मधील दोन एकर जमीन खुशखरेदी देवूनही सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी (अजित पवार गट) कार्याध्यक्ष रामेश्वर मासाळ यांनी जमीन विक्रीपोटी आर्थिक मोबदला दिला नसल्या प्रकरणी रामेश्वर मासाळ व भाऊसाहेब कोळेकर यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी प्रकाश जयवंत व्हरे (वय६५ रा.गोणेवाडी) यांची गोणेवाडी येथे गट नं.५५३ मध्ये १८ एकर शेतजमीन असून त्यावर त्यांची उपजिवीका आहे. २०१५ साली मनिष चव्हाण यांना त्या गटातील ३ एकर जमीन फिर्यादीने विकली होती. त्या शेतजमीनीत दूध डेअरी प्रकल्पाचे बांधकाम चालू केले. गट नं. ५५३/२ मध्ये फिर्यादीने त्या बांधकामावर हरकत घेतली होती. मनिष चव्हाण यांनी फिर्यादीकडे ५५३/२ मधील बांधकामात येत असलेली लगतची दोन एकर जमीन खरेदी देण्याची मागणी केली होती. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना नाही म्हणून सांगीतले होते. तरी देखील सन २०१६ मध्ये मला ती जमीन द्या असे म्हणून १० लाख रुपये बँक ऑफ महाराष्ट्र शाखा नंदेश्वर येथील फिर्यादीच्या खात्यावर पाठविले होते. मात्र ते पैसे फिर्यादीने त्यांना वेळोवेळी परत केले. दि.१६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा नवनाथ हे दोघेजण दूध डेअरी जवळ असलेल्या शेतजमीन गट क्र.५५३/२ या शेतात थांबले होते. त्यावेळी आरोपी रामेश्वर मसाळ व भाऊसाहेब कोळेकर यांनी तुझी डेअरी लगत असलेली दोन एकर जमीन रामेश्वर मासाळ यांच्या नावावर करुन दे असे ते म्हणाले. त्यावर माझी जमीन तुम्हाला देणार नाही असे फिर्यादी म्हणाल्यावर आरोपीने मला तू जमीन माझे नावावर कर नाही तर तुला व तुझ्या कुटूंबाला ठेवतच नाही अशी धमकी देत शिवीगाळी केली. यावेळी भाऊसाहेब कोळेकर यांनी फिर्यादीस बाजूला घेवून तुम्ही कशाला फुकट मरता? ही जमीन रामेश्वर मासाळ यांच्या नावावर करुन द्या असे दिपक मासाळ,जगन्नाथ मासाळ यांच्या समोर म्हणाले. भीतीपोटी फिर्यादी हे त्यांचा मुलगा नवनाथ बाबासाहेब मासाळ यांच्या मोटर सायकलवर बसुन दुय्यम निबंधक कार्यालय मंगळवेढा येथे गेले व फिर्यादीचा मुलगा नवनाथ यांच्या नावावर असलेली गट नं.५५३/२ मधील दूध डेअरी लगतची दोन एकर जमीन रामेश्वर मासाळ यांना खुश खरेदी दिली. सदर जमीनीच्या विक्री पोटी फिर्यादीस रामेश्वर मासाळ यांनी आर्थिक मोबदला दिला नसल्याचे दिलेल्या फिर्यादीत प्रकाश व्हरे यांनी म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे शुक्रवारी सांगोल्यात आगमन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ फेब्रुवारी-**

सांगोला शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथील भव्य स्मारकामधील चबुतऱ्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी महामाता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या १७१ व्या जयंती दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सांगोला शहरात आगमन होणार असल्याची माहिती भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने देण्यात आली.



या पुतळ्याच्या आगमना प्रित्यर्थ रॅली काढण्यात येणार असून शुक्रवारी स.९ वा. सांगोला शहरातील भीमनगर येथील दीक्षाभूमी कट्टा ते भारत गल्ली, जय भवानी चौक, जुनी भाजी मंडई वेशीतून मारुती मंदिर, मणेरी गल्ली, परीट गल्ली, महादेव गल्ली, कोष्टी गल्ली, भोपळे रोड, महात्मा फुले चौक ते शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे ही रॅली येणार आहे. दु.३ वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीचे धम्मविधी कोल्हापूरचे भंतो संबेधी व गुगुवाड ता.जत, जि.सांगली येथील भंतो गोविंदो मानदो हे करणार आहेत. आ.डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी आ.ऍड.शहाजीबापू पाटील, माजी आ.दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात येणार असल्याची माहिती जयंती उत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ (रजि) कार्यकारणीचे अध्यक्ष तानाजी बनसोडे, खजिनदार सिताराम बनसोडे, सेक्रेटरी बाळासाहेब बनसोडे, उपाध्यक्ष अप्सरा ठोकळे, मैना बनसोडे, सहसचिव रुपेश बनसोडे, संचालिका विजया बनसोडे, संचालक दीपक बनसोडे, रामस्वरूप बनसोडे, सतीश बनसोडे, कुंदन बनसोडे, जगदीश भोरकडे, किशोर बनसोडे, सोपान बनसोडे, मिलिंद बनसोडे, प्रशांत धनवजीर, सुभाष बनसोडे, महादेव बनसोडे, उमेश बनसोडे, मोहन गुडदौरू, धम्म मित्र बापूसाहेब ठोकळे, तज्ञ संचालक ॲड. आनंदा बनसोडे, ॲड. सागर बनसोडे आदींसह समस्त बहुजन समाज सांगोला तालुका परिश्रम घेत आहेत.

**बहुजन बंधू-भगिनींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या स्वागतासाठी, रॅलीसाठी तसेच पुतळा उभारणी सोहळ्यासाठी सांगोला शहर व तालुक्यातील बौद्ध समाज बंधू भगिनी, भीम अनुयायी, फुले शाहू आंबेडकर प्रेमी, तमाम बहुजन बंधू भगिनी यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



## जुळे सोलापुरात गुरु रविदास जयंती, माघ पौर्णिमा साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१२ फेब्रुवारी,**

माघ पौर्णिमा व गुरु रविदास जयंतीनिमित्त बुधवारी दिवसभर जय भारतमाता सेवा समितीचे अध्यक्ष राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराजांच्या दिव्य सानिध्यात हजारो भक्तांनी दर्शन आणि महाप्रसाद घेऊन जल्लोष साजरा केला.

जुळे सोलापूर ओम गर्जना चौक येथील मारूती मंगल कार्यालय येथे हा कार्यक्रम झाला. सोरेगाव येथे श्रीक्षेत्र महादेवलिंग मल्लिनाथ देवस्थान मंगळवार येथे रात्रभर दर्शन दिले. पहाटे साडेचार पासून सकाळी सात वाजेपर्यंत हत्तुर येथे म्हैसूर, बागलकोट, विजापूर, सांगली येथून आलेली भक्तांना दर्शन दिले.यानंतर बुधवार दिवसभर जुळे सोलापूर येथील मारुती मंगल कार्यालय येथे सोलापूर बिदर, लातूर, धाराशिव नांदेड येथील भक्तांना सतत दर्शन देऊन आशीर्वाद दिले. आमदार विजयकुमार देशमुख, हेरिटेज मंगल कार्यालय मालक शहा, आळंद तालुका मार्केट कमिटी माजी अध्यक्ष आण्णाराव माली पाटील,मारूती मंगल कार्यालय मालक हणमंत कावळे, उद्योगपती अनिल पाटील, डॉ. मृत्यंजय नीलंगे. मल्लिकार्जुन देवस्थान चेअरमन हणमंत तद्देवाडी, आप्पशा पाटील सचिव, विश्वनाथ पोतदार सोन्याचे व्यापारी तडवळ शिवानंद बबबाद प्रगतशील शेतकरी, आणाराव याबजी माजी सरपंच तडवळ,मल्लिनाथ पनशेट्टी सेक्रटरी उपस्थित उपस्थित होते.

## पंढरीत दुसरे राज्यस्तरीय कलाशिक्षक अधिवेशन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ फेब्रुवारी-**

अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघ व सोलापूर जिल्हा शैक्षणिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसरे राज्यस्तरीय कलाशिक्षक अधिवेशन पंढरपूर येथे संपन्न झाले.

या अधिवेशनाला माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत हे स्वागताध्यक्ष होते. तसेच सदर अधिवेशनास नाशिक विभाग शिक्षक आमदार केशव दराडे व नाशिक विभाग पदवीधर आमदार सत्यजीत तांबे यांनी विशेष सहकार्य केले. अधिवेशनाच्या शुभारंभ प्रसंगी




स्वागताध्यक्ष दत्तात्रय सावंत, कलाशिक्षक संघाचे अध्यक्ष शेरशाह डोंगरी, सरचिटणीस शालीग्राम भिरूड, सोलापूर जिल्हा अध्यक्ष शशिकांत सदाफुले, सचिव संतोष धारेराव व बहुसंख्येने कलाशिक्षक उपस्थित होते.

या अधिवेशनामध्ये भारत माळी, सचिव सावित्रीबाई फुले चित्रकला महाविद्यालय यांना कलाप्रेमी पुरस्कार देण्यात आला.

तसेच सावित्रीबाई फुले चित्रकला महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अमित वाडेकर यांना आदर्श कलाशिक्षक पुरस्कार देण्यात आला. त्याचबरोबर १० हुन अधिक कलाशिक्षकांना जीवनगौरव व आदर्श कलाशिक्षक पुरस्कार देवुन सन्मानीत करण्यात आले. दरम्यान पुरस्कार वितरणा नंतर सावित्रीबाई फुले चित्रकला महाविद्यालयाच्या वतीने सर्व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त...




### करकंबमध्ये रोहिदास जयंतीनिमित्त भजन, भोजन

**करकंब, दि. १२ फेब्रुवारी-**

संत रोहिदास जयंतीनिमित्त करकंब येथे ठिकठकाणी प्रतिमापूजन तर रोहिदास नगर येथे मुख्य जयंतीचा कार्यक्रम पार पडला.सुरुवातीस मा.पं.समिती सदस्य प्रभाकर वास्ते,दत्तात्रय शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा व श्रीसंत रोहिदासनगर फलकाचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष विशाल शिंदे, शिवराज शिंदे, अनिल शिंदे, किशोर शिंदे, दिनेश कांबळे, विजय शिंदे, विकास शिंदे, प्रविण शिंदे, निलेश कांबळे, सर्जेराव शिंदे, समाधान शिंदे, अमोल शिंदे, मनोहर शिंदे, सचिन शिंदे, अशोक शिंदे यांच्यासह रोहिदास मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी भजनी मंडळाचा कार्यक्रम झाला. यानिमित्त भजनी मंडळाने विविध भक्तीगीते सादर केली. भगवान पाटोळे यांनी तबला, माऊली पिसे यांनी हार्मोनियम साथ दिली. रामलिंग ढोबळे, विठ्ठल शेळवणे, जवाहर मोहिते, बाळासाहेब वास्ते, नवनाथ शिंदे यांनी भक्तिगीते व गौळणी सादर केल्या. यावेळी ॲड. शरदचंद्र पांढरे, ग्रा. पं. सदस्य मारुती देशमुख, राहुल पुरवत, प्रा. सतिश देशमुख, माजी मुख्याध्यापक यशवंत शिंदे, भारत राजगुरू, महेंद्र शिंदे, सचिन शिंदे, गणपत शिंदे, धनंजय कांबळे उपस्थित होते. आरतीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



### सांगोल्यात संत रविदास महाराज जयंती साजरी

**सांगोला, दि. १२ फेब्रुवारी-**

सांगोल्यातील खडतरे गल्ली येथे श्री संत रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच सांगोले नगरपालिकेमध्ये श्री संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशासन अधिकारी सचिन पाडे, रोहित गाडे, विद्युत अभियंता कांबळे, कर निरीक्षक प्रियांका पाटील, आरोग्य निरीक्षक विनोद सर्वगोड यांनी केले. यावेळी माजी नगरसेवक किशोर बनसोडे, बाळासाहेब बनसोडे, अभियंता कांबळे यांनी संत रविदास महाराज यांच्या कार्या विषयी उपस्थित समाज बांधवांना संबोधित केले. यावेळी माजी नगराध्यक्ष अनिल खडतरे, संजय खडतरे, दीपक खडतरे, प्रवीण खडतरे, ऋषिराज खडतरे, ऍड.ऋत्विक खडतरे, राजेश खडतरे, विजय सराटे, विजय सुरवसे, नारायण सुरवसे, शिवाजी खडतरे, विठ्ठल इंडे, संतोष खडतरे, रमेश खडतरे, प्रशांत खडतरे, पिराजी खडतरे, राहुल खडतरे, नितीन खडतरे, शैलेश खडतरे तसेच नगरपालिकेतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मंद्रुपमध्ये संत रोहिदास जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

मंद्रुप येथील ग्रामपंचायत कार्यालयात संत शिरोमणी रोहिदास महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्राम पंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे, शिवानंद लोभे, सुरेश टेळे, सिध्दाराम काळे, संजय कांबळे, अप्पासाहेब शिळ्ळे, माजी उपसरपंच सुनिल रणखांबे, सोमनिंग कांबळे, संजय काळे, कटयप्पा काळे, रेवणसिध्द कांबळे, शिवानंद कांबळे, शब्बीर लिगेवान, रतिकांत वाडकर, ईरेश उंबरजे, अमोल बाळगे, हारून शेख आदी उपस्थित होते.




### बसवराज प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**अक्कलकोट, दि. १२ फेब्रुवारी-**

तालुक्यातील करजगी येथे संस्थेचे अध्यक्ष ॲड. दयानंद उंबरजे यांच्या नेतृत्वाखाली श्री बसवराज प्रशाला येथे दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी गावचे सरपंच विवेकानंद उंबरजे, उपसरपंच शब्बीर पटेल, कादर गोडीकट, श्रीशेल खंजुरगी, परमेश्वर अंबलगी महबुब हंजगी व मुख्याध्यापक एस.बी. बिराजदार उपस्थित होते. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन पिंरगुडे, यळदारे यांनी तर आभार पोतदार यांनी मानले.

# पुढचे वर्ष शेतकऱ्यांचे; पावसाला नाही तोटा

## ● भंडारकवठे येथील मूक भाकणूक; हजारो शेतकऱ्यांसह भाविकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

आगामी वर्षातील खरीप आणि रब्बी हंगामातील पाऊस चांगला असून नगदी पिकासह जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न उद्भवणार नसल्याची भाकणूक भंडारकवठे येथील श्री महाशिवयोगी महासिध्द देवाच्या यात्रेत हजारो भाविकांच्या उपस्थितीत झाली. आगामी वर्षात पीक-पाणी चांगले येणार असल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

मंगळवारी दुपारी तीन वाजता भाकणुकीला प्रारंभ झाला. मानकरी तुकाराम कुंभार व अण्णप्पा कुंभार यांनी तयार करून ठेवलेली मातीची भांडी आणण्यात आली. त्यानंतर त्यांनी दुसरे मानकरी असलेले विठ्ठल पाटील यांच्या घराच्या देवळीतून भरपूर आणि सर्वांना दिसेल असे कापूस आणल्याने पुढील वर्षी नगदी पीक चांगले येणार असल्याचा अंदाज भाविकांमधून व्यक्त करण्यात आला. तसेच, देवाच्या महापूजेसाठी येथील भीमा नदी पात्रातून पवित्र जल (शिताळ) आणले. शेवटी गावालगतच्या शेतातून कडबा आणताना मुख्य प्रवेशद्वाराला लागला. दरम्यान एक पेंडी खाली पडल्यामुळे रब्बी हंगामातील पिकांचा





### भंडारकवठेच्या भाकणुकीला मोठी परंपरा

भंडारकवठे येथील माघी पौर्णिमेला असणाऱ्या महासिध्द देवाच्या यात्रेदरम्यान होणाऱ्या भाकणुकीला मोठी परंपरा आहे. या भाकणुकीवरच परिसरातील शेतकरी खरीप व रब्बी हंगात पेरणी करतात. भाकणूक ऐकण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटकातून हजारो शेतकरी भाविक उपस्थित असतात.

काळ चांगले असणार आहे. सर्व भाकणूक हे देवाचे मानकरी फुलारी हे मूकपणे करतात. बुधवारी पहाटेच्या दरम्यान मंगळवेढा तालुक्यातील डोणज येथील श्री महासिध्द देवाचे बैलासह पाच पुजारी हे नैवेद्य घेऊन येतात. बैलावरील नैवेद्य उतरवून येथील पुजाऱ्यांना तंबाखू दिल्याने मघा नक्षत्राचा पाऊस हमखास बरसणार आहे.

पहाटेची महापूजा ही डोणजचे पुजारी यांनी केली. येथील देवाची पहाटेच्या महापूजेनंतर पुजाऱ्यांना डोणजचे पुजारी जेवण वाढले. नंतर दोघे पुजारी मंदिरात तर शेवटी दोघे जण पुजारी मंदिराच्या गर्भगृहात बसून जेवले.

सर्व पुजाऱ्यांच्या जेवणात तूप जास्त वाढल्यामुळे यंदाच्या नक्षत्रातील पाऊसकाळ चांगला असणार आहे. पिंडीवरील भांडार कापसाने गोळा करून पुजारी डोणजला नेतात. पण यंदा पिंडीवर भांडार जास्त राहिल्याने धनधान्य अधिक पिकणार आहे. देवाचे बैल कडबा न खाता नैवेद्य खाऊन कणीस खाल्ले आहे. आणि मलमूत्र केल्याने जनावरांना यंदा पिढा नसल्याचे सांगण्यात आले.

# निर्यातक्षम केळी उत्पादनात सोलापूर जिल्हा अग्रेसर

## ● डॉ. के. बी. पाटील : टेंभुर्णी येथे महाकेळी पीक परिसंवाद

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १२ फेब्रुवारी-**

केळीच्या लागवडीपासून ते निर्यातक्षम केळी कशी बनवावी तसेच सध्या शेतकऱ्यांना भेडसावत असलेल्या केळीमधील येणाऱ्या वायरस पासून कसा बचाव करावा असे सविस्तर माहिती शेतकऱ्यांना सांगत, जगात निर्यातक्षम केळी उत्पादनात महाराष्ट्रातील जळगाव याबरोबरच उत्कृष्ट दर्जाची निर्यातक्षम केळी उत्पादनात सोलापूर जिल्हा अग्रेसर आहे.

केळी उत्पादनाच्या दृष्टीने शेतकऱ्यांची मानसिकता बदलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जळगाव येथील जैन इरेगेशनचे उपाध्यक्ष डॉ. के.



बी. पाटील यांनी केले.बुधवारी १२ फेब्रुवारी रोजी प्रतिष्ठा मंगल कार्यालयात महा केळी पीक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय केळी तज्ञ डॉ. के. बी. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी दिलीप चव्हाण होते. यावेळी चीफ जनरल मॅनेजर दिलीप चव्हाण, स्वयंप्रकाश चौधरी, नागेश पाटील, किरण पवार, कालिदास सावंत, सुभाष फाळके, संदीप नवघने, विभागीय व्यवस्थापक किरण पाटील, संतोष डांगे, तुषार जाधव, गिरीश वायसे, कृषीभूषण सोमनाथ हुलगे, महेश डोके-पाटील, सचिन डोके, अरुण गुंड, महेंद्र पाटील बिटरगांव, महावीर जगताप, शफी शेख यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या केळी पीक परिसंवादामध्ये केळी पिकामधील ड्रीपद्वारे विद्राव्य खतांचा योग्य वापर, रोग, कीड व केळीमध्ये येणारा व्हायरस, तसेच केळीच्या निर्यातीचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी जनरल मॅनेजर दिलीप चव्हाण म्हणाले की, जय किसान निविष्ठाच्यामध्ये सोलापूर जिल्ह्यात कायम अग्रेसर राहिले आहे. कार्यक्रमासाठी दिलीप धोका, स्वप्निल धोका, विठ्ठलगंगा फार्मर प्रोड्युसर कंपनी व जय किसान परिवाराच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

### तरुणांनी पुढे यावे

निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी जी प्रक्रिया करावी लागते, त्या प्रक्रिया नियोजनासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे. सध्या सोलापूर जिल्ह्यात ऊस पिकाबरोबरच केळी उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. येथे निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी सातत्याने प्रयत्न होत असल्यामुळेच जागतिक बाजारपेठेत निर्यातक्षम केळी उत्पादनात जळगावाबरोबरच सोलापूर जिल्ह्यानेही अव्वल स्थानी मजल मारली आहे. मात्र त्यासाठी सातत्यता, प्रयोगशीलता व परिश्रमाची जोड हवी आहे, असे डॉ. पाटील यांनी सांगितले.

# माढा तालुक्यात तूर हमीभाव खरेदी केंद्रावर नाव नोंदणीला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १२ फेब्रुवारी-**

माढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ एनसीसीएफ व महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तूर हमभाव खरेदी केंद्राच्या ऑनलाईन नाव नोंदणी सुरुवात झाली असून माढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या कुर्डूवाडी कार्यालयामध्ये शेतकऱ्यांनी नोंद करून घेण्याचे आवाहन खरेदी विक्री संघाचे चेअरमन तुकाराम ढवळे यांनी केले आहे.

नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी माढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ कुर्डूवाडी कार्यालयाच्या विभागाकडून एसएमएस प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांनी तूर विक्रीसाठी हमीभाव खरेदी केंद्रावर आणावयाची आहे. त्यानंतर विक्री केलेल्या तुरीची रक्कम ऑनलाइन बँक खात्यावर जमा होणार आहे. यंदा आधारभूत किंमत ७५५० रुपये आहे. तूर पिकाची नोंद असलेला सातबारा उतारा, ८ अ, आधार कार्ड, बँक पासबुक ती स्पष्ट दिसत असणारे झेरॉक्स व मोबाईल नंबरची आवश्यकता आहे. खरेदी केंद्राच्या अधिक माहितीसाठी खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक सुधिर चोपडे (९४२३४६१९०१) यांच्याशी संपर्क साधावा असेही आवाहन संस्थेचे चेअरमन तुकाराम ढवळे यांनी केले आहे.



### श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास चांदीचा टोप अर्पण

**पंढरपूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस चंद्रभागा नारायण भांडे या भाविकांने दीड किलो वजनाचा चांदीचा टोप अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल देणगीदार भाविकांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी श्री विठ्ठलाची प्रतिमा, उपरणे, दैनंदिनी व दिनदर्शिका देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते. सदरचा चांदीचा टोप एक किलो ५०० ग्रॅम वजनाचा असून त्याची अंदाजे किंमत एक लाख ३३ हजार होत आहे. देणगीदार भाविक हे राजोर सावरकुंटे तालुका अकोला जिल्हा अहिल्यानगर येथील रहिवासी आहेत.

# जनता सहकारी बँकेस द्वितीय आदर्श बँक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १२ फेब्रुवारी-**

येथील जनता सहकारी बैंक लि., कुर्डुवाडी या बँकेस सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या विद्यमाने व्दितीय आदर्श बँक पुरस्कार मिळाला असून हा पुरस्कार दि. महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक फेडरेशन मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा व जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सोलापूर येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात बँकेचे संस्थापक संचालक, माजी अध्यक्ष सुरेश शहा, माजी अध्यक्ष अर्जुनराव बागल, फुलचंद धोका, संचालक दिलीपचंद धोका, अरुण गिड्डे, विजयसिंह परबत, सुलभा



दिंडे-दास, व्यवस्थापक विजय गायकवाड यांनी तो स्वीकारला. यावेळी आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे, जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले, उपाध्यक्ष डॉ. अशोक सुरवसे उपस्थित होते. सुरेश शहा म्हणाले, ग्रामीण भागातील नागरी सहकारी बँकांना कुशल कार्यक्षम कर्मचारी व व्यवस्थापक मिळत नसल्याची व्यथा व्यक्त करून राज्य पातळीवरील संघटनेने यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी या बँकेस १९९५-९६ मध्ये दि. महाराष्ट्र सहकारी बँक्स असो. मुंबई यांचा तर २००४ मध्ये दि.महाराष्ट्र अर्बन को ऑफ बँक्स फेडरेशनचा तसेच दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बैंक असो. मुंबई यांच्या अमृत महोत्सवानिमित्त व पुढे सन २०१४-१५ मध्ये पुरस्कार प्राप्त झाले होते. नुकताच 'बँको ब्ल्यू रिबन' पुरस्कार लोणावळा येथे प्राप्त झालेला आहे.

# पुरस्कारामुळे नवी ऊर्जा मिळते : खा. निलेश लंके

## ● राज्यस्तरीय बहुजनभूषण पुरस्कार वितरण; टेंभुर्णी फेस्टिव्हलला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १२ फेब्रुवारी-**

समाजात चांगली माणसे कार्यरत आहेत. त्यांना पुरस्कार रूपाने सन्मानित केल्यास त्यांच्या कार्याला नवीन ऊर्जा तर मिळतेच परंतु अशा व्यक्तीच्या हातून अनेक प्रेरणादायी बाबी घडू शकतात शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीच्या कार्यामुळे या क्षेत्राची नक्कीच प्रगती होईल, असे प्रतिपादन नगर दक्षिणचे लोकप्रिय खा. निलेश लंके यांनी केले.

२१ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या टेंभुर्णी फेस्टिवल या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचा शुभारंभ आणि त्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय बहुजनभूषण पुरस्काराचे वितरण रविवारी सायंकाळी खा. निलेश लंके यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे आयोजन करणारे बहुजन प्रतिष्ठान या नावातच दम आहे समाजातून आज बहुजन समाज ही संकल्पना कमी होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी बहुजन समाजाला एकत्र करूनच स्वराज्य निर्मिती केली. असल्याने आज पुन्हा एकदा बहुजन समाजाची संकल्पना टिकवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर पुरस्कारार्थी राजेश गोपीनाथ शिरसागर विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कोल्हापूर विभाग, कादर राजूमिया शेख शिक्षणाधिकारी प्राथमिक जि प सोलापूर, भाजपाचे तालुका अध्यक्ष योगेश बोबडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन



जगताप, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकर देशमुख ,निरंजन भूमकर, टेंभुर्णीचे माजी सरपंच प्रमोद कुटे, राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष औदुंबर देशमुख, सोनाई दूध संघाचे गणेश केचे, ड आकाश लोंढे,विलास देशमुख, शिवसेनेचे शहर प्रमुख सुरेश लोंढे,टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य वैभव महाडिक, परमेश्वर खरात, उपसरपंच सतीश नेवसे, मा.उपसरपंच हनुमंत चव्हाण, शैलेश ओहोळ, मार्केट कमिटीचे धनंजय मोरे, रामभाऊ वाघमारे,सुवर्ण असोसिएशनचे महेश कोठारी, डीसीसी बँकेचे मॅनेजर विष्णू भोसले, सचिन खुळे, प्रशांत सोनवणे, प्रताप काळे गुरूजी, तांबवे विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन संतोष खटके, संतोष वरकुटे, व टेंभुर्णी व परिसरातील सर्व पत्रकार बंधू इत्यादी मान्यवर उपस्थित होते.मात्र सालाबाद प्रमाणे असणारे माढा तालुक्यातील नेते मंडळी प्रमुख उद्घाटक म्हणून अतिथी असतात मात्र यावेळेस त्यांनी या कार्यक्रमाला पाठ फिरवल्याचे दिसून आले. प्रारंभी खासदार निलेश लंके व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व दीपप्रज्वलन करून टेंभुर्णी फेस्टिवलचे उद्घाटन झाले. फेस्टिवलचे संयोजक रघुनाथ वाघमारे यांनी प्रास्ताविकात टेंभुर्णी फेस्टिवलची पार्श्वभूमी सांगून या निमित्ताने हजारो लोकांना रोजगार मिळवून देणे व आर्थिक प्रगतीचा मार्ग दाखवणे या उद्देशासाठी फेस्टिवल ची संकल्पना असल्याचे व या माध्यमातून नवोदित कलाकारांना वाव देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. राजेश क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी आपल्या मनोगतात जीवनात संघर्ष, त्याग, कष्ट आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर यश मिळवता येत असल्याचे सांगितले. शिष्यवृत्ती परीक्षा स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले ध्येय गाठायचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. आभार नागनाथ वाघमारे यांनी मानले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजापूर रोहिदास महाराजांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ फेब्रुवारी -**
मानवतेचे प्रचारक थोर संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त चर्मकार समाजाच्या वतीने भवानी रोडवर त्यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम त्यांच्या प्रतिमेचे पूजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सचिन पाटील, जि.प.चे माजी अध्यक्ष धीरज पाटील, काँग्रेस नेते रणजीत इंगळे, शिवसेनेचे शाम पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आनंद जगताप, मिलिंद रोकडे, शहाजी वाघमारे, संजय गायकवाडसह कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या निमित्ताने मोठ्या प्रमाणात भाविकांना अन्नदान देखील करण्यात आले.



## संक्षिप्त वृत्त...



### महाराष्ट्र संत विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तेर, दि.१२ फेब्रुवारी -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र संत विद्यालयातील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात छ्चचड शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांचे नावे दिव्या रामचंद्र आगलावे, पाडुळे अनन्या अविनाश, मदने समीक्षा शिवाजी,शेख सदफ बख्तवर, निकते यशस्विनी महावीर, निकते निखिल नवनाथ, नंदिनी संतोष रोहिदास, अबदारे सौरभ किरण, देवकते करण काका, चौहाण प्रेरणा शीतलसिंह, शेळके श्रावणी विठ्ठल, साळुंके विजय धनंजय, फंड ईश्वरी दयानंद, कांबळे ओम मारुती, बंडे सोमाक्षी रामलिंग, कांबळे योगेश रामलिंग सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना कांबळे बी.डी., बळवंतराव एस.एस., बेदरे जे.के., वर्गशिक्षक महेश गोडगे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल पर्यवेक्षक सुशीलकुमार पाटील व संस्थेच्या सर्व पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष टी.पी. शिनगारे, उपाध्यक्ष अविनाश पाडुळे, सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### संत रविदास यांची जयंती साजरी

**खामसवाडी, दि.१२ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद प्रशाला खामसवाडी या येथे संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक शिवाजी कोकाटे सर यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशालेतील शिक्षकांनी संत रविदास महाराज यांच्या कार्याचा आढावा आपल्या भाषणातून घेतला. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याबद्दल व साहित्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन जाधव यांनी केले.



### महादेव भोसले यांचा सत्कार

**जळकोट, दि.१२ फेब्रुवारी -**
येथून जवळच असलेल्या लोहारा तालुक्यातील पंचशिल चॅरिटेबल ट्रस्ट, दस्तापूर, आष्टामोड यांच्या वतीने महादेव भोसले यांची मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीस तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण, पंचशिल घेण्यात आले. जेवळी येथील शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय येथे कार्यरत असलेले शिक्षक महादेव भोसले यांची सेवा जेष्ठतानुसार मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल तज्ञ संचालक विठ्ठल डावरे, हरिष डावरे यांच्या हस्ते शाल, फेटा, पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष अरुण लोखंडे, उपाध्यक्ष शेषेराव डावरे, अंबादास डावरे, रमेश गायकवाड, शिल्पकार जीवन गुळे, अभिजित सुर्यवंशी, भैया डावरे सर्व संचालक उपस्थित होते.

### बिरुदेव सोनटक्के यांचे निधन

**तुळजापूर, दि.१२ फेब्रुवारी -**
तालुक्यातील तीर्थ खुर्द येथील विद्यमान सरपंच बिरुदेव नारायण सोनटक्के यांचे मंगळवार दि.११ रोजी राहत्या घरी सकाळी सातच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ५४ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातवंड असा परिवार आहे.त्यांच्यावर सायंकाळी सहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळेस तीर्थ खुर्द येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## श्री तुळजाभवानी मंदिराच्या जतन व संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पावले....

# पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनात मंदिराला मिळणार गतवैभव





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ फेब्रुवारी -**
तुळजापूर येथे स्थित श्री तुळजाभवानी मंदिर,हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असून लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मंदिराचे जतन व संवर्धन करून त्याला गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि भाविकांच्या सोयीसुविधांसाठी राज्य शासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

राज्य मंत्रीमंडळाच्या छत्रपती संभाजीनगर येथे १६ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या विशेष बैठकीत श्री तुळजाभवानी मंदिराच्या विकासासाठी विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे. मंदिर परिसरातील असंयुक्तीक बांधकाम हटवून मंदिराला पूर्वीचे वैभवशाली स्वरूप देण्याच्या दृष्टीने हे पावले उचलण्यात आली आहेत.भाविकांच्या सोईसाठी दर्शन व्यवस्था सुधारण्याबरोबरच गर्दी नियंत्रणासाठी स्वतंत्र मार्ग तयार करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. संरचनात्मक लेखापरीक्षण व वैज्ञानिक चाचण्या करण्यात आल्या आहे.

मंदिराच्या स्थायित्वाचा आणि मजबुतीकरणाचा तांत्रिकदृष्ट्या अभ्यास करण्यासाठी संरचनात्मक लेखापरीक्षण करण्यात आले आहे. हे लेखापरीक्षण विशेषज्ञ व्यक्तींकडून आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात आले आहे. यामध्ये पुढील बाबी आढळून आल्या- मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यातील आणि सभामंडपातील दगडी बीम, स्तंभ व कर्णशिळांमध्ये तडे आढळून आले. १९९३ च्या भूकंपानंतर मंदिराच्या शिखराचे बळकटीकरण करण्यात आले होते. मात्र,त्या दुरुस्तीमुळे शिखरावर अतिरिक्त भार येऊन मूळ दगडी रचनेत तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. बोरोस्कोपी चाचणीतून मंदिरात वापरण्यात आलेल्या वेगवेगळ्या बांधकाम साहित्यांची तपासणी करण्यात येणार आहे.क्ष-किरण तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्भगृह आणि शिखराच्या आतल्या भागातील लपलेले तडे आणि नुकसान समोर येणार आहे. Ground Penetrating ठरवरी तंत्रज्ञानाद्वारे मंदिराच्या पाया आणि भूगर्भातील स्थिरतेची तपासणी करण्यात येणार आहे.

तिन्ही चाचण्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंदिराच्या गाभाऱ्याचे व शिखराचे पूर्णपणे दुरुस्ती करावी का, याचा निर्णय प्रशासनाच्या सहमतीने घेतला जाणार आहे. त्यानुसार नव्याने अंदाजपत्रक तयार केले जाईल. याशिवाय, मुख्य प्रवेशद्वाराचे संरचनात्मक लेखापरीक्षण उजएज्ञ पुणे संस्थेच्या सहाय्याने केले जात असून, त्यानुसार पुढील काम हाती घेतले जाईल. भाविकांसाठी अधिक सुविधा मिळाव्यात ही बाब लक्षात घेऊन मंदिरात येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता गर्दी नियंत्रणासाठी प्रवेश व निर्गमन मार्ग वेगळे करण्याची योजना आखण्यात आली आहे. तसेच, भाविकांना पुरेशी जागा मिळावी आणि चेंगराचेंगरीसारख्या दुर्घटना टाळल्या जाव्यात यासाठी मंदिर परिसरातील अनावश्यक बांधकामे हटविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

श्री तुळजाभवानी मंदिराच्या सुरक्षिततेसाठी निर्णायक पावले उचलण्यात आली आहे. मंदिराच्या मूळ स्थापत्यशैलीचे जतन करताना भाविकांची सुरक्षा आणि ऐतिहासिक वारशाचे रक्षण या दोन्ही बाबींचा विचार शासनाने केला आहे. या योजनांच्या अंमलबजावणीमुळे मंदिराचे ऐतिहासिक महत्व जपले जाईल तसेच भाविकांना सुरक्षित आणि सुबक दर्शन अनुभवता येणार असल्याची माहिती पुरातत्व विभागाच्या सहाय्यक संचालक जया वाहने यांनी दिली.

## त्या शिक्षकांना जुनी पेन्शन पूर्ववत लागू करा

### उमाकांत कुलकर्णी यांची शिक्षण सचिवांकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ फेब्रुवारी -**
एक नोव्हेंबर २००५ पुर्वी १०० टक्के अनुदानित शाळेतील विनाअनुदानित पदावर, तुकडीवर नियुक्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार जुनी पेन्शन योजना व भविष्य निर्वाह निधी योजना पूर्ववत लागू करण्यासंबंधी शालेय शिक्षण विभागाने तात्काळ शासन आदेश निर्गमित करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी राज्याच्या शिक्षण सचिवांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १९ जुलै २०२४ रोजी एकूण १६ रिट पिटिशन्स याचिका एकत्रीतपणे विचारात घेऊन निकाली काढण्यात आल्या होत्या. त्या रिट पिटिशन्समध्ये उच्च न्यायालयाने १९ जुलै २०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार १ नोव्हेंबर पूर्वी १०० टक्के अनुदानित शाळेतील विनाअनुदानित पदावर, तुकडीवर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ (निवृत्ती वेतन) आणि महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८४ (अंशराशीकरण) व भविष्य निर्वाह निधी योजना देय असल्याचा निर्णय दिला होता.

नागपूर खंडपीठाने दिलेल्या एकत्रित आदेशानुसार संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना व भविष्य निर्वाह निधी योजना पूर्ववत लागू करण्याबाबतचा शासन निर्णय तात्काळ निर्गमित करण्यात यावा व नागपूर न्यायालयाच्या या महत्वपूर्ण आदेशाचा योग्य सन्मान करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी राज्याच्या शिक्षण सचिवांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## शेतातील वादातून मारहाण; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ फेब्रुवारी -**
शेतजमिनीच्या वादातून एका व्यक्तीस लोखंडी कत्तीने मारहाण करून जखमी केल्याची घटना करजखेडा शिवारात घडली.

या प्रकरणी सहा जणांविरुद्ध बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, दि.१० फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री १० वाजता शेत गट नं. ३९० मध्ये आरोपी पंडू नामदेव आदटराव, खंडू नामदेव आदटराव, श्रीमंत महादेव लोखंडे, रुक्मिणी नामदेव आदटराव, अंजना पवार (सर्व रा. करजखेडा, जि. धाराशिव) आणि गोपाळ कोळी (रा. माळुंब्रा, ता. औसा, जि. लातूर) तसेच अन्य दोघांनी गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादी परमेश्वर सुखदेव आदटराव (वय ३५, रा. करजखेडा) यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व लोखंडी कत्तीने मारहाण केली.

या घटनेत फिर्यादी जखमी झाले असून, त्यांनी ११ फेब्रुवारी रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार, बेंबळी पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), १८९(२), १९१(२), १९१(३) आणि १९० अन्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## ४२ वर्षानंतर लोहारा येथे वर्ग मित्राचा स्नेह मेळावा



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१२ फेब्रुवारी -**
लोहारा शहरातील हायस्कूल लोहारा शाळेत सण १९८२ ला शिकत असलेले वर्गमित्र तब्बल ४२ वर्षा नंतर एकत्र येऊन स्नेह मेळावा साजरा केला. यावेळी शहरातील लोकवाचनालयात गुरुजनांसह सर्वजण एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देत चहापान व नाष्टा करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर जे वर्गमित्र हयात नाहीत त्याच्यासाठी भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली त्यानंतर भारत काळे यांनी आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून व विद्या विकास प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून माहिती दिली. बी.पी. मळी लिखित हैदराबाद मुक्ती संग्राम या ग्रंथाची माहिती देऊन खरेदी करण्याचे आव्हान करण्यात आले. त्यानंतर नवनाथ कबाडे यांच्या शेतात जाऊन वनभोजनाचा आनंद घेत धनंजय सदीकर यांच्या लगोरी या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी संग्राम पाटील, डॉ. अर्जुन व्हटकर, विठ्ठल कोकरे, बाबा शेख, रंजना माळवदकर, नागरबाई देवकर, शिवाजीराव कोळेकर, महेबूब गवंडी, भास्कर बेशकराव, मूनाभाई शेख, रमेश क्षीरसागर, दीपक झिंगाडे, रमेश होंडराव, सुनिल स्वामी, गुलाब क्षीरसागर, पार्वती ढगे, अरुण माटे, राजू उपरे, शिवानंद माशाळकर,दीपक पोतदार, प्रकाश मक्तेदार, बाळासाहेब खताळ, इस्माईल मुल्ला, राजू कमलापुरे, यांच्यासह वर्गमित्र उपस्थित होते.

## तुळजापूरच्या जयश्री जगताप यांची आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात उत्तुंग भरारी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ फेब्रुवारी -**
रोहन कानवडे दिग्दर्शित मराठी चित्रपट साबर बोंड या चित्रपटाला अमेरिकेत झालेल्या संडान्स फिल्म फेस्टिवल मध्ये वर्ल्ड सिनेमा ग्रँड जुरी प्राइज ड्रामॅटिक अवॉर्ड मिळाला.




या चित्रपटात तुळजापूरची जयश्री उमेश जगताप हिने या चित्रपटात साजेशी भूमिका साकारली आहे त्याचबरोबर भूषण मनोज, सुरज सुमन यांनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटाची अनेक फिल्म फेस्टिवल मध्ये निवड झाली.

भारतातील हा पहिला चित्रपट 'साबर बोंड' आहे ज्याची निवड संडान्स फिल्म फेस्टिवल मध्ये झाली. या अगोदर जयश्री जगताप यांनी रितेश देशमुख बरोबर माऊली चित्रपटात तर सोयरीक, बंदीशाळा या चित्रपटात आपल्या भूमिकेचा ठसा उमटविलेला आहे.

माझ्या नवऱ्याची बायको, सुख म्हणजे नक्की काय असतं, आता सध्या कलर्स मराठी वरती चालू असलेली मालिका आई तुळजाभवानी अशा अनेक मालिकेमध्ये तिने भूमिका साकारल्या आहेत.

या यशाबद्दल तुळजापुरातील नाट्यकर्मी पंचरंग प्रतिष्ठान व सारा गौरव सांस्कृतिक व कला क्रीडा मंडळ तुळजापूर यांनी तिचे अभिनंदन करून भरभरून कौतुक केले व तिला तिच्या पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सरकारी आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामात अडथळा; चौघांविरुद्ध गुन्हा नोंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ फेब्रुवारी -**
तामलवाडी (ता. तुळजापूर) - तालुक्यातील पिंपळा खुर्द येथे सुरू असलेल्या सरकारी आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामात अडथळा आणल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. संबंधित आरोपींनी सरकारी कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

या संदर्भात तामलवाडी पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, डॉ. साईनाथ संगमेश्वर जळकोट (वय ३२, वैद्यकीय अधिकारी, केशेगाव, तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी सरकारमार्फत मंजुरी मिळालेल्या आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामाला ११ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता सुरुवात केली. यावेळी शिवानंद मोतीराम गिरी (वय ३२), धनाजी हिरागुवा गिरी (वय ५०), राजेंद्र मोतीराम गिरी (वय ४७) आणि केशरबाई मोतीराम गिरी (सर्व रा. पिंपळा खुर्द, ता. तुळजापूर) यांनी काम थांबवण्याचा प्रयत्न केला.



फिर्यादीत नमूद केल्यानुसार, आरोपींनी सरकारी कामात अडथळा निर्माण करत बांधकामावर उपस्थित असलेल्या रामेश्वर सुरवसे आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि शिवीगाळ केली. तसेच, त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी डॉ. जळकोट यांनी सरकारतर्फे तामलवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार, भादंवि कलम १३२, ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५) अन्वये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## शिधापत्रीका सदस्याचे ई-केवायसी बंधनकारक : तहसीलदार बोळंगे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ फेब्रुवारी -**
राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुंटुब योजना अंतर्गत शिधापत्रीका धारकांना शासकीय अनुदानीत अन्न धान्याचा लाभ सुरु ठेवण्यासाठी कुटुंबातील शिधापत्रीका मध्ये नोंदणी असलेल्या सर्व सदस्याचे ई-केवायसी पुर्ण असणे बंधनकारक आहे.



ज्या सदस्याचे मुदतीत ई-केवायसी पुर्ण होणार नाही त्या कुटुंबाचा किंवा सदस्याचा अन्नधान्याचा लाभ बंद होणार आहे, असे निर्देश अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागा मार्फत देण्यात आलेले आहे. त्यानुसार तुळजापुर तालुक्यातील सर्व शिधापत्रीकेतील सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी करणेसाठी दि.१५ फ ेब्रुवारी वार शनिवार रोजी आपल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये हजर राहुन रेशन दुकानदार यांच्या मार्फत ई-केवायसी करण्याकरीता कॅम्प आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी तुळजापुर तालुक्यातील सर्व शिधापत्रीकाधारकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका प्रशासनाकडुन तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी केले आहे.


## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक २२/२०२५

**एस.आर.एन.क्रमांक :** OSM/13199/18/24
**फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक........**
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- गणेश चॅरिटेबल ट्रस्ट, धाराशिव, ता.जि. धाराशिव बाबत..**
**न्यासाचा पत्ता :- सांजा रोड धाराशिव, सांजा रोड धाराशिव, सांजा रोड धाराशिव, धाराशिव, उस्मानाबाद, उस्मानाबाद**
**अर्जदार :- नितीन रोहिदास शेरखाने**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादास आयुक्त, धाराशिव हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBER AND SETLOR FEES | 12700.00 |

(अ) जंगम मिळकत :- रोख रू. १२७००/- मात्र
(अक्षरी रूपये बारा हजार सातशे मात्र फक्त...)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत :- रोख रू. /- मात्र
(अक्षरी रूपये मात्र फक्त...)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

**ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिधी आज दिनांक :- १२/०२/२०२५ रोजी दिली.**

**स्वाक्षरित/-**
**अधिक्षक,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**धाराशिव**

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## एकात्मिक बालविकास केंद्राच्या वतीने कुशल अंगणवाडी सेविका प्रमाणपत्र वाटप

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१२ फेब्रुवारी -**



शिरूर अनंतपाळ येथे पंचायत समिती सभागृहात तालुक्यातील अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांची महिला व बालविकास विभागामार्फत बैठक व तालुक्यातील प्रत्येक अंगणवाडी आठवड्याचा ई आकाराचा नेमून दिलेला दैनंदिन शिकवणी उत्कृष्टपणे कामकाज केल्यासंबंधी व शंभर टक्के दिलेला उपक्रम परिपूर्ण केल्यामुळे कुशल अंगणवाडी सेविका प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच बालशिक्षण अभ्यासक्रमाच्या दैनंदिन कृती अंगणवाडी पूर्ण करून त्यांच्या परिपूर्ण नोंदी निश्चित दिलेल्या ग्रुपवर घेणे व अंगणवाडी केंद्रात बालशिक्षण दिन साजरा करणे यामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती पं.स.चे बी.डी.ओ. चव्हाण, निकम, मुख्य सेविका खलांग्रे, बिडवे व राहुल शिरूरे प्रमुखाच्या उपस्थितीत उजेड अंगणवाडी क्र.३ च्या कर्येकर्ती कदम संगीता उत्तमराव, उजेड अंगणवाडी क्र.४ च्या कार्यकर्ती दंतराव जानकी व इतर कार्यकर्तीना व मदतनीसांना प्रमाणपत्र देण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त...



### माघी पौर्णिमा : राष्ट्रसंतांचा पालखी उत्सव

**अहमदपूर, दि.१२ फेब्रुवारी -**

राष्ट्रसंत सद्गुरु डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या भक्ती स्थळ येथे मागीपौर्णिमेनिमित्त वडवळ नागनाथ ग्रामस्थांच्या वतीने पालखी सोहळा व प्रसादाच्या आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला भक्तांकडून पौर्णिमा पालखी उत्सव व महाप्रसादाचे आयोजन केले जात असते. यावर्षी माघी पौर्णिमेनिमित्त वडवळ नागनाथ ग्रामस्थांच्या वतीने संजीवन समाधीस संगीतमय रुद्राभिषेक पालखी उत्सव दर्शन व प्रवचन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आचार्य गुरुराज स्वामी महाराज यांचे आशीर्वाचन संपन्न झाले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ स्वामी, महादेव लिंबुटे, राजकुमार मोहनाळे, सोमनाथ खेमे, सोमनाथ बेंडके, विजय भालके, राजकुमार देवकते, विश्वनाथ बेंडके, उमाकांत बेरकीळे, संजय उस्तुरगे, मन्मथ हुंडेकरी, भेटे आप्पा सह ग्रामस्थांच्या सहकार्य करण्यात आले.



### उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

**उदगीर, दि.१२ फेब्रुवारी -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात बारावी परीक्षेच्या पहिल्या पेपरच्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत विशेष पद्धतीने करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, गटविकास अधिकारी सुरडकर, उपप्राचार्य एस.जी. पाटील आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस.जी. कोडचे, पर्यवेक्षक एस.व्ही. मुडपे, टी.एन. सगर, केंद्रप्रमुख पी.पी. जाहुरे यांच्या वतीने परीक्षेला उपस्थित राहिलेल्या सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी देखील उपस्थित होते.



### अर्थशास्त्र विभागाचा रांजणी येथील अभ्यास दौरा संपन्न

**निलंगा, दि.१२ फेब्रुवारी -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दि.९ रोजी रांजणी (जि.धाराशिव) येथील नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड व नॅचरल दुध डेअरीचा अभ्यास दौरा संपन्न झाला. सदर अभ्यास दौऱ्यामध्ये श्रीराम साळुंखे, श्रीपाद ठोंबरे, संतोष जाधव, विवेक गुजर यांनी उसापासून साखर निर्मितीची प्रक्रिया व निर्माण होणाऱ्या विविध उपपदार्थांची विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच नॅचरल दूध डेअरीमधील दुधावरील प्रक्रिया व दूध पॅकिंग, पनीर, तूप, दही, आम्रखंड, श्रीखंड व आईस्क्रीम तयार करणाऱ्या सर्व विभागाची माहिती देण्यात आली. याप्रसंगी लक्ष्मी भाले यांनी उपस्थितांचे आभार मानले. रांजणीसोबतच औसा येथील बालाजी मंदिर, अंबाजोगाई येथील मुकुंदराज व जोगाई मंदिर, हत्तीखाना इत्यादींना भेट देऊन पाहणी व अभ्यास करण्यात आला. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार यांच्या मार्गदर्शनात अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रो. मोहन बंडे, प्रा. विकास सोनवणे यांच्यासह १८ विद्यार्थ्यांनी यावेळी सहभाग नोंदविला.



### विज्ञान प्रदर्शन संपन्न

**उदगीर, दि.१२ फेब्रुवारी -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन मराठी विज्ञान परिषद शाखा उदगीरचे अध्यक्ष डॉ. एस.एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनाच्या अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही.पी. पवार हे होते. एकूण ६३ विद्यार्थ्यांनी या विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदविला. सोलार पॅनल, मिनी कुलर, पर्यावरण, संगणक, आरोग्य, शेती व सायबर सिक्युरिटी, गाईचे शेण, दूध, दही, तूप, गोमूत्र याविषयीचे फायदे यासारख्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी पोस्टर व मॉडेल सादर केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे परीक्षण शिवाजी महाविद्यालय, भौतिकशास्त्र विभागातील डॉ.व्ही.व्ही. जाधव व पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. मत्स्यगंधा पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रभारी डॉ. सुरेश लांडगे यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी विज्ञान प्रदर्शनाचा आनंद घेतला.

## गुटखा, मटका, अवैध दारू व लॉजवरील अवैध धंदे चव्हाट्यावर...

# साहेब, औसा शहरात बोकाळलेले अवैध धंदे थांबवा

**पोलीस उपमहानिरीक्षकाकडे विवेक मिश्रा यांची मागणी...**



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ फेब्रुवारी -**

गेल्या अनेक दिवसापासून औसा शहरात गुटक्याची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. तर राजरोजपणे मटका सुरु आहे. शहरातील अनेक लाजवर वेश्याव्यवसाय सुरु असून मोकाटपणे सुरु असलेल्या या धंद्यामुळे येणाऱ्या कांही दिवसात ३-४ लाजची भर पडून संख्येत वाढ होणार आहे. दिवसेंदिवस बोकाळत असलेले औसा शहरातील अवैध धंदे बंद करा, अशी मागणी शिवसेनेचे विवेक मिश्रा यांनी पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे औसा येथे निवेदनाद्वारे केली आहे.तर उपस्थित महिला व लोकप्रतिनिधीनी सुरु असलेल्या अवैध धंद्याचा पाढा वाचून साहेब, बोकाळलेले अवैध धंदे थांबवा, अशी हाक या बैठकीत दिली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून औसा शहरात अवैध धंदे सुरु असून दिवसेंदिवस यात मोठी वाढ होत आहे. शहरात ११ लॉज असून आणखी तीन ते चार लॉजचे बांधकाम सुरू आहे. याकतपूर रोडवर असलेल्या बालाजी मंदिर परिसरातही लॉज आहेत. यापैकी कांही लॉज होमगार्ड आणि पोलिसांचे नातेवाईक व मैत्रीपुर्ण असल्याची चर्चा आहे. लातूर शहरात दामिणी पथकाने ट्युशन व महाविद्यालय परिसरात कडक मोहिम राबविल्यामुळे लातूरातील ओघ जवळच असलेल्या औशातील लाजवर वाढत आहे. यामध्ये शहरातील शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची भर पडत आहे. तर आशा वातावाराणाने शाळा, महाविद्यालय व ट्युशन परिसरामध्ये अश्लील चाळ्यांचे प्रकार वाढले आहेत. तर कांही लॉजवर वेश्याव्यवसाय सुरु आहे. अशा अवैध धंद्याला आळा घालावा. यासाठी राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधिताना निवेदन देऊनही औसा शहरातील अवैध धंदे बंद झाले नाहीत. उलट यामध्ये वाढ होत आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

शहरात राजरोजपणे अवैद्य गुटखा विक्री सुरू आहे. तसेच अवैध दारू विक्रीतही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. तरुण मुलं दारूच्या व्यसनाचे बळी गेले आहेत. पोलीस स्टेशनच्या जवळच असलेल्या किल्ला मैदान, गांधी चौक, कालन गल्ली, पंचायत समिती परिसर, ग्रामीण रुग्णालयाच्यासमोर, जुने व नवे बस स्थानक परिसर, इंदिरानगर झोपडपट्टी या भागात खुलेआम मटका जुगार राजरोसपणे चालविला जात आहे. शहरातील अशा अवैध धंदे चालविणाऱ्यांना राजकीय व पोलीस विभागाचे अभय असल्याची चर्चा आहे.

सर्वसामान्य नागरिकांची दुकाने रात्री १० वाजता बंद करण्याची सक्ती असताना निलंगा, तुळजापूर मोड व औसा लातूर रोड या परिसरातील ढाबे राजरोसपणे सर्रास सुरु आहेत. परवानाधारक दारू दुकान चालकांकडून ठरवून दिलेल्या वेळेचे पालन होत नाही. यामुळे नियमांचे उल्लंघन करून दारू दुकाने उघडणे व बंद करणे सुरू आहे. तसेच शहरात बऱ्याच ठिकाणी अवैधरित्या दारू विक्री राजरोसपणे सुरू आहे. शहरातील गल्लीबोळातील पान टपरीत अवैधपणे गुटख्याची विक्री केली जात आहे. गुटखा विक्रीस बंदी असताना औसा शहरात मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री सुरु आहे.

औसा टी पॉइंट येथे वाहतुकीची सतत कोंडी होत असून या ठिकाणी वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे आवश्यक आहे. शहरातील दिवसेंदिवस वाढत असलेल्या अवैध धंद्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून अवैध तातडीने आळा घालावा अशी मागणी शिवसेनेचे माजी नगरसेवक विवेक मिश्रा यांनी नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे औसा येथे निवदनाद्वारे केली आहे. यावेळी एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार, नसीर कुरेशी, फहिम शेख आदी उपस्थित होते.

### अनुपस्थितांची चर्चा...

नांदेड परिक्षेत्राचे महा उपनिरिक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या बैठकीत औसा पोलिस ठाण्याअंतर्गत जवळपास ३२ गावातील अनेक सरपंच, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, गावातील आजी व माजी लोकप्रतिनिधी तर शहरातील माजी नगरसेवक, विद्यमान पक्षीय प्रतिनिधी गैरहजर होते. या बैठकीत महिला प्रतिनिधीनी गावातील अवैध दारुसह होणाऱ्या अवैध धंद्याचा पाढा वाचला. आलमला व इतर गावातील उपस्थित प्रतिनिधीनी गावातील अवैध धंद्याच्या समस्या यावेळी मांडल्या. बैठक पार पडली असली तरी या बैठकीसाठी अनुपस्थित व वेळेत येऊ न शकलेल्या प्रतिनिधीची चर्चा तालुक्यात होत आहे.

## अभिनेता राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१२ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत अभिनेता राहूल सोलापूरकर यांनी चुकीचे वक्तव्य केले.

या बाबतीत राहूल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा व राहुल सोलापूरकर याला भविष्य काळात अभिनेता म्हणून सिनेमा किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी बंदी घालण्यात यावी, अशी मागणी तहसीलदार गोविंद पेद्देवाड यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे यांनी निवेदन स्वीकारले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाध्यक्ष भागवत वंगे, कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस प्रमोद धुमाळे, ॲड. रमेश उंबरगे, ॲड. राम बंडगर, उजेडचे माजी सरपंच हमेद पटेल, कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी संभाजी पारशट्टे, युवा नेते विशाल गिलचे आदी उपस्थित होते.

## माता, पालक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.१२ फेब्रुवारी -**

शहरातील जि.प.प्रा.शा. भोजराजनगर शाळेत माता पालक मेळावा घेण्यात आला.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष सुरेंद्र देवशटवार तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्त्रीरोग तज्ञ डॉ. राखी शेळके व प्रा.डॉ. मारुतीराव गायकवाड हे होते. मान्यवरांचा यथोचित सत्कारानंतर मुलींच्या चमुने सर्वांचे स्वागत गीतातून लक्ष वेधले. या पालक मेळाव्याचे औचित्य साधत २०२४ मधील राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परिक्षेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्राफी, प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्षा सुषमा मठपती, शिक्षण विस्तार अधिकारी विजयकुमार संभाळे, उमाकांत देवंगरे, सुधीर लखनगावे, सचिन मुर्के, दयानंद वलांडे, अश्विनी लोंढे, सानिका आवाळे, शिंदे, नाटकरे, सचिन बेंबळगे, लोहार खंडु यांची उपस्थीती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव सुर्यवंशी आभार देविदास सांगवे यांनी मानले.

## शिवयोगी श्रीगुरुलिंगेश्वरांची पालखी उत्सव सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१२ फेब्रुवारी -**

येथील शिवयोगी श्रीगुरुलिंगेश्वर विरक्त मठ देवणी व नागराळचे मठाधिपती म.नि. प्र. सिद्धलिंग महास्वामीजी यांच्या १० पट्टाभिषेक वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी (दि.११) सकाळी शहरातील मुख्य रस्त्यावरून भव्य पालखी उत्सव सोहळा संपन्न झाला.

या पालखी मिरवणुकीच्या वेळी सीध्दलिंग महास्वामीजी यांचे ठिकठिकाणी पाद्यपूजा करण्यात आली.

ही मिरवणूक वीरशैव लिंगायत मठापासून-चावडी गल्ली-विष्णू मंदिर-हनुमान मंदिर-गांधी चौक- गवंडी गल्ली- लुल्हे गल्ली परत वीरशैव लिंगायत मठामध्ये आणण्यात आली. यावेळेस वीरशैव लिंगायत महिला भजनी मंडळी कडून गुरुराज माऊली... मन्मथ माऊली... या गाण्यावर भजन तर बाल गणेश मंडळाच्या महिलांनी झांज पथक वाजविले, काशी विश्वनाथ लेझीम पथक मुधोळ लेझीम, सेवालाल बंजारा गणेश मंडळाच्या भगिनीकडून सुंदर नृत्य व देखावा सादर केला.

यावेळी आतिषबाजी फुलाची उधळण करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. यानंतर मठामध्ये डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महाराज, मुखेड यांचे आशिर्वचनानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाने पालखी उत्सवाची सांगता करण्यात आली.

हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शहरातील सदभक्तांनी परिश्रम घेतले.

या मिरवणुकीमध्ये शहरातील सदभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळेस पोलीस उपनिरीक्षक नारायण डप्पडवाड, नरेश उस्तुर्गे, अभिजीत डोईफोडे यांनी चौख बंदोबस्त ठेवला होता.



## परिक्षा केंद्रावर पोलीसांचा केंद्राला आले छावणीचे स्वरूप

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.१२ फेब्रुवारी -**

तालुक्यातील लोक जागृती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रापका येथील परिक्षा केंद्रावर तहसीलदार गोविंद पेद्देवाड यांचे पथक व शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे कर्तव्य दक्ष पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस

> परिक्षा व्हावी तर या पद्धतीने शासनाने घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. अभ्यास तर केलाच पाहिजे अभ्यास करणाऱ्यांना परिक्षा सोपी आहे. परंतु कॉफी बहादर विद्यार्थ्यांसाठी अवघड आहे खरे विद्यार्थी पास होतील.
> **- धनंजय सोनवणे (पालक)**

उपनिरीक्षक अन्सापुरे यांनी सोहळा कर्मचाऱ्यांच्या ताफ्यासह कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. येथील विद्यालयात छावणीचे स्वरूप आले होते.

परिक्षा सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत पोलीस निरीक्षक दराडे आपल्या ताफ्यासह तळ ठोकून होते

व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुर्ण कॉलेजला घेराव घातला होता. त्यामुळे रापका येथील कॉलेजला पहिली वेळेसच छावणीचे स्वरूप दिसून येत होते.

त्याबरोबरच शिरूर अनंतपाळचे तहसीलदार गोविंद पेद्देवाड हे सुद्धा त्यांच्या कर्मचाऱ्यांना घेऊन ठाण मांडून बसले होते.

यात प्रामुख्याने पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे, उपनिरीक्षक अन्सापुरे, गुंटे, सगर तसेच

होमगार्डसह १६ पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते.

## लातूरात जूनपासून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु होणार

**आ. पवारांच्या पाठपुराव्याला यश... मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे आदेश...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ फेब्रुवारी -**



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे मंगळवार दि.११ रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत जुन २०२५ पासून लातूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले असून मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यास संबंधितांना सांगितले आहे. यामुळे महाविद्यालय स्थापनेपासून इमारतीचे बांधकाम पुर्ण होण्याच्या आ. अभिमन्यू पवार यांच्या सातत्याच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

लातूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्याने अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयातून महागडे शिक्षण घ्यावे लागते. लातूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु झाल्यानंतर लातूरसह धाराशिव, नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. २०१६ साली तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने लातूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी दिली. त्याचबरोबर निधी उपलब्ध करून देऊन इमारतीचे बांधकामही पूर्ण झाले आहे. येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु व्हावे. यासाठी २०२३ पासून पाठपुरावा सुरु होता. २०२४ च्या पावसाळी अधिवेशनात व ५ जुलै २०२४ रोजी हा मुद्दा आ. अभिमन्यू पवार यांनी औचित्याद्वारे सभागृहातही उपस्थित केला होता. सातत्याने होणाऱ्या मागणीवरून लातूर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीदरम्यान झालेल्या चर्चेनंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जून २०२५ पासून लातूर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले असून तसा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यास सांगितले आहे.

लातूर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होण्याचे स्वप्न अखेर पुर्ण होत असून लातूरच्या इंजिनिअर आणि एज्युकेशन हब मध्ये भर पडणार आहे. या बैठकीला माजी मंत्री तथा उदगीरचे आ. संजय बनसोडे उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## १४ फेब्रुवारी रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, आणि स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक यांच्या संयुक्त विद्यमाने १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. लातूर येथील पीव्हीआर टॉकीजजवळ कळंब रोडवरील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक हा रोजगार मेळावा होणार आहे.

या रोजगार मेळाव्यात १४ पेक्षा जास्त आस्थापना, उद्योजक यांनी ३८५ रिक्त पदे अधिसूचित केली आहेत. यामध्ये लातूर येथील वैभव इंडस्ट्री यांनी अकाउटंट, कॅशिअर, परचेसर, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ड्राफ्टमन, इलेक्ट्रिशियनची १५ पदे अधिसूचित केली असून यासाठी कोणतीही पदवी, संबंधित आय.टी. आय., डिप्लोमा अशी पात्रता निश्चित करण्यात आली आहे. लातूर येथील राजयोग टोयोटामध्ये सेल्समन, सर्व्हिस डवाझर, टेक्निशियन, कॅशिअरच्या २५ जागा भरण्यात येणार असून यासाठी बी.ई., डिप्लोमा, आय.टी.आय. अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे.

सुर्योदय स्मॉल फायनांन्स बँकमध्ये रिलेशनशिप ऑफिसर, कलेक्शन ऑफिसरच्या २५ जागांसाठी इयत्ता बारावी, कोणतीही पदवी अशी पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

लातूर येथील इंडोमोबिल सेल्स न्ड सर्व्हिस महिंद्रा शोरूम येथे सेल्समन न्ड सर्व्हिसच्या १० जागा भरल्या जाणार असून कोणतीही पदवी प्राप्त उमेदवार यासाठी पात्र आहेत. लातूर येथील लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये एलआयसी ऍडवायझरच्या १५ जागांसाठी इयत्ता दहावी, बारावी, कोणतीही पदवी अशी पात्रता निश्चित करण्यात आली आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### भांडणाची कुरापत काढून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** आरोपींनी संगनमत करून मागील भांडणाची कुरापत काढून मारहाण केल्याची घटना शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथे घडली. लय दिवस झालं तुझं बघतो, शहाणपणा करतो, असे म्हणून शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. उजव्या पायाच्या पिंडरीवर व मेचक्यात तसेच डाव्या पायाच्या गुडघ्यावर मारून जखमी केले. याबाबत हर्ष सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून समाधान सोनवणे व अन्य तिघांविरुद्ध शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल मगर करीत आहेत.

### फेरीवाल्यांना दिली पर्यायी जागा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** शहरातील गंजगोलाई भागातील व परिसरामध्ये वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गंजगोलाई भागातील भाजीपाला, हातगाडेवाले यांचे अतिक्रमण काढलेले आहे. त्या अनुषंगाने गंजगोलाई भागातील फळ विक्रेते, इतर व्यवसाय करणारे फेरीवाले यांना मनपा मालकीच्या फ्रूट मार्केटमध्ये व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिलेली आहे तसेच फळ विक्रेते, इतर व्यवसाय करणारे फेरीवाले यांनी महानगरपालिकेने निश्चित करून दिलेल्या जागेमध्येच व्यवसाय करावा, असे आवाहन मनपाने केले आहे.

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कृषिप्रदर्शनाचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** जमिनीची सुपीकता, लागवडीचा हंगाम आणि पद्धत, खत व्यवस्थापन, पाण्याचे व्यवस्थापन आणि रोग व कीड नियंत्रण व्यवस्थापन या पाच मुद्द्यावर लक्ष देत ऊस उत्पादकांना एकरी १०० टन ऊस उत्पादन घेणे शक्य आहे असे प्रतिपादन कृषिभूषण तथा नॅचरल शुगरचे संचालक पांडुरंग आवाड यांनी केले.

लातूर येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सुरू असलेल्या कृषी नवनिर्माण २०२५ या कृषी प्रदर्शनात शेवटच्या दिवशी एकरी शंभर टन ऊस शेतीचा मूलमंत्र या विषयावर आवाड बोलत होते. व्यासपीठावर प्रदर्शनाचे आयोजक मनसे शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोषभाऊ नागरगोजे, जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाने, संजय राठोड, महापालिका अभियंता शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना पांडुरंग आवाड म्हणाले की, सध्याच्या नैसर्गिक परिस्थितीत तसेच शेतीमालाचे भाव बदलत्या परिस्थितीत शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादन देणारे पीक म्हणजे ऊस पीक होय. त्यासाठी शेतकऱ्यांनी ऊस पीक घेणे आवश्यक आहे. उसाचे उपउत्पादन उपउत्पादन साखर हे नसून आता इथेनॉल ग्रीन हायड्रोजन असे इंधनादि उपउत्पादने तसेच खते उसापासून निर्माण केली जात आहेत शिवाय सीएनजी चे उत्पादने उसापासून होतात. त्यामुळे आगामी काळात ऊस शेतीला चांगले दिवस निश्चित आहेत असे ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमास अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राजर्षी शाहू मल्टीस्टेटला बँको ब्ल्यू रिबीन पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यामध्ये शाखा विस्तार असलेल्या छत्रपती राजर्षी शाहू मल्टीस्टेटला बँको ब्ल्यू रिबीन पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. चालू आर्थिक वर्षांमध्ये संस्थेस एकूण वेगवेगळ्या कार्यासाठी चार पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

सहकारी संस्थांसाठी लोणावळा येथे माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांचे हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक विजयकुमार शेळके, संचालक अमर सोट, मोहन जाधव व अरविंद पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला. संस्थेचे जवळपास सर्वच संचालक हे बैंकिंग मधील तज्ज्ञ व्यक्ती असल्यामुळेच व पारदर्शक कारभार, ग्राहकांचे हित, कटिबद्धता, सहकार खात्याचे सर्व नियमांची पूर्तता संस्थेने केलेली आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक विजयकुमार शेळके यांचे कौतुक होत आहे.

## सराईत चोरट्याकडून २४ दुचाकी जप्त

### लातूर, धाराशिव व पुणे येथून केली चोरी; १७ गुन्ह्यांची उकल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सराईत दुचाकी चोराला अटक केली आहे. लातूर, धाराशिव व पुणे येथून त्याने चोरी केलेल्या २४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. यातून दुचाकी चोरीचे १७ गुन्हे उघडकीस आले असून, आरोपीकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्त्वात जिल्ह्यातील विविध गुन्हे विशेषतः दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत.

दरम्यान, अहमदपूर तालुक्यातील थोरलेवाडी येथील एका आरोपीने चोरलेल्या दुचाकी त्याच्या घरासमोर लपवून ठेवल्या आहेत, अशी माहिती पोलीस पथकाला मिळाली. सोमवारी पथक तत्काळ अहमदपूर तालुक्यातील थोरलेवाडी येथे पोहचले. रोडवर दुचाकीसह थांबलेल्या अमोल तेजराव नागरवाड (वय २५) याला ताब्यात घेण्यात आले. लपवून ठेवलेल्या दुचाकीसंदर्भात कसून चौकशी करण्यात आली. सदर दुचाकी लातूर, धाराशिव व पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून चोरी केल्याची त्याने कबुली दिली. त्याने चोरी केलेल्या ८ लाख २० हजार रुपये किमतीच्या एकूण २४ दुचाकी जप्त करण्यात आल्या.

यातून चाकूर पोलीस ठाणे येथील ४, शिरूर अनंतपाळ पोलीस ठाणे ३, रेणापूर, देवणी, निलंगा, विवेकानंद चत्तैक, गांधी चौक, अहमदपूर येथील प्रत्येकी १ तर पुणे जिल्ह्यातील ३ व धाराशिव जिल्ह्यातील १ असे एकूण १७ दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. उर्वरित सात दुचाकीसंदर्भात तपास सुरू आहे.

आरोपीला पुढील कार्यवाहीसाठी चाकूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाण्यांचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या मार्गदर्शनात, सहायक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या नेतृत्त्वात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, सुधीर कोळसुरे, सिध्देश्वर जाधव, युवराज गिरी, मनोज खोसे, गोविंद भोसले, चालक पोलीस अंमलदार प्रदीप चोपणे, चंद्रकांत केंद्रे यांनी ही सेवा बजावली.

## शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचणे गरजेचे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे 'युथ फॉर माय भारत आणि युथ फॉर डिजिटल लिटर्सी' विशेष वार्षिक शिबिरात मौजे जमालपुर येथे दुपारच्या सत्रात ग्रामविकास आणि डिजिटल साक्षरता या विषयावर प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. रामेश्वर स्वामी यांचे व्याख्यान संपन्न झाले. डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ. केशव



आलगुले, डॉ. माया सरवदे, डॉ. राजेश कारंजकर, सचिन शिखरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्र संपन्न झाले.

यावेळी बोलताना डॉ. रामेश्वर स्वामी म्हणाले की, शहर आणि ग्रामीण भागात जोडण्यासाठी डिजिटल साक्षरता दुवा म्हणून काम करत आहे. महाविद्यालयीन युवकांनी डिजिटल साक्षरतेच्या माध्यमातून शासनाच्या लोककल्याणकारी योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. त्यातूनच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यास मदत होईल. यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः डिजिटल साक्षर असणे आवश्यक आहे. तसेच समाजातील तळागाळापर्यंत डिजिटल साक्षरतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी योगदान देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जवळील इलेक्ट्रॉनिक मोबाईल किंवा इतर उपकरणाचा उपयोग उपकरणाचा समाज हितासाठी करावा आणि आपल्याला माहित असलेले समाज उपयोगी तंत्रज्ञान हे लोकांपर्यंत पोहोचवावे असे मत त्यांनी शेवटी व्यक्त केले.

## राज्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन हमीभाव फरकाची रक्कम द्या

### माजी आमदार देशमुख यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** सोयाबीनला बाजारात हमीभावापेक्षा कमी भाव मिळत आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना बाजारभाव व हमीभाव यातील फरक रक्कम सरकारने द्यावी आणि हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी केंद्राने दिलेली २४ दिवसांची मुदतवाढ कायम ठेवावी, अशा मागण्या माजी आमदार धिरज देशमुख यांनी शासनाकडे केली. राज्यात हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी दोनच दिवसांपूर्वी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी २४ दिवसांची मुदतवाढ जाहीर केली होती. पण केंद्राने कोणतीही मुदतवाढ दिली नसल्याचे राज्याच्या पणन विभागामार्फत सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये गोंधळाचे आणि निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## नूरजहाँ कॉलनीतील रस्त्यांच्या निधीसाठी आ.देशमुखांना साकडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** शहरातील महादेवनगर, नूरजहाँ कॉलनी परिसरात गेल्या १५-२० वर्षांपासून नागरी वस्ती आहे. या भागात रस्ते, गटारी नाहीत, कचऱ्याची गाडी येत नाही. यामुळे दुर्गंधी पसरत आहे. परिणामी, डेंग्यू, मलेरियासारखे आजार पसरत आहेत. अनेकवेळा निवेदन देऊन मागणी करूनही सुविधा मिळत नाहीत. येथील रहिवाशांनी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांची बाभळगाव येथे भेट घेवून निधी देण्याची मागणी केली.



शहराजवळील महाराणा प्रतापनगरात लातूर शहरातील नागरिक जागा घेऊन, घरे बांधून गेल्या २० वर्षांपासून येथे नागरिक राहत असताना अद्यापही त्यांना मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत आहे. घरासमोर गटारी नाहीत किंवा कचरा संकलनासाठी घंटागाडीही जात नाही. कोणत्याही सुविधा नसल्याने या भागात दुर्गंधी पसरली आहे. यामुळे डेंग्यू, मलेरियाचे डास वाढले आहेत. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या समस्या ग्रामपंचायतीकडे मांडूनही त्या सोडविल्या जात नाहीत. यामुळे या भागातील रहिवाशांनी आमदार देशमुख यांची बाभळगाव येथे भेट घेवून त्यांना निवेदन दिले. तत्काळ मूलभूत सुविधा देण्याची मागणी केली. निवेदनावर निवृत्त पोलीस अधिकारी चाँदपाशा शेख, मन्सूर शेख, तुराब शेख, इसाक शेख, अजगर शेख, गणपती श्रीमंगले, सादीक शेख, हारून मोमीन, अफरोज शेख, सोहेल शेख, फय्याज शेख, यासीन शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## बारावी परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे अभाविपकडून स्वागत व शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता १२वीच्या परीक्षा दि. ११ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आज दयानंद विद्यालय, लातूर येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तर्फे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात अभाविपच्या कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांना आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचा संदेश दिला. यावेळी महानगर मंत्री तेजुमई राऊत, सहमंत्री नरेंद्र ठाकूर, दयानंद विधी महाविद्यालय अध्यक्ष दीपक यादव, मंत्री किरण शिंदे, उपाध्यक्ष अमित जाधव, तर सहमंत्री प्रथमेश राठोड, महेश सोळंके, शुभम बिराजदार, आकाश करपे, ओमराज भगत आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परीक्षेच्या तणावातून मुक्त राहून आत्मविश्वासाने आणि निर्धाराने यश संपादन करण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

## कष्ट हेच गरीबांच्या आर्थिक प्रगतीसाठीचे भांडवल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** कोणत्याही समाजात संवाद महत्वाचा आहे,संवादाचा धागा तुटला तर सर्व काही तुटणार आहे,अशावेळी ज्येष्ठांनी पुढे येणे गरजेचे आहे, असे सांगून सध्याचे युग हे स्पर्धेचे,प्रसार-प्रचाराचे आणि मार्केटिंगचे आहे,यात मला वेळ नाही,माझी परिस्थिती नाही असे सांगून आता कोणालाही थांबता येणार नाही, त्यासाठी कठोर परिश्रम,कष्ट उपसणे आवश्यक आहे किंबहुना कष्ट हेच गरीबांच्या आर्थिक प्रगतीसाठीचे भांडवल आहे,असे प्रतिपादन आदर्श शिक्षक अशोकराव कुलकर्णी गौरकर यांनी येथे केले.

स्वातंत्र्य सैनिक सोसायटीतील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात रविवारी सायंकाळी ज्येष्ठांची स्नेह भेट कार्यक्रम घेण्यात आला.त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

सध्या समाजा-समाजात,जाती-धर्मांच्या लोकांमध्ये गैरसमजातून,अकारण तेढ वाढत आहे,ती कोणालाही परवाडणारी नाही,आमच्या सारखी माणसं गेली पाच दशके विविध जाती,धर्मांच्या व्यक्तींशी जिव्हाळ्याचा स्नेह ठेवून आहोत,त्यामुळे आयुष्याचा सुर्य माळवत चालला तरी भेटीची आस काही कमी होत नाही,म्हणून स्नेह भेट पुन्हा घ्यावी वाटते,असे सांगून अशोकराव कुलकर्णी म्हणाले की, स्वातंत्र्य सेनानी बाबासाहेब परांजपे, देविसिंग चौहान,केशवराव सोनवणे,शिवाजीराव नाडे यासारख्या धुरिणांनी लातूर परिसरात निस्वार्थ भावनेने समाज,शिक्षण,राजकारण,सहकार,साहित्य क्षेत्रात खुप मोलाचे काम केले,त्यांच्या कार्याची नव्या पिढ्यांना माहिती करुन देण्याचे काम ग्रंथालयातून केले जावे,वृत्तपत्रातून त्या त्यागींचा जागर व्हावा,ज्ञानाचा प्रसार प्रत्येकांने केला पाहिजे असे ते म्हणाले. लातूर शहर पन्नास वर्षाखाली लातूरच्या पूर्व भागात शिक्षणाचा प्रसार नव्हता अशावेळी, मनोहरराव आल्टे, शंकर इंगळे, अमृतराव सुर्यवंशी,बाबुराव होळीकर यांच्या सारख्यांनी सिध्दार्थ शाळेच्या माध्यमातून कष्टकऱ्यांच्या लेकरांना शिक्षण दिल्याने अनेक विद्यार्थी नोकरीत लागले,प्रबोधनाचे काम केले.गरीबांच्या घरात सुखाचे दिवस आले,ज्ञानोबा कांबळें सारखे समाज सेवक,सुर्यभान लातूरकरांसारखे शिक्षक आदर्श आहेत.अशा गुणी माणसांचा सहवास लाभला आणि कृतार्थ झालो,असेही ते म्हणाले.

या प्रसंगी अमृतराव सूर्यवंशी,ज्ञानोबा कांबळे,सूर्यभान लातूरकर यांनीही मनोगत व्यक्त केले.अशोकराव कुलकर्णी यांच्यावतीने साहित्यिक अमृतराव सूर्यवंशी,कार्यकर्ते ज्ञानोबा कांबळे,सूर्यभान लातूरकर आणि ग्रंथपाल अंजुषा काटे,पत्रकार बाळ होळीकर यांचा उपरणे,हार देवून सन्मान करण्यात आला. त्यांचाही वाचनालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. अल्पोपहाराने सांगता झाली. या स्नेह भेट कार्यक्रमाला महादेव राऊत,प्रल्हाद गायकवाड,नितीन माने,विद्याराणी माने , माने मावशी आदिंची उपस्थिती होती.

## परीक्षा केंद्रांवरील बैठे पथकांशी जिल्हाधिकाऱ्यांचा संवाद; कॉपीमुक्त परीक्षेसाठी सतर्क राहून काम करण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ फेब्रुवारी -** जिल्ह्यातील १०० केंद्रांवर उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात इयत्ता बारावी परीक्षेला सुरुवात झाली. या परीक्षेसाठी ३७ हजार ६२ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. कॉपीमुक्त परीक्षेसाठी यंदा प्रथमच सर्वच परीक्षा केंद्रांवर बैठे पथक तैनात करण्यात आली आहेत. तसेच या पथकांचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये कंट्रोल रूम स्थापन करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी या कंट्रोल रूममधून जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर नियुक्त बैठे पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.



तसेच जिल्ह्यात इयत्ता बारावीची परीक्षा कॉपीमुक्त आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

इयत्ता बारावी परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जिल्हास्तरावरून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, जिल्हास्तरीय शासकीय विभाग प्रमुख तसेच इतर वर्ग एक व वर्ग दोन अधिकाऱ्यांची ८९ भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच सर्व १०० परीक्षा केंद्रावर प्रत्येकी महसूल विभागाचा एक कर्मचारी ग्रामविकास विभागाचा एक कर्मचारी व इतर विभागाचा एक कर्मचारी असे जिल्ह्यात एकूण ३०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक तालुकास्तरावर व्हिडिओ सर्व्हीलंस टीम (व्हीएसटी) स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये एकूण ३० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. बैठे पथकाद्वारे परीक्षा केंद्र परिसराची पाहणी करण्यासाठी जिल्हास्तरावर कंट्रोल रूमची स्थापना करून झूम लिंकद्वारे प्रत्यक्ष तपासणी व पाहणी पाच व्यक्तीच्या टीमद्वारे करण्यात येत आहे.

सर्व परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात इयत्ता बारावीची परीक्षा पार पडावी, यासाठी सर्व १०० परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये १०० पोलीस अधिकाऱ्यांसह १२०० पोलीस अंमलदार, होमगार्ड यांचा समावेश आहे. यासोबतच काही परीक्षा केंद्रांच्या परिसरात पोलिसांमार्फत ड्रोनद्वारे परीक्षा केंद्राची पाहणी करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी केली परीक्षा केंद्रांची पाहणी इयत्ता बारावी परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्वोतोपरी सज्जता केली असून विविध पथके, सीसीटीव्ही, कंट्रोल रूम आदी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर शहरातील बसवेश्वर महाविद्यालयासह इतरही परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. तसेच पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनीही परीक्षा केंद्रांना भेट देवून पोलीस बंदोबस्त, परीक्षा प्रक्रिया याविषयीचा आढावा घेतला.